◆ जुलै २००६
◆ वर्ष सहावे
◆ अंक सातवा

# मेहता मराठी ग्रंथजगत

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
अनिरुद्ध पाटील

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

## — अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | ९ |
| **ओळख डॅन ब्राउनची** | ३६ |
| **विशेष वार्ता** | ४० |
| **दखल** | ४४ |
| **पुस्तक परिचय** | |
| **द दा विंची कोड :** अनु.अजित ठाकूर | ४६ |
| **कवडसे :** योगिनी वेंगुर्लेकर | ५६ |
| **गोल गोल राणी :** स्वाती चांदोरकर | ६४ |
| **पाऊलवाटेवरले गाव :** आशा बगे | ७२ |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ७९ |
| **पुरस्कार** | ८४ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ८७ |
| **श्रद्धांजली** | ८८ |
| **बालनगरी** | ९७ |

मांडणी-अक्षरजुळणी :
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

## सहाव्या प्रकाशक संमेलनाचा संदेश

फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, दिल्ली आणि अ.भा. मराठी प्रकाशक संघ, पुणे यांच्या वतीने पुणे येथे भारतीय भाषांमधील प्रकाशकांचे सहावे संमेलन जूनच्या तिसऱ्या आठवड्यात पार पडले. या संमेलनात वाचन संस्कृतीचा विकास, नवीन तंत्रज्ञान आणि प्रादेशिक भाषांमधील प्रकाशने, प्रादेशिक भाषांमधील साहित्याचा इतर प्रादेशिक भाषांमध्ये अनुवाद आणि आंतरराष्ट्रीय प्रसार-वितरण वगैरे विषयांवर चर्चासत्रे झाली. भारताच्या विविध भागांतून आलेल्या फेडरेशनशी संबंधित मान्यवर प्रकाशकांनी आपले अनुभव आणि चिंतन या चर्चासत्रांमध्ये व्यक्त केले आणि भारतीय प्रकाशनव्यवसायसमोर असलेल्या नव्या संधी आणि नवी आव्हाने याविषयी चपखल मार्गदर्शन केले. विशेषत: नव्या तंत्रज्ञानामुळे यापुढे सध्याच्या मुद्रित स्वरूपातील पुस्तकांशीच सीमित असलेल्या प्रकाशनसंस्थांना आपल्या दृष्टिकोनात वेळीच बदल न केल्यास या व्यवसायात टिकून राहणे जड जाईल, अवघड होईल असा स्पष्ट इशाराही दिला गेला.

मुद्रित स्वरूपातील पुस्तकाच्या जोडीनेच आता यापुढच्या काळात ई-बुक्स, ई-न्यूजलेटर, पोर्टल्स, सीडीज, वेबसाईट, ऑडिओ बुक्स, ऑनलाइन बुकस्टोअर या सर्व संकल्पनांशीही जुळवून घ्यावे लागेल, त्यांच्या समन्वयावर भर द्यावा लागेल याकडेही लक्ष वेधण्यात आले. सध्यासारखी केवळ पुस्तके छापून या व्यवसायात पाचसहा वर्षांवर टिकाव धरता येणार नाही; या पुस्तकांच्या जोडीने सीडीज काढून पुस्तक आणि सीडी यांचा मेळ घालून त्या सीडीजचे अपडेटिंग करण्याचे आमिष दाखवून ग्राहक टिकवून धरावे लागतील याची कल्पना डी. सी. बुक्सच्या रवी डीसी यांनी दिली. आणि उपस्थितांना खडबडून जाग आणली. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे आपण प्रकाशक म्हणून आता पुढच्या काळात 'कंटेन्ट क्रिएटर्स'च्या भूमिकेत स्वत:कडे बघायला हवे असेही त्यांनी नि:संदिग्धपणे सांगितले. ''पाच वर्षांपूर्वी आम्ही 'इंग्लिश-इंग्लिश-मल्याळम' शब्दकोश सीडीच्या रूपात तयार केला... पण आता या सीडींची विक्री २० लाखाच्या घरात आहे...'' असा अनुभवही कथन केला. ॲमेझॉन डॉट कॉमने जगात प्रथम ऑनलाइन बुकस्टोअर सुरू केला. ती कल्पना आपण प्रादेशिक पातळीवरही



राबवू शकतो, याबाबतही त्यांचा अनुभव उत्साहवर्धक आहे. ऑनलाइन बुकस्टोअरमुळे जगभरच्या वाचकग्राहकांना गाठता येते. इतका दूरवर आणि कमी खर्चात सर्वत्र नेणारा दुसरा मार्ग नाही. मल्याळी लोक मुंबई, दिल्ली, कलकत्ता, चेन्नई वगैरे शहरात प्रत्येकी दहा लाखावर आहेत. अमेरिकेतही काही हजार आहेत. मध्यपूर्वेत आहेत. युरोप-अमेरिकेत आहेत. या सर्वांपर्यंत या ऑनलाइन बुकस्टोअरच्या माध्यमातून संपर्कात राहता येते. त्यांच्यापर्यंत नव्याजुन्या पुस्तकांची माहिती पोहोचवता येते. त्यांजकडून येणाऱ्या ऑर्डर्समध्ये दर महिन्यात वाढ होत आहे. तोही खप वीस लाखाच्या घरात आहे. भविष्यात वेबसाइटद्वारेच आपण जगभरच्या ग्राहकांशी सतत संपर्कात राहू शकू... वाचकांना आपल्या नव्या पुस्तकांबद्दल माहिती देणे, त्यांच्या ऑर्डर्सची पूर्तता करणे, त्यांची निष्ठा मिळवणे या दृष्टीने पोर्टल, वेबसाइट, ऑनलाइन बुकस्टोअर या सर्व गोष्टी अत्यंत उपयुक्त ठरतात.

नव्या पिढीतल्या प्रकाशकाला आणखी एका बाबीकडेही लक्ष पुरवावे लागेल, हेही रवी डीसी यांच्या निवेदनावरून स्पष्ट झाले. डीसी बुक्सने स्वत:चेच एक मीडिया स्कूल सुरू केले आहे. नव्या तंत्रज्ञानाची ओळख करून घेणे आणि प्रकाशनव्यवसायात त्याचा वापर करण्याच्या दिशेने पावले टाकणे– यासाठी प्रशिक्षित तरुणवर्ग तयार करणे हे या मीडिया स्कूलचे उद्दिष्ट आहे. प्रसारमाध्यमाच्या विविध अंगांचा समन्वय यापुढच्या काळात अपरिहार्य आहे. टेलिव्हिजन, वृत्तपत्रे, नियतकालिके, ॲनिमेशन, कार्टून्स, कॉमिक्स, जाहिरात, चित्रपट, रेडिओ, पोस्टर्स, ग्राफिक्स... प्रत्येक गोष्ट आपल्या व्यवसायाचा आज अविभाज्य भाग बनवून, आपली उपयुक्तता वाढवण्यासाठी वापरता येऊ शकेल... आशयनिर्मिती (कंटेन्ट जनरेशन) हा आपला व्यवसाय आहे; त्यामुळे केवळ मुद्रित पुस्तकांशीच आपला संबंध आहे ही समजूत दूर करून, ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांशीही आपले नाते आहे हे यापुढे आपले गृहितकृत्य असले पाहिजे. ज्ञानमाहितीचे केंद्र तयार करणे व त्यातील माहितीचा वेगवेगळ्या स्वरूपात आविष्कार करून त्याच्या व्यापक वितरणाद्वारे अर्थार्जन करणे हा यापुढे आपला व्यवसायधर्म असला पाहिजे. बालसाहित्याच्या बाबतीतला एक अनुभव त्यांनी सांगितला. बालकथांचे पुस्तक सहसा विकत न घेणारे ग्राहकही, त्या पुस्तकातील गोष्टी ऑडिओ कॅसेटवर ऐकून ती ऑडिओ कॅसेट आणि ते पुस्तक– दोन्हीही घेण्यास प्रवृत्त होतात. ऑडिओ बुक्समुळे मुद्रित पुस्तकेही खपतात... त्यासाठी डीसी बुक्सने आपल्या वेबसाइटवर पुस्तकातील काही भाग श्रवण करता येईल अशीही सोय केली आहे. कादंबरीतले एखादे प्रकरण 'ऐकून' ती कादंबरी वाचण्याची इच्छा होणारा ग्राहक यापुढे गृहीत धरून प्रत्येक पुस्तकाचे मार्केटिंग करावे लागेल, असा याचा अर्थ.

नव्या तंत्रज्ञानाने मुद्रणातही खूप क्रांती झालेली आहे. त्याबाबतही परिसंवादातील वक्त्यांनी माहिती दिली. डिजिटल तंत्रज्ञान पुस्तकाच्या छपाईसाठी वापरण्यास १९७० च्या सुमारास मॅकमिलन कंपनीने भारतात आरंभ केला; ऑक्सफर्ड डिक्शनरीच्या पाच लाख प्रती दरवर्षी जगभर खपतात; त्यांच्या छपाईचे काम दिल्लीजवळच्या मुक्त निर्यात व्यापारक्षेत्रात होते अशी माहिती रमेश पटेल यांनी दिली. ऑन डिमांड प्रिंटिंग ही कल्पना यापुढच्या काळात अधिक मूळ धरील; तेव्हा कुठल्याही पुस्तकाच्या हव्या तेवढ्या प्रती आपल्याला ऑर्डरनुसार लगेच छापून, बांधणी करून मिळू शकतील. पुस्तके छापून ठेवण्याची गरज उरणार नाही. मजकूर, चित्रे यांची हवी तशी फेरमांडणी करणेही यापुढे सोपे जाईल.

अर्थात या तंत्रज्ञानाची ही झेप आपल्या सर्वांच्या आवाक्यातली आहे की नाही हा सवाल आहेच. परंतु काळाचे आव्हान जबरदस्त आहे. आंतरराष्ट्रीय प्रकाशन संस्था जागतिकीकरणाच्या या झंझावाताबरोबर भारतीय बाजारपेठेत मुसंडी मारायला सज्ज झाल्या आहेत. या नव्या तंत्रज्ञानावर आधारित नवनवीन उत्पादनांचा मारा येथील ग्राहकवर्गावर करीत राहतील आणि येथील ग्राहकवर्ग स्वागतशील वृत्तीने त्यांचा स्वीकार करील. वॉल्ट डिस्नेची कार्टून्स, निरनिराळ्या आकारातील पुस्तके, ऑडिओ कॅसेटस्, डीव्हीडीज, सीडीज, मिकी माऊस वगैरेंचे लोगो असलेले कपडे, मिकी माऊस वगैरे पात्रांची खेळणी... हे सगळे भरपूर महाग असूनही येथील मध्यमवर्ग स्वीकारतो आहे, मुलांच्या हाती देतो आहे. डिस्ने चॅनलसवरून या सर्व उत्पादनांची सारखी जाहिरात चालू असते. मुलांच्या मनात त्याबद्दलचे आकर्षण निर्माण होते. असेच कपडे हवे, अशीच पोस्टर्स हवी... अशा त्यांच्या मागण्या सुरू हातात... आणि डिस्नेची भारतातील उलाढाल अब्जावधींच्या घरात जाते. गावोगाव डिस्नेची उत्पादने विकणारी भव्य केंद्रे निघतात, घराघरात ती दिसू लागतात... आपल्या पुस्तकांना हे असे विविध तंत्रज्ञानाधिष्ठित उत्पादनांचे भव्यत्व लाभतच नाही. –आणि आपण त्या दिशेने पावले टाकण्याचे लांबणीवर टाकत राहिलो तर आपली आहे ती पुस्तकांचीही बाजारपेठ ओस पडेल. नव्या आकर्षक उत्पादनांची ग्राहकांना भुरळ पडत जाईल; उत्तम वितरण व्यवस्थेमुळे ग्राहकांच्या घरोघरी ती पोहोचत राहतील आणि आपली प्रादेशिक पातळीवर दर्जात्मक पातळीवर सामान्य असणारी पुस्तके, ध्वनिफिती, ध्वनिचित्रफिती यांची मागणी हळूहळू कमी होत जाईल. या व्यवसायातून आपली पीछेहाट होत जाईल...

आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आपण टिकायचे कसे हा प्रश्न भारतीय प्रादेशिक भाषांमधील प्रकाशन संस्थांपुढे आहेच, भारतातील मोठ्या उद्योगसमूहांचेही आव्हान या पुढच्या काळात तीव्रतर होत राहील अशीही शक्यता आहे.



रिलायन्स उद्योगसमूह गावोगाव भव्य शॉपिंग मॉल्स उभारणार आहे. त्यात पुस्तकांचीही दुकाने असावीत अशी योजना आहे. रिलायन्सच्या या दुकानातून कोट्यवधींची ग्रंथविक्री अपेक्षित आहे. साहजिकच, प्रकाशनसंस्थांचे एक मोठे वितरक म्हणून रिलायन्सचा दबदबा वाढणार आहे. व्यापक वितरण व्यवस्थेमुळे प्रकाशनसंस्थांना रिलायन्सच्या ध्येयधोरणांचा स्वीकार करणे क्रमप्राप्त ठरणार आहे. परदेशी पुस्तके, कॅसेटस्, खेळणी वगैरेंच्या गर्दीत भारतीय व प्रादेशिक भाषांतील पुस्तकांची व उत्पादनांची काहीशी उपेक्षा होणेही संभाव्य आहे. छोट्या छोट्या प्रकाशकांची पाचपंचवीस पुस्तके मागवण्यापेक्षा बड्या प्रकाशकांची शेकडो पुस्तके मागवणे व विक्रीसाठी ठेवणे जास्त सोयीचे ठरते... असा काही विचार करून रिलायन्सने बड्या प्रकाशकांवर लक्ष केंद्रित केले तर लहान प्रकाशकांची कुचंबणा होणे अटळ ठरेल... प्रकाशनव्यवसायाची नवी समीकरणे त्यातून मांडली जाऊ लागतील.

एकूणच भारतीय भाषांतील प्रकाशकांच्या या सहाव्या संमेलनाने प्रकाशनव्यवसायाला यापुढे स्थितिशील व पारंपरिक पठडीत राहून चालणार नाही, याची खणखणीत जाणीव करून दिली आहे यात शंका नाही. प्रकाशक म्हणून आपली भूमिका यापुढे केवळ लेखकाने दिलेले हस्तलिखित छापून बाजारात आणणे एवढ्यापुरती मर्यादित ठेवून भागणार नाही. आलेल्या लेखनाची विश्वासार्हता, गुणवत्ता, विशिष्ट वाचकवर्गाच्या दृष्टीने असणारी उपयुक्तता, हे तपासून त्याचे संपादन करून त्याची वाचनीयता वाढविणे, त्याच्या वितरणाची व्यवस्था करणे, जाहिरात व प्रसिद्धी करणे, त्याच्या इतर भाषांतील अनुवादाची शक्यता बघून पुढे पाऊल टाकणे, वगैरे भूमिकाही त्याला बजावाव्या लागतात. ग्रंथनिर्मिती, ग्रंथवितरण, नवे तंत्रज्ञान स्वीकारणे याबरोबर आनुषंगिक हक्कांची जपणूक याबाबतही आता अधिक अवधान देण्याची गरज निर्माण झाली आहे. डीसी मीडिया स्कूलप्रमाणे प्रत्येक प्रकाशक काही स्वत:चे अध्यापन-अध्ययन केंद्र सुरू करू शकणार नाही. पण नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या दिशेने स्वत:ला सज्ज व अद्ययावत ठेवण्यासाठीही योग्य ती दक्षता व परिश्रम घेणेही उचित ठरेल...

उद्याचा प्रकाशनव्यवसाय हा वेगळ्या स्वरूपाचा, अधिक आव्हान देणारा असणार आहे एवढे नक्की!

सुनील मेहता

# वाचकांना आवाहन

**वाचकमित्रहो,**

आपल्याच अखंड प्रेमामुळे 'मेहता मराठी ग्रंथजगत' हे वाङ्मयीन मासिक चांगलेच लोकप्रिय होत आहे. आजमितीस या मासिकाचे दहा हजार सभासद असून सभासद संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. सदर मासिक इंटरनेटवरही उपलब्ध असल्याने जगभरातील मराठी वाचकांनीही याची उत्स्फूर्त नोंद घेतली आहे. आपल्या या भक्कम पाठिंब्यामुळे मराठी ग्रंथप्रसार चळवळीस नक्कीच हातभार लागेल असा विश्वास वाटतो.

आपणास माहिती आहेच, 'मेहता मराठी ग्रंथजगत'चा दिवाळी अंकही वैविध्यपूर्ण सदरांनी युक्त असतो. साहित्याच्या अनुषंगाने येणाऱ्या विषयांसोबतच इतर क्षेत्रातील अनेक माहितीपूर्ण तसेच मार्गदर्शक लेख या विशेषांकामधून मांडले जातात. 'वाचकमित्रांचा प्रत्यक्ष सहभाग' हे या विशेषांकाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. यानुसारच आगामी दिवाळी अंकासाठी आम्ही वाचकांसाठी एक खास लेखनस्पर्धा आयोजित केली आहे. 'आम्ही रसिक वाचक' असा सार्थ अभिमान बाळगणाऱ्या वाचकांसाठी ही खास स्पर्धा आहे.


'माझा वाचनप्रवास' या विषयावर आपण आपले अनुभव १५०० शब्दांत कळवायचे आहेत.

- **अनेक वर्षे मनात रेंगाळत राहिलेले पुस्तक कोणते?**
- **एखाद्या वाचक चळवळीत सहभाग घेता का?**
- **कोणत्या पुस्तकांनी/लेखकांनी झपाटून टाकले?**
- **साहित्यातील वेगवेगळ्या प्रवाहांचा आस्वाद घेतला का? की फक्त आवडणारी पुस्तकेच वाचली?**
- **वाचक म्हणून आपली काही खास भूमिका राहिली आहे का?**

अशा विविध मुद्द्यांवर आधारित लेख **२० ऑगस्टपर्यंत** 'मेहता मराठी ग्रंथजगत'च्या पत्त्यावर पाठवावेत ही विनंती,

संपादक
मेहता मराठी ग्रंथजगत





# साहित्यवार्ता

*** मसाप– शताब्दी सांगता समारंभ**

'राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर श्रेष्ठ ठरणारे गुणवत्तापूर्ण साहित्य मराठी भाषेत आहे; मात्र ते व्यापक प्रमाणावर विविध भाषांत अनुवादित होण्याची गरज आहे,' असे प्रतिपादन राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांनी केले. 'आम्हाला भैरप्पा, अनंतमूर्ती, गिरीश कर्नाड, सुभाष बंडोपाध्याय माहिती आहेत; पण शिरवाडकर, विंदा किती जणांना माहिती आहेत,' असा सवालही त्यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शतक महोत्सवी सांगता समारंभात केला. अध्यक्षपदी प्रा. के. रं. शिरवाडकर होते. राज्य मराठी विकास संस्थेच्या अध्यक्षा वसुंधरा पेंडसे-नाईक प्रमुख अतिथी होत्या. परिषदेचे अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार, कार्याध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर, प्रमुख कार्यवाह डॉ. वि. भा. देशपांडे आदी व्यासपीठावर होते. प्रा. शिरवाडकर आणि श्रीमती नाईक यांच्या हस्ते ग्रंथ आणि ग्रंथकार पारितोषिक विजेत्या लेखकांना गौरविण्यात आले.

'गुणवत्ता असूनही ज्ञानपीठासारखा सर्वोच्च पुरस्कार अवघ्या तीन साहित्यिकांना मिळावा,' याची खंत व्यक्त करून कर्णिक म्हणाले, ''साहित्य म्हणजे सहत्व, यातून ममत्व, एकत्व आणि अखेर देवत्वाकडे नेणारा प्रवास आहे. भाषेच्या माध्यमातून हा प्रवास घडतो. आपली श्रेष्ठ गुणवत्ता इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी अभिजात साहित्यकृती अनेकानेक भाषांत अनुवादित झाल्या पाहिजेत.''

शतकाचा महत्त्वपूर्ण टप्पा ओलांडताना परिषदेने मुलांसाठी स्वतंत्र विभाग तयार करावा, अशी सूचना वसुंधरा पेंडसे यांनी केली. असंख्य विषयांचे ज्ञान मराठीत आणण्यासाठी उत्तम अनुवादकांची फळी निर्माण झाली पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

साहित्य-संस्कृतीच्या विकासासाठी आवश्यक अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होत असल्याबद्दल प्रा. शिरवाडकर यांनी चिंता व्यक्त केली. लेखक, प्रकाशक आणि वाचक या त्रयींपैकी लेखकाचे स्वातंत्र्य धोक्यात आल्यास त्याचा सांभाळ करण्याची जबाबदारी वाचकाची असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. डॉ. देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. अनंत जोशी यांनी परिचय करून दिला. अनंत मनोहर

व रामनाथ चव्हाण यांनी पारितोषिक विजेत्यांच्या वतीने मनोगत मांडले. पां. के. दातार यांनी आभार मानले. कवयित्री सुहासिनी इर्लेकर व कवी सुधीर मोघे यांची मुलाखत डॉ. इनामदार व प्रा. मिलिंद जोशी यांनी घेतली.

### * 'पाडा'त शेतकऱ्यांच्या वास्तवतेचे चित्रण

बोलीभाषेचा चपखलपणे वापर करत 'पाडा' कादंबरीत शेतकऱ्यांची आर्तता कवेत घेत वास्तवतेचे चित्रण केले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पाठारे यांनी व्यक्त केले.

जळगाव जिल्हा मराठी बोली साहित्य संघांतर्फे अशोक कोळी यांच्या 'पाडा' कादंबरीचे पठारे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. त्या वेळी ते बोलत होते. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. एस. माळी अध्यक्षस्थानी होते.

पाठारे म्हणाले, मुन्शी प्रेमचंद हा तर नोबेलपेक्षाही मोठा साहित्यिक आहे. व्ही. एस. नायपॉलने इंग्रजीत कादंबऱ्या लिहिल्या. त्याला नोबेल पुरस्कार मिळाला असला तरी तो त्या दर्जाचा लेखक नाही. मराठीतील चार-पाच लेखक त्याच्यापेक्षा कितीतरी पटीने मोठे आहेत. जगण्याचा भाग साहित्यात आला पाहिजे. तीच आधुनिकता आहे.

आपल्याकडे सत्तरीच्या दशकात बदलाला सुरुवात झाली. शैक्षणिक धोरणातही खऱ्या अर्थाने बदल होत गेले. त्यामुळे अठरापगड जातीतून लिहिणारे आहेत. कोष्टी, कुणबी, कुंभारांची भाषा आहे. परंपरेने त्यांच्याशी संबंधित शब्द आहेत. मात्र, मराठीच्या आस्थेचे ते भाग झाले नाहीत. खानदेशापासून कोल्हापूरपर्यंत मराठी प्रमाणभाषा समजली जाते. विविध बोली भाषांमधून मराठी प्रमाणभाषा समृद्ध व्हायला हवी; तिला ताकद मिळायला हवी. जशी माणसं तशी भाषा असते. कोळींनी बोलीभाषेचा लेखनात अतिशय चपखलपणे वापर केला आहे. शाळेत गेल्यापासून आपण मातृभाषेपासून तुटतो. जगण्यातली मराठी आणि तुमची मराठी यांचं नातं घट्ट ठेवणं आवश्यक आहे. तसा प्रयत्न कोळींनी निश्चितच केला आहे.

कादंबरीविषयी बोलताना अशोक कोळी म्हणाले, की केळी उत्पादकांच्या आंदोलनाला अनेक पैलू आहेत. अशा प्रश्नावर एक तटस्थ साक्षीदार म्हणून संवेदनशील मनातून शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदना मी कादंबरीत मांडल्या आहेत.

### * मराठीतील सकसता समजावण्याचे काम साहित्य संस्थांचे : शिंदे

मराठीच्या भवितव्याची काळजी करण्याचे कारण नाही. सातासमुद्रापलीकडेही आज मराठी जपली जात आहे. मराठीतील सकसता कुणाला कळत नसेल तर ती समजावण्याचे काम साहित्य संस्थांचे आहे, असे प्रतिपादन केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.



प्राचार्य राम शेवाळकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी 'महाराष्ट्र साहित्य परिषदेचा गौरव पुरस्कार' प्रसिद्ध लेखक प्रा. बाळ गाडगीळ यांना; तर 'डॉ भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार' पुणे मराठी ग्रंथालयाचे कार्यवाह मुकुंद अनगळ यांना प्रा. शेवाळकर यांच्या हस्ते देण्यात आला. परिषदेच्या संकेतस्थळाचे उद्‌घाटन श्री. शिंदे यांच्या हस्ते झाले. परिषदेच्या शतकपूर्ती स्मरणिकेचे व गेल्या ९२ वर्षांतील पत्रिकांच्या लेख व लेखक सूचीचे प्रकाशन प्रा. शेवाळकर यांनी केले.

'मराठी असे आमुची मायबोली' या माधव ज्यूलियन यांच्या ओळी ऐकवत शिंदे म्हणाले, "मराठी साहित्य आनंद देणारे तर हवेच; पण त्यात चिंतनशील आणि वैचारिक लेखनाची निर्मिती भाषेला समृद्ध करणारी ठरेल."

समाजाच्या सर्व स्तरांतील वाङ्मयीन जाणिवांना, आकांक्षांना आधार देण्याचे काम साहित्य परिषदेसारख्या संस्थांनी करावे आणि अभिरुचीची जोपासना करावी. आपला वाङ्मयीन व्यवहार ग्रंथालय चळवळींशी जोडून नेतृत्वाचे दायित्व साहित्य संस्थांनी पत्करले पाहिजे, अशी अपेक्षा प्रा. शेवाळकर यांनी व्यक्त केली.

### * ज्ञानपीठ मानकऱ्यांना अभिवादन

'गेली चार तपे माझे लिखाण वाचणाऱ्या मराठी वाचकांचा मी ऋणी आहे... या शारदेच्या मंदिरात साहित्याची सेवा करताना कुठेतरी कोपऱ्यात उभा आहे. तोच आनंद मोठा आहे. पण मराठीला अजूनही मनासारखं काही देता आलं नाही ही खंत आहे...!' मराठीतला पहिला ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणाऱ्या विष्णू सखाराम उर्फ वि. स. खांडेकरांचा त्यांच्या उत्तरायुष्यातला आवाज. तितकाच तरुण, कोवळा आणि काहीसा अनुनासिक.

डॉ. माधवी वैद्य यांनी सादर केलेल्या ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या तीन मराठी साहित्यिकांना अभिवादनाच्या कार्यक्रमात 'भाऊसाहेबां'चा हा आवाज ऐकल्यावर पुणेकरांच्या अंगावर रोमांच उभे राहिले! पुणे आकाशवाणीवर उपलब्ध असणारा हा या थोर साहित्यिकाचा आवाज त्यांच्या निधनानंतर तब्बल ३० वर्षांनी ऐकायला मिळाला. १९७४ मध्ये 'ययाती' कादंबरीमुळे ज्ञानपीठ पुरस्कार मराठीकडे खेचून आणणारा हा जीवनाचा साहित्यातील सौंदर्यापेक्षा मांगल्यत्वातून शोध घेणारा कलावंत.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शतकपूर्ती सोहळ्यातील सांगता समारंभापूर्वी हा कार्यक्रम सादर झाला. खासदार सुरेश कलमाडी यांच्या हस्ते ज्येष्ठ साहित्यिक आणि कार्यकर्त्यांचा यावेळी सत्कारही करण्यात आला.

'ययाती'पेक्षा मला माझी 'उल्का'च जास्त आवडते' असे अभिमानाने सांगणारे विसं त्यातील त्यांची 'एकच पणती मिणमिणती' ही कविताही तेवढीच रोमँटिक

आणि हृदयाला भिडणारी आहे. तीही या कार्यक्रमात सादर करण्यात आली.

सामाजिक सामिलकी (बांधिलकी नव्हे) मानणाऱ्या कुसुमाग्रजांची 'काढ सखे तुझे गळ्यातील चांदण्याचे हात' आणि 'काही बोलयाचे आहे पण बोलणार नाही', तर विंदांचे 'मागू नको सखा रे' हे प्रेमगीतही गाऊन सादर करण्यात आले.

### * नटनट्यांच्या जागी गोष्टीरूप संदेश!

जून महिना जवळ आला की बाजारात वह्या-पुस्तकांच्या खरेदीसाठी रीघ लागते. यात वह्यांची खरेदी ही बहुतेकवेळा त्यावरील मुखपृष्ठ पाहून केली जाते. गेल्या काही वर्षांपासून ही जागा नटनट्यांच्या आणि खेळाडूंच्या चित्रांनी बळकावली असून मुंबई ग्राहक पंचायतीने मात्र याविरोधात एक विधायक उपाय शोधला आहे.

वह्यांच्या मार्फत टिप्स देण्याची युक्ती संस्थेने लढवली आहे. फसव्या जाहिरातींना भुलू नये, बाहेरचे पदार्थ खाऊ नयेत, विजेची 'बचत' कशी करावी, फास्टफूडचे दुष्परिणाम, सकस आहाराचं महत्त्व इत्यादी विषय वह्यांच्या मुखपृष्ठावर अभिनव पद्धतीने मांडण्यात आले आहेत.

वही या माध्यमाचा वापर विद्यार्थ्यांना विधायक माहिती पुरविण्यासाठी व्हावा या उद्देशाने हा प्रयत्न करण्यात आला, असे मुंबई ग्राहक पंचायतीचे उपाध्यक्ष शिरीष देशपांडे यांनी सांगितले. ग्राहक पंचायतीच्या 'अॅड-वॉच क्लब' या विभागातर्फे ही योजना प्रत्यक्षात आणण्यात आली.

### * 'शब्द आभाळाएवढे साकारण्याची ताकद नटाकडे पाहिजे'

आभाळाएवढ्या कल्पना चिमूटभर शब्दांत मांडण्याचे नाटककाराचे कसब असते. तर चिमूटभर शब्द हे आभाळाएवढे साकारण्याचे आव्हान पेलण्याची ताकद नटाकडे असली पाहिजे, अशी अपेक्षा ज्येष्ठ नटवर्य प्रभाकर पणशीकर यांनी व्यक्त केली.

जनसेवा फाउंडेशन, कास्प आणि रोटरी क्लबच्या वतीने आयोजित 'भेटू एका दिग्गजा'ला या उपक्रमांतर्गत पंतांच्या मुलाखतीचा कार्यक्रम रंगला. मुलाखत सुधीर गाडगीळ यांनी घेतली. 'विकत घेतला न्याय', 'महाराणी पद्मिनी', 'अंधार माझा सोबती' यासारख्या नाटकांच्या आठवणी, त्यातील भूमिका आणि त्यावेळच्या घटना यांचा धावता आढावा घेत पंतांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.

अभिनेता आणि नाटककार यांच्यातील फरक स्पष्ट करताना पणशीकर म्हणाले की कोणतीही भूमिका करताना ती नटाच्या अंगात शिरावी लागते. भूमिकेच्या माध्यमातून नाटककाराला रंगभूमीवर काय साधायचे हे त्या नटाला कळायला हवे. त्यामुळे त्या नाटकाला एका उंचीपर्यंत आणि परिणामांपर्यंत नेऊ शकणारा



तो खरा अभिनेता अशा शब्दांत त्यांनी स्पष्टीकरण दिले.

यावेळी डॉ. सदाशिव शिवदे यांच्या 'माझी गुरं माझी माणसं' या पुस्तकाचे प्रकाशन आकाशवाणीचे संचालक शरद भोसले यांच्या हस्ते झाले. मोहन धारिया, उत्कर्ष प्रकाशनचे सुधाकर जोशी, ज्योती तोष्णीवाल, डॉ. शिवदे यांनी मनोगते व्यक्त केली. डॉ. विनोद शहा यांनी प्रास्ताविक केले.

### * 'मराठीत लिहिले, तर वाचणार कोण?'

''माझे पहिले पुस्तक 'सात सक्कम् त्रेचाळीस'च्या अवघ्या हजार प्रती खपायला २७ वर्षे लागली. साहित्य अकादमी पुरस्कारविजेती 'ककोल्ड' कादंबरी रेखा सबनीस यांनी अनुवादित करून तीन वर्षे उलटली; तरी अद्याप तिला प्रकाशक मिळालेला नाही. मराठीमध्ये मी नव्याने लिहिले, तर वाचणार कोण,'' असा सवाल प्रसिद्ध इंग्रजी कादंबरीकार किरण नगरकर यांनी केला.

'असोसिएशन ऑफ ब्रिटिश स्कॉलर्स'तर्फे आयोजित कार्यक्रमात नगरकर यांनी आपल्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'गॉड्स लिटिल सोल्जर' कादंबरीतील अंशाचे अभिवाचन केले. व्यासपीठावर पुणे विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाचे प्रमुख प्रा. अनिकेत जावरे आणि 'इंटरनॅशनल बुक सर्व्हिस'चे उपेंद्र दीक्षित होते. माझी नवी 'गॉड्स' कादंबरी कठीण आणि वेगवान आहे, असे सांगून नगरकर म्हणाले, 'मी एक कथाकथनकार आहे. गोष्ट वाऱ्यासारखी सांगितली गेली पाहिजे. त्या वाऱ्यातून मग अनंत नाद निघतात. संदेश देण्याचा माझा प्रयत्न नसतो. गोष्ट सांगता-सांगता मजा आली पाहिजे. त्याखेरीज अन्य काही कथनातून घडलेच, तर तो निराळा भाग आहे.'

### * दहावे नवोदित साहित्य संमेलन

''ग्रामीण समाजाची सर्वांगांनी झालेली कोंडी नवोदित ग्रामीण साहित्यिकांनी समजून घेतली पाहिजे. त्यांनी आत्मकेंद्री वृत्तीने स्फूट स्वरूपाच्या कथा-कविता लिहिण्यापेक्षा सद्यस्थितीचा वेध घेणारे लेखन करावे,'' असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी केले.

'साहित्य कलायात्री'तर्फे आयोजित दहाव्या नवोदित मराठी साहित्य संमेलनाचे प्रा. ना. स. फरांदे यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

व्यासपीठावर संमेलनाचे स्वागताध्यक्ष आमदार प्रकाश देवळे, ज्येष्ठ कवी नारायण सुर्वे, गीतकार जगदीश खेबुडकर, दादासाहेब लोणकर आदी होते. फरांदे म्हणाले, ''जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये प्रस्थापितांची मक्तेदारी, दांडगाई निर्माण झाली आहे. नवोदितांची वाटचाल कुंठित होत आहे. साहित्याने जीवनदर्शन घडविण्याबरोबरच जीवनशिक्षण द्यावे. साहित्याने केवळ रंजन करू नये; तर अंजनसुद्धा घालावे.''

सुर्वे म्हणाले, ''आमच्या पिढीच्या तुलनेत आजचा काळ नवोदितांना अनुकूल आहे. साहित्याच्या क्षेत्रात विविध प्रवाह येत आहेत, ही स्वागतार्ह बाब आहे.''

*** महाराष्ट्र साहित्य पत्रिकेची सूची**

'मराठी साहित्य पत्रिका' या नियतकालिकाच्या १९१३ ते २००४ पर्यंतच्या ९२ वर्षांच्या काळातली सर्व माहिती लेखक, लेख आणि त्याची विस्तृत विषयसूची सिद्ध झाली आहे.

मराठी साहित्यातली ही एक स्वागतार्ह घटना असल्यामुळेच शंभरी पूर्ण करणाऱ्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शतकपूर्ती सांगता सोहळ्यात केंद्रीय उर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते सूचीचं समारंभपूर्वक प्रकाशन झाले.

या सूचीमुळे भाषेच्या अभ्यासकांना मराठी भाषा, साहित्य आणि त्यातल्या विविध विषयांवरच्या चर्चा यासंदर्भातली सर्व माहिती मिळू शकेल. औरंगाबाद विद्यापीठातल्या मराठीच्या प्राध्यापिका डॉ. मीरा धांडगे यांनी ही सूची सिद्ध केली आहे. पत्रिकेच्या १९१३ ते २००४ पर्यंतच्या ९२ वर्षांच्या काळातली सर्व माहिती त्यांनी एकत्रितपणे उपलब्ध करून दिली आहे.

१८०५ मध्ये 'मराठी भाषेचे व्याकरण' यावर पहिलं छापील पुस्तक लिहिणाऱ्या विल्यम केरीपासून १९४७ पर्यंत रवीकिरण मंडळातल्या कवींची माहिती सूचीस्वरूपात लिहिण्यासाठी स्वत:चे आयुष्य खर्ची घालणारे शंकर गणेश दाते यांच्यापासून सूचीवाङ्मयाची थोर परंपरा सुरू होते. मराठी साहित्याला वाहिलेल्या 'अनुष्टुभ' या दर्जेदार मासिकाची २५ वर्षांची साहित्यसूची तेवढ्याच आत्मीयतेने हातावेगळ्या करणाऱ्या डॉ. धांडगे यांच्या 'मराठी साहित्यपत्रिका सूची'ने मराठी साहित्य संशोधनकार्यात मोलाची भर घातली आहे.

२७ मे १९०६ रोजी पुण्याच्या मळेकर वाड्यातली मराठी साहित्य परिषदेची स्थापना आणि त्यानंतर तत्कालीन 'विविधज्ञान विस्तार' या नियतकालिकाला पुरवणी म्हणून सुरू झालेली 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' गेली नऊ दशके वाचकांची अभिरूची संपन्न करण्यास उपयुक्त ठरली.

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या संपादकांमध्ये ना. गो. चापेकर, माधवराव पटवर्धन उर्फ माधव ज्यूलियन, के. नारायण काळे, डॉ. रा. श्री. जोग, श्री. म. माटे, य. दि. बेडेकर, श्री. के. क्षीरसागर, स. गं. मालशे, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. हे. वि. इनामदार, डॉ. आनंद यादव, डॉ. भीमराव कुलकर्णी, शंकर सारडा यांच्यापासून ह. ल. निपुणगे, डॉ. अ. वा. कुलकर्णी, सु. प्र. कुलकर्णी यांच्यापर्यंत ही मालिका येऊन पोहोचते.

*** नरसिंह राव यांचा पुस्तक लिहिण्यामागचा उद्देश काय, हाच प्रश्न– माधव गोडबोले**

बाबरी मशीद प्रकरणी आपल्याला बळीचा बकरा बनविले गेले असे म्हणणाऱ्या



तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांनी 'अयोध्या ६ डिसेंबर १९९२' या पुस्तकात त्यांना कोणी बकरा बनविला यावर काहीच प्रकाशझोत टाकलेला नाही. उत्तर प्रदेशात राष्ट्रपती राजवट का लावली नाही? याचेही उत्तर मिळत नसल्याने पुस्तक लिहिण्याचा उद्देश काय? असा प्रश्न उपस्थित होत असल्याचे तत्कालीन केंद्रीय गृहसचिव माधव गोडबोले यांनी सांगितले.

माजी पंतप्रधान नरसिंह राव यांनी लिहिलेल्या '६ डिसेंबर १९९२' या पुस्तकातील विवेचन आणि सत्य परिस्थिती जाणून घेण्यासाठी इंटरनॅशनल बुक सर्व्हिस व विष्णूपंत चितळे प्रतिष्ठान यांच्या वतीने गोडबोले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

नरसिंह राव यांच्या काळात बाबरी मशीद पाडण्यात आली होती. या घटनेचे देशभर तीव्र पडसाद उमटले. राव यांनी या घटनेबाबत पुस्तक लिहिले आणि ते स्वत:च्या मृत्यूनंतर प्रकाशित करावे अशी अट घातली होती. त्यानुसार हे पुस्तक अलीकडेच प्रकाशित करण्यात आले. राव या पुस्तकात तत्कालीन परिस्थितीचा किंवा त्यांनी उत्तर प्रदेशात राष्ट्रपती राजवट का लागू केली नाही यावर प्रकाशझोत टाकतील अशी अपेक्षा अनेकांना होती. मात्र घटनात्मक अडचणीमुळे आपण राष्ट्रपती राजवट लागू केली नाही असे सांगून राव यांनी याबाबत काहीच स्पष्ट केले नाही. त्यामुळे लाखो देशवासीयांच्या मनातील प्रश्न अद्याप तसाच शिल्लक राहिला आहे. गृह आणि कायदा मंत्रालयाने उत्तर प्रदेशातील परिस्थिती हाताबाहेर जात असल्याने मशिदीच्या सुरक्षिततेसाठी उत्तर प्रदेशात कलम ३५६ अंतर्गत राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस केली होती. तसेच सुरक्षिततेबाबत आपत्कालीन आराखडाही तयार केला होता. तोही राव यांनी नाकारला. त्याऐवजी राज्यपालांचा सल्ला ऐकून त्यांनी राष्ट्रपती राजवट लावणे टाळले असे पुस्तकात लिहिले आहे.

आजपर्यंत ३५६ कलमाचा गैरवापर अनेकदा झाला. मात्र पहिल्यांदा या कलमाचा योग्यवेळी वापर करण्याची संधी आली असताना तत्कालीन केंद्र सरकारने त्याचा वापर केला नाही. गृह मंत्रालयालाही बाबरी मशीद पाडली जाईल याचा अंदाज नव्हता असे गोडबोले यांनी सांगितले.

*** मोनालिसाचा आवाज**

'द दा विंची कोड' या पुस्तकामुळे लिओनार्दो आणि मोनालिसा यांच्याबद्दलचे कुतूहल पुन्हा एकदा उफाळून आले आहे. ही सदैव हसणारी मोनालिसा कशी बोलत असेल, लिओनार्दोचा आवाज कसा असेल, असेही प्रश्न काहींना पडले असतील. या प्रश्नांवर जपानमधील एका प्रयोगशाळेने उत्तर शोधले आहे. या

प्रयोगशाळेने लिओनार्दो आणि मोनालिसाचा आवाज तयार केल्याचा दावा केला आहे.

चित्रांचा अभ्यास करून तयार केलेले हे आवाज या दोघांच्या मूळ आवाजाशी बरेच साम्य राखून असल्याचे जपान अॅकोस्टिक लॅबतर्फे सांगण्यात आले आहे. 'द दा विंची कोड' या चित्रपटाच्या जाहिरातीसाठी हे आवाज तयार करण्यात आले आहेत. मोनालिसाचे संपूर्ण चित्र उपलब्ध नसल्याने मोनालिसाबद्दल काही अंदाज बांधण्यात आले आहेत. चित्रातील सरळ नाकामुळे तिचा आवाज काहीसा नाकातून बोलल्यासारखा आहे, असे या प्रयोगशाळेचे प्रमुख मत्सुमीस सुझुकी यांनी सांगितले. सुझुकी याआधी पोलिसात नोकरीत करत होते. आवाजाचा अभ्यास करणे हाच त्यांचा पेशा आहे. लिओनार्दोसाठी त्यांनी त्याच्या साठीतला आवाज निवडला आहे. हे आवाज लिओनार्दो आणि मोनालिसाचे मूळ आवाज म्हणून लोकांच्या लक्षात राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

### * 'लाल' केरळातील लोकशाहीचा इतिहास

लोकशाही प्रणालीत कम्युनिस्टांची सत्ता असलेले राज्य, असा लौकिक देशातच नव्हे, तर जगात सर्वप्रथम मिळविणारे राज्य... केरळ! 'देवभूमी' असे वर्णन करण्यात येणाऱ्या केरळमधील लोकशाही प्रक्रियेतील सोनेरी कालखंडाच्या व विधानसभेतील दुर्मिळ क्षणांच्या स्मृती जागृत करणारे एक अनोखे संग्रहालय राजधानी तिरुअनंतपुरमध्ये साकारले आहे.

लाल रंगाच्या प्राचीन दगडी इमारतीतील या संग्रहालयाचे उद्घाटन मुख्यमंत्री ओमेन चंडी यांच्या हस्ते झाले. नंबुद्रीपाद ते ओमेन चंडी असा दीर्घ प्रवास उलगडणारे अशा प्रकारचे हे देशातील पहिलेच संग्रहालय असावे.

स्वातंत्र्योत्तर पहिल्या सरकारातील मंत्रिमंडळातील मंत्र्यांपासून आतापर्यंतच्या सर्व मंत्रिमंडळांची छायाचित्रे या संग्रहालयात आहेत. सुसज्ज डिजिटल मल्टिमीडिया सभागृहही आहे. पोर्तुगीज, डच व ब्रिटिशांच्या जोखडाखाली 'केरळ'ची छायाचित्रेही लावली आहेत.

### * बिल क्लिंटन यांचे पुस्तक

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा प्रशासकीय कामाचा अनुभव पुस्तकाच्या स्वरूपात वाचकांना मिळाल्यास ते पुस्तक गाजणार यात शंकाच नाही. ही शक्यता हेरूनच अल्फर्ड नूफ यांनी माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्याशी पुस्तकासाठी करार केला आहे. सार्वजनिक सेवा आणि प्रत्येक नागरिकाचा त्यातील सहभाग या विषयावर हे पुस्तक असेल. पुस्तकाचे नाव ठरलेले नाही. मात्र, हे पुस्तक वाचकांच्या मनाला भिडेल अशी आशा क्लिंटन व्यक्त करतात. राष्ट्राध्यक्षपदाचा काळ आणि त्यानंतर सहा वर्षांत विविध स्थळांना आणि व्यक्तींना दिलेल्या भेटी



यांचा छोट्या-मोठ्या कथा या पुस्तकात असणार आहेत. काही सामान्य माणसेही समाजात फार मोठे बदल घडवतात, हे क्लिंटन यांनी हेरले आहे. अशा व्यक्तींची ओळख या पुस्तकातून होईल. त्यासाठी ते अशा काही व्यक्तींना पुन्हा भेटणार आहेत. या आगामी पुस्तकासाठी क्लिंटन यांना किती मानधन मिळणार आहे, हे जाहीर झालेले नाही. त्यांना 'माय लाईफ' या आत्मचरित्रासाठी सुमारे एक कोटी डॉलर मिळाले होते.

### * प्रायोगिक रंगभूमीचा जबाबदार प्रेक्षक घडावा

''मराठी प्रायोगिक रंगभूमीवर सध्या आशादायक परिस्थिती दिसते आहे. नवे धुमारे फुटू लागले आहेत. या प्रक्रियेत रंगभूमीचा प्रेक्षक म्हणून या नव्या प्रयत्नांना दाद देण्याची माझी जबाबदारी आहे, असे मत ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. श्रीराम लागू यांनी व्यक्त केले.

''कलापिनी-तळेगाव दाभाडे आणि प्रतिक प्रकाशन यांच्या वतीने ग्रीक नाटककार सोफोक्लीसच्या 'इडिपस अॅट कोलोनस' या नाट्यकृतीचे 'बहिष्कृत ओदिपस' हे मराठी रूपांतर डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले.

'बहिष्कृत ओदिपस'चा प्रयोग पाहताना मी गुंतून गेलो. असा थरारक प्रयोग मी अनेक वर्षांत पाहिला नव्हता. प्रयोगाचे दिग्दर्शन मीनल कुलकर्णी यांनी कल्पकतेने केले आहे, अशा शब्दांत कौतुक करून डॉ. लागू म्हणाले, ''जागतिकीकरणाच्या कब्जातून रंगभूमीही सुटलेली नाही. त्यामुळे आपली ओळख राष्ट्रीय पातळीपुरती मर्यादित न ठेवता जागतिक स्तरावर निर्माण करावी लागेल. आपली संवेदनशीलता आणि मनोरंजनाच्या आपल्या कल्पनेवर विविध माध्यमांतून आज पाशवी आक्रमणे होत आहेत. या परिस्थितीत प्रायोगिक रंगभूमीने योग्य ते शोध आणि बोध घेणे गरजेचे आहे. कलापिनीने हे या प्रयोगातून सिद्ध केले आहे, याच मुद्द्यावर आपण सर्व गांभीर्याने एकत्र आलो नाही, तर नामशेष होण्याचा धोका आहे.''

जुन्या अभिजात नाटकांत सतत काहीतरी नवे शोधणे, वेगळेपण आणणे महत्त्वाचे आहे. आजच्या काळात जाणवणारा आशय मांडणे ही तर प्रायोगिक रंगभूमीची नास आहे. ती पकडून ओदिपससारखी क्लासिकल नाटके जरूर करावीत, असा सल्लाही त्यांनी दिला.

### * 'कुलदैवत खंडोबा'

संत, शाहीर, लेखक आणि संशोधक यांना समजलेला खंडोबा आणि त्याची १३ तीर्थस्थाने; तसेच कथा, ऐतिहासिक दाखले याची समग्र माहिती देणारा 'कुलदैवत खंडोबा' हा ग्रंथ लवकरच येत आहे. ग्रंथाचे लेखक विठ्ठल

ठोंबरे यांनी आठ वर्षांच्या परिश्रमातून तो तयार केला आहे.

महाराष्ट्रात व कर्नाटकमध्ये खंडोबाची १३ तीर्थस्थाने आहेत. त्याबरोबरच म्हाळसेची नेपाळमध्ये मंदिरे आहेत. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, बसवेश्वर, चक्रधर स्वामी आदींनी खंडोबाची सांगितलेली महती; तसेच अमेरिका व युरोपमधील संशोधकांनी केलेले संशोधन, बाणाई व म्हाळसेचा विवाह, वाघ्या-मुरळीची कथा याबद्दल ऐतिहासिक व पौराणिक दाखले देऊन आजपर्यंत लिखाण झाले नाही. त्यामुळे जाती-धर्माच्या भिंती पार करून अनेकांचे दैवत बनलेल्या 'खंडोबा'वरील सविस्तर लिखाण या ग्रंथात आहे.

ठोंबरे यांनी अडीच वर्षांपूर्वी एका औषध कंपनीमधील 'बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर'ची नोकरी सोडून देऊन हा ग्रंथ लिहिला. छपाईसाठी येणारा खर्च परवडणारा नसल्याने छपाईचे काम रखडले आहे, असे लेखक विठ्ठल ठोंबरे यांनी सांगितले.

## * तेरे सूर मेरे गीत पुस्तकाचे प्रकाशन

''परिवर्तनाचा प्रभाव प्रत्येक क्षेत्रावर आहे; प्रत्येक पिढी स्वत:ची भाषा व संस्कृती घेऊन येते. त्यामुळे संस्कृतीतील बदलानुसार कामातही बदल करावे लागतात. हे बदल त्या काळातील लोकांच्या पसंतीस पडतात. त्यामुळे नव्या पिढीतील प्रत्येक गोष्ट वाईट आहे, असे म्हणता येणार नाही. या काळातही चांगले गीतसंगीत तयार होईल,'' असे मत गीतकार समीर यांनी व्यक्त केले.

सुभाषचंद्र जाधव यांनी लिहिलेल्या 'तेरे सूर मेरे गीत' पुस्तकाचे प्रकाशन समीर यांच्या हस्ते झाले. 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ कलाकार देवेन वर्मा, संगीतकार अतुल, 'टाटा मोटर्स'च्या मनुष्यबळ विकास विभागाचे उपसरव्यवस्थापक सुहास राजे, प्रतिक प्रकाशनचे प्रवीण जोशी उपस्थित होते.

समीर म्हणाले, ''आपला समाज जुन्या आठवणींत अधिक रमणारा आहे. 'मुगले आझम' व 'मदर इंडिया' यांसारखे चित्रपट पुन्हा तयार झाले, तर तशी गाणीही पुन्हा लिहिली जातील.''

''चित्रपटसृष्टीतील वाढत्या व्यावसायिकतेमुळे गीतकारांना सध्या अनेक तडजोडी कराव्या लागत आहेत. चांगली गीते लिहिण्याची क्षमता असूनही, गीतकारांना अभिव्यक्त होता येत नाही,'' अशी खंत देवेन वर्मा यांनी व्यक्त केली.

## * हस्तलिखितांसाठीही आता होमिओपॅथी!

जुनी पुस्तके आणि हस्तलिखितांचे आरोग्य सांभाळण्यासाठी होमिओपॅथीतील औषधांचा उपयोग होणार आहे.

होमिओपॅथीतील औषधांचा माणसांचे आरोग्य सांभाळण्यासाठी उपयोग केला जातो. या औषधांचे कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत. हेच सुरक्षाकवच आता जुनी पुस्तके आणि हस्तलिखितांचे बुरशीपासून संरक्षण करण्यासाठी वापरता येणार आहे. लखनौ येथील 'नॅशनल रिसर्च लॅबोरेटरी फॉर कन्झर्व्हेशन ऑफ कल्चरल प्रॉपर्टी' या संस्थेने याबाबत संशोधन केले आहे. डॉ. शशी धवन यांच्या नेतृत्वाखाली १९९५ पासून चाललेल्या या प्रयोगात होमिओपॅथीतील काही औषधे कागदावरची बुरशी रोखण्यास उपयुक्त ठरतात, असे सिद्ध झाले आहे.

सल्फर आयओडेटम, पेट्रोलियम, आर्सेनिकम, रुमक्स यांचा बुरशी रोखण्यास अधिक परिणामकारक उपयोग होत आहे; तसेच त्याच्या जुन्या कागदावर किंवा त्यावरील शाईवर कोणताही दुष्परिणाम होत नाही, असे संस्थेच्या 'पेपर डिव्हिजन'च्या निरीक्षणात आढळले आहे.

## * पारितोषिकांची उधळण थांबवा

'रंगभूमीचे पुरस्कार मिळविण्यासाठी चालणारे 'फोन्स', गाठी-भेटी आणि 'पार्ट्या' बंद करा, या मार्गाने बक्षिसे आणि पारितोषिकांची उधळण चालली असून, त्याला रोखण्यासाठी 'कोड मार्किंग'ची पद्धा सांस्कृतिक विभागातर्फे राबविण्यात यावी,' असे मत प्रसिद्ध अभिनेते विक्रम गोखले यांनी 'सृजन गौरव' पुरस्काराचे वितरण करताना केले. एकांकिका लेखन स्पर्धेतील पारितोषिकेही प्रदान करण्यात आली.

ते म्हणाले, ''या पद्धतीमध्ये परीक्षक कोण अथवा स्पर्धक कोण, या बाबी एकमेकांना समजू नयेत, यासाठी प्रत्येकाला स्वतंत्र 'कोड' द्यावा. म्हणजे परीक्षकांना खूष करण्याचे अथवा स्पर्धकांना झुकते माप देण्याचे उद्योग आपोआप बंद होतील. सर्व स्पर्धांमध्ये या पद्धतीच्या अंमलबजावणीचा विचार सांस्कृतिक खात्याने करावा.''

श्री. गोखले म्हणाले, ''मराठी रंगभूमी आणि कला क्षेत्राशी आपला जिव्हाळा असल्याचे आभास निर्माण करणारे अनेक जण आहेत; पण रंगभूमीविषयी सतत टीकेचा सूर काढण्याऐवजी ती जिवंत राहावी यासाठीचा प्रयत्न होताना दिसत नाही.''

श्री. गोखले यांनी 'सृजन स्क्रिप्ट बँक' या उपक्रमासाठी ११ हजार १११ रुपयांची देणगी जाहीर केली. परीक्षकांतर्फे राज काझी यांनी मनोगत व्यक्त केले.

## * ग्रामीण साहित्याची चळवळ संपली : यादव

''ग्रामीण साहित्याची चळवळ आता संपली असली तरी ग्रामीण साहित्याचे भवितव्य उज्ज्वल आहे,'' असे मत डॉ. आनंद यादव यांनी व्यक्त केले. 'साधना मीडिया सेंटर' येथे श्री. यादव यांच्या समग्र साहित्य प्रदर्शनाचे उद्घाटन सीरियात कार्यरत असणारे भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी ज्ञानेश्वर मुळे

यांच्या हस्ते झाले. शहरातील साहित्याचे केंद्र ग्रामीण भागाच्या दिशेने सरकत असल्याबद्दल समाधान व्यक्त करून यादव म्हणाले, ''खेड्यांमध्ये सुधारणा होत आहेत. त्यांचे आधुनिकीकरण होत आहे. मात्र, खेड्यांचे शहरीकरण होत असल्याची संकल्पना चुकीची आहे.''

### * कीर्तन जुगलबंदी

अभंग आणि ओव्यांची एकापाठोपाठ होणारी गुंफण, त्यातून उलगडणारे इतिहासाचे अनेक दाखले आणि संतांच्या साहित्याचा युवा वाणीतून उमटणारा ध्वनी अशा वातावरणात कीर्तन जुगलबंदीचा अनुभव घेता आला!

१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याला दीडशे वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त 'मनोरंजन'तर्फे आयोजिण्यात आलेल्या कार्यक्रमात श्रेयस बडवे आणि मानसी उपाध्ये यांच्यामध्ये कीर्तन जुगलबंदी रंगली. खासदार श्रीनिवास पाटील, विभागीय आयुक्त प्रभाकर करंदीकर, दादा जोशी, नगरसेवक डॉ. सतीश देसाई आदी याप्रसंगी उपस्थित होते.

समर्थ रामदास यांचा 'सुपुत्र संसारी कुळाचे मंडन, वंश उद्धारण हरिभक्ती।...' आणि संत जनाबाईंचा 'स्त्री जन्म म्हणुनि न व्हावे उदास...' हे अभंग श्रेयस व मानसी यांनी कीर्तनासाठी घेतले. छत्रपती शिवराय, तानाजी मालुसरे, शेलारमामा, रायबा यांची उदाहरणे देत श्रेयसने सुपुत्र कसा कुळाचा उद्धार करतो, हे सांगितले, तर जिजाबाई, झाशीची राणी आदींची उदाहरणे देत स्त्रीमुळेच सुपुत्र घडतो, असे मानसीने सांगितले. मात्र देश आणि समाज घडवायचा असल्यास सुपुत्र व सुपुत्री दोन्हींची गरज असल्याचे सांगून, कीर्तन जुगलबंदीची सांगता झाली.

खासदार पाटील म्हणाले, ''कीर्तनाची उज्ज्वल परंपरा लाभलेल्या महाराष्ट्रात कीर्तन टिकविण्यासाठी त्याच्या सादरीकरणात बदल करून सादर केलेली जुगलबंदी कीर्तनाची पताका दूरवर फडकावेल.''

### * 'निरोप्या'तील लेखांच्या पुस्तकाचे प्रकाशन

शंभर वर्षांपासून प्रकाशित होत असणाऱ्या 'निरोप्या' मासिकाने स्वातंत्र्य व प्रजासत्ताक दिन, संयुक्त महाराष्ट्र चळवळ आदी महत्त्वपूर्ण घटनांची दखल घेतली नाही. त्याबाबत योग्य ती टिप्पणी 'निरोप्या : संपादकीय स्पंदने' पुस्तकात आली आहे, असे ज्येष्ठ लेखक ज. श. आपटे यांनी सांगितले. 'निरोप्या' या ख्रिस्ती मिशनऱ्यांनी सुरू केलेल्या मासिकांवर जयंत गायकवाड यांनी लिहिलेल्या 'निरोप्या : संपादकीय स्पंदने' पुस्तकावर चर्चेत ते बोलत होते. याप्रसंगी रवींद्र पिंगे, 'निरोप्या'चे संपादक पिठेकर, राजा कांदळकर उपस्थित होते.

मासिकाचा संपूर्ण इतिहास या पुस्तकात अभ्यासपूर्ण मांडला आहे. असे साहित्य जतन करण्याची आवश्यकता आहे, असे पिंगे यांनी सांगितले. राम



जगताप यांनी आभार मानले.

### * 'वाचकांना काही हवंय म्हणून लिहीत नाही'

''मी स्त्री म्हणून लिहीत नाही. लेखनाला मी स्वार्थी व्यवहार मानते. स्वत:ला व्यक्त करण्याकरिता मी लिहिते. वाचकांना काही हवंय म्हणून लिहीत नाही,'' असे मत प्रसिद्ध लेखिका मेघना पेठे यांनी व्यक्त केले.

'आंधळ्याच्या गायी', 'नातिचरामि' कादंबऱ्यांच्या निमित्ताने चर्चेत आलेल्या पेठे यांची प्रकट मुलाखत प्रा. रूपाली शिंदे यांनी घेतली. त्या वेळी त्या बोलत होत्या. 'साधना मीडिया सेंटर'ने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. 'जगण्याच्या प्रक्रियेचा लेखन हा एक अनुषंग आहे,' असे नमूद करून पेठे म्हणाल्या, ''लेखनावर येणाऱ्या प्रतिक्रिया हासुद्धा एक अनुषंग आहे. लेखनात वैविध्य राखणे मला पटत नाही; कारण लेखक म्हणजे काही 'डिपार्टमेंटल स्टोअर' नव्हे. लग्नसंस्थेविषयी माझी भूमिका नीतिमत्तावादी नाही, तर मनुष्यवादी आहे. विवाहबाह्य संबंध हे निव्वळ आजचे नव्हे; तर आजवरचे वास्तव आहे. आनंदाने एकटे जगणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत अधिक आढळेल. जगण्यामरण्याचा प्रश्न उभा राहतो, तेव्हा योग्य-अयोग्य हा विचार मागे पडतो. जे तुम्ही बरोबर मानता, ते आजवरचे असते; कायमचे नाही. नीतिमत्ता ही स्वत:च्या जगण्यातून शोधायची असते.''

### * डॉ. मांडके यांचा 'हृदयसंवाद'!

तुझी अलकू ठार वेडी आहे. वेडे स्वत:ला कधीच वेडे म्हणवत नाहीत. पण मी याला एक्सेप्शन म्हणते. मी तुझ्या प्रेमाची वेडी आहे.

या क्षणी ओल्या मातीच्या वासाचे अत्तर कुणी आणून दिलं असतं, तर मी ते वाट्टेल त्या किमतीला विकत घेतलं असतं...

या आहेत पत्राच्या ओळी. दोन प्रेमीजीवांनी परस्परांशी साधलेल्या पत्ररुपी हृदयसंवादाच्या. संजय मोने आणि सुकन्या कुलकर्णी-मोने हे कलावंत दांपत्य त्यांचं नेटकं वाचन करीत आहे आणि प्रियकर-प्रेयसी, पती-पत्नी या नात्यातले विविध पैलू उलगडताहेत...

पोलिस उपायुक्त डॉ. संजय अपरांती यांच्या हस्ते डॉ. अलका मांडके यांच्या 'हृदयसंवाद' या रुचिरा प्रकाशनने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाचं प्रकाशन झालं. विख्यात शल्यविशारद डॉ. नीतू मांडके यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणाऱ्या 'हृदयस्थ' या दोन वर्षांपूर्वी लिहिलेल्या पुस्तकानंतर आता डॉ. मांडकेंच्या पत्नी डॉ. अलका यांनी दोघांमधला पत्रव्यवहार पुस्तकरूपाने प्रसिद्ध केला आहे. वि. शं. चौगुले यांनी संपादन केले आहे.

## * 'माणमाती'चे प्रकाशन

चांगल्या साहित्यासाठी भाषेवरच्या प्रभुत्वापेक्षा लेखकाची नितळ आणि प्रामाणिक भावना महत्त्वाची असते, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी व्यक्त केले.

उत्कर्ष प्रकाशनने प्रकाशित केलेल्या शहाजीराव बळवंत यांच्या 'माणमाती' या कादंबरीचे प्रकाशन दै. प्रभातचे संपादक महावीर जोंधळे यांच्या हस्ते झाले.

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, ''मराठी साहित्यात सध्या आत्मचरित्रांची संख्या वाढत आहे. त्यांना चांगला प्रतिसाद मिळतो आहे, याचे कारण या आत्मचरित्रांमध्ये येणारी भावना वाचकांना आपली वाटते. दलित, आदिवासी आणि स्त्रिया यांच्या आत्मकथनांमध्ये व्यक्त होणाऱ्या या संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ संस्कृतीची कल्पना या आत्मचरित्रांना जागतिक दर्जापर्यंत घेऊन गेली.'' मराठी साहित्यामध्ये अनुभवाच्या पातळीवर वाचक व लेखक एकत्र येतात. त्यामुळे आत्मचरित्रे लोकप्रिय झाली आहेत. दलित साहित्यामध्ये येणारा आक्रोश ही दलित लेखनाची प्रेरणा आहे, असे मत संपादक महावीर जोंधळे यांनी व्यक्त केले.

डॉ. सदाशिव शिवदे यांनी पुस्तकाबाबत माहिती दिली. सुधाकर जोशी यांनी प्रास्ताविक केले.

## * विज्ञान संकल्पना कोष

भौतिक, रसायन आणि जीवशास्त्र या विषयांमधील मूळ इंग्रजी संकल्पना सोप्या मराठीतून पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना समजून घेता याव्यात, यासाठी तयार केलेला मराठी राज्य विकास संस्थेचा 'विज्ञान संकल्पना कोश' प्रकाशित होत आहे. याचबरोबर कॉम्प्युटर आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी क्षेत्रातही मराठीला पूरक पर्यायी शब्द शोधण्याचे काम केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयातर्फे सुरू झाले आहे.

मराठीचा प्रसार होण्यासाठी ती ज्ञानभाषा आणि संदर्भग्रंथांची भाषा व्हायला हवी, असे मत मराठी भाषा विकास संस्थेच्या संचालिका वसुंधरा पेंडसे-नाईक यांनी व्यक्त केले. 'विज्ञान संकल्पना कोश' हा त्याचाच एक भाग आहे.

२६० पानी कोशामध्ये विज्ञानात नेहमी लागणाऱ्या ३०० संकल्पना मांडण्यात आल्या आहेत. कर्बद्धी-प्राणिलवायू या कार्बन-डायऑक्साईडच्या संस्कृतप्रचूर शब्दाला केवळ कार्बन हाच सोपा मराठी शब्द त्यात सुचवला आहे.

दरम्यान, मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे कॉम्प्युटरच्या मदतीने तांत्रिक मराठी आणि कोकणी प्रतिशब्द तयार करण्याच्या कामास सुरुवात झाली आहे.

इंटरनेटवरील पत्ता सांगणारी 'डॉट कॉम' ही भाषा १० शतकांपूर्वीच्या महानुभाव पंथामधील सकळ लिपीतही आहे. त्यातील या एकंदर २६ लिपी डॉट कॉमच्या टिंबाप्रमाणे असून यातूनही काही नव्या शब्दांची माहिती मिळू



शकेल. या लिप्यांचे डिकोडिंग करण्याचे काम याच पंथाचे औरंगाबाद येथील महंत नागराज बाबा यांनी सुरू केले होते.

## * आंतरराष्ट्रीय नाटककार समितीच्या अध्यक्षपदी डॉ. सतीश आळेकर

युनेस्कोच्या 'इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिट्यूट'च्या (आयटीआय) आंतरराष्ट्रीय नाटककार व्यासपीठाचे अध्यक्ष म्हणून पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्राचे संचालक आणि ज्येष्ठ नाटककार डॉ. सतीश आळेकर यांची नियुक्ती झाली आहे. या आंतरराष्ट्रीय व्यापीठाचे अध्यक्षपद भारतीय नाटककाराला प्रथमच मिळाले आहे.

२२ ते २८ मे दरम्यान मनिला येथे ३१ वी वर्ल्ड थिएटर कॉंग्रेस पार पडली. त्यामध्ये डॉ. आळेकर पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून सहभागी झाले होते. या सभेमध्येच त्यांची आंतरराष्ट्रीय नाटककार व्यासपीठाचे अध्यक्ष म्हणून एकमताने नियुक्ती करण्यात आली. ललित कला केंद्र सन २००० पासून ''आयटीआय'ला सहकारी सदस्य म्हणून संलग्न आहे. याशिवाय भारतातील राष्ट्रीय नाट्य विद्यालयही (एनएसडी) 'आयटीआय'शी संलग्न आहे. डॉ. आळेकर यांची नियुक्ती दोन वर्षांची आहे. हे व्यासपीठ म्हणजे 'आयटीआय'ची एक समिती आहे. नाटककारांप्रमाणेच तंत्रज्ञ, नेपथ्यकार आदींचीही स्वतंत्र समिती असते. नाटककारांच्या या समितीत वेगवेगळ्या देशांचे दहा नाटककार आहेत. नाटकाच्या विविध अंगांची चर्चा व्हावी, प्रत्येक देशाच्या संस्कृतीला व्यासपीठ मिळावे, हा या समित्यांचा उद्देश असतो.''

## * ग्रामीण मराठी साहित्य संमेलन

शेतकऱ्यांच्या आत्महत्या असोत की आणखी एखादे संकट, सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याचे सामर्थ्य साहित्यिकांत आहे नवसाहित्यिकांनी आपल्या साहित्यातून हे सामर्थ्य व्यक्त करावे, असे आवाहन ज्येष्ठ कवी ना. धो. महानोर यांनी विटा येथे २५ व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केले. साहित्य सेवा मंडळ व मुक्तांगण वाचनालयातर्फे हे संमेलन आयोजित करण्यात आले होते.

छोटी साहित्य संमेलने साहित्याला बळ देणारी असतात यावर भर देऊन महानोर म्हणाले की, विट्यासारखी एकदिवसीय साहित्यसंमेलने अधिक व्हायला हवीत. मोठ्या संमेलनातील व्यासपीठावर जागा व संधी मिळेल याची खात्री देता येत नाही. त्यामुळे छोट्या संमेलनांची अधिक गरज आहे. त्यातून दोन-तीन जिल्ह्यातील साहित्यिकांना बळ मिळते. ही काळाची गरज आहे.

गेल्या २५ वर्षांतील साहित्याचे अवलोकन केल्यास ग्रामीण भागातील साहित्यिकांचाच प्रभाव असल्याचे जाणवते. रघुराज माटकरी यांनी प्रास्ताविक केले. विश्वजीत कदम यांच्या हस्ते अक्षरयज्ञ स्मरणिकेचे प्रकाशन झाले.

## * नामदेव ढसाळ यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

नामदेव ढसाळांनी डॉ. आंबेडकरांवर लिहिलेल्या 'तुझे बोट धरून चाललो आहे मी' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. कवी वसंत आबाजी डहाके, ज्येष्ठ पत्रकार नारायण आठवले आणि अनंत दीक्षित उपस्थित होते. श्रोत्यांमध्ये मंगेश पाडगावकर, अशोक शहाणे, पुष्पा भावे, अनंत भावे यांच्यासह अनेक मान्यवर होते. लोकवाङ्मयगृहाने हा काव्यसंग्रह प्रकाशित केला आहे.

हा काव्यसंग्रह म्हणजे जसे बाबासाहेबांचे चरित्र आहे. तसेच ते नामदेवचे आत्मचरित्र आहे, असे मत प्रा. डहाकेंनी व्यक्त केले.

## * महेश देवकर यांची जिद्द

प्रा. डॉ महेश देवकर यांनी जन्मत:च वाट्याला आलेल्या अंधत्वावर मात करून , पुणे विद्यापीठातील संस्कृत, प्राकृत-पाली विभागाच्या प्रमुखपदी नियुक्त होण्याचा मान मिळवला आहे. असे यश मिळविणारे ते पहिलेच अंध ठरत आहेत.

चार वर्षांपूर्वी त्यांनी संस्कृत विषयामध्ये पीएच.डी. प्राप्त करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या कर्तृत्वाला दाद देऊन जपानमधील एका संस्थेकडून त्यांना 'ऑफर' देण्यात आली. ती स्वीकारून तेथे रुजू होण्याची प्रक्रिया सुरू असतानाच विद्यापीठाकडून मुलाखतीसाठी कॉल आला. मुलाखतीत, 'प्राध्यापकपदासाठी अर्ज केला असूनही विद्यापीठाकडून व्याख्यातापदाचा 'कॉल' आला,' अशी वस्तुस्थिती कुलगुरूमहोदयांना कथन करण्यात आली.

'विद्यापीठात एवढ्या चांगल्या प्रतिभेचे तज्ज्ञ असताना परदेशातील संस्थांना त्यांचा वापर का करू द्यायचा? पुणे विद्यापीठालाच त्यांचे योगदान मिळण्यासाठी निर्णय घेण्याची गरज आहे,' असा निवड समितीने मुद्दा मांडून त्यांना प्राध्यापकपदी नेमले. डॉ देवकर विभागात रुजू झाले नि त्यांना दुसऱ्याच दिवशी, म्हणजे २ जून रोजी विभागप्रमुखपदी बढती दिली गेली.

डॉ. देवकर म्हणाले, विद्यापीठाच्या भूमिकेमुळे आपण भारावून गेलो आहोत. गुणवत्तेची इथे कदर होते, हेच यामधून सिद्ध होत आहे. संस्कृत आणि पाली विभाग स्वतंत्र करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. याकामी नियोजन करण्यास सध्या ते प्राधान्य देणार आहेत.

## * कहाणी राष्ट्रपती भवनाची!

राष्ट्रपती भवन ही केवळ एक इमारत नाही. जगातल्या सर्वात मोठी लोकशाही असणाऱ्या भारताच्या प्रथम नागरिकाचे आणि तिन्ही सेनादलांच्या सर्वोच्च प्रमुखांचे ते निवासस्थान आहे. गेली ७० वर्षे या इमारतीने आपली शान अबाधित राखत 'रायसिना हिल्स'च्या शोभेलाही 'चार चाँद' लावले आहेत. 'राष्ट्रपती भवन' असे नाव धारण करणाऱ्या या इमारतीचा इतिहास आता पुस्तकरूपाने चिरंतन होणार आहे.

१९१४ मध्ये भारताचे व्हाइसरॉय असणाऱ्या लॉर्ड हार्डिंग्ज यांनी 'व्हॉइसरॉय' पदाला साजेसे निवासस्थान बांधण्याचा मानस बोलून दाखवला. तो प्रत्यक्षात येण्यास १७ वर्षे लागली. ख्यातनाम ब्रिटिश वास्तुविशारद सर एडविन ल्युटेन्स यांच्या कल्पनेतून साकारलेल्या या स्थापत्यकलेच्या अप्रतिम नमुन्यावर आधारित एक पुस्तक राष्ट्रपतींच्या सचिवालयामार्फत प्रसिद्ध करण्यात येईल. पुस्तकात राष्ट्रपती भवनाच्या अवाढव्य परिसराच्या आढाव्यापासून सर ल्युटेन्स यांच्या मूळ स्केचेसपर्यंत माहितीचा खजिना असेल.

राष्ट्रपती भवनाची मूळ इमारत हारून अल रशीद यांनी त्या काळात (१९१४) एक कोटी ४० लाख रुपये खर्चून बांधली. ही इमारत चार वर्षांत बांधून पूर्ण व्हावी, अशी खरेतर लॉर्ड हार्डिंग्ज यांची इच्छा होती. मात्र पहिल्या महायुद्धामुळे त्यांचे हे वेळापत्रक प्रत्यक्षात येऊ शकले नाही. ७० कोटी विटा, एक कोटी ३० लाख क्युबिक फूट दगड, मकराना आणि अल्वर येथून मागवलेला एक लाख क्युबिक फूट स्फटिक (मार्बल) हरिपस, जैसलमेरपासून थेट इटलीपर्यंत अनेकविध ठिकाणांहून मागवलेला विविधरंगी स्फटिक येथे वापरण्यात आला. २३ हजार कारागिरांनी ही इमारत बांधण्यासाठी कष्ट केले, व्हर्सायच्या राजवाड्यापेक्षा मोठी असलेली ही वास्तू वेस्टमिन्स्टर पॅलेसपेक्षा क्षेत्रफळात थोडी लहान आहे, अशी बरीच रोचक माहिती या पुस्तकाच्या माध्यमातून मिळेल.

## * शांता शेळके काव्यग्रंथालय

'तोच चंद्रमा नभात', 'जाईन विचारित रानफुला', 'ही वाट दूर जाते स्वप्नामधील गावा' अशी एकापेक्षा एक सरस गीते लिहिणाऱ्या दिवंगत कवयित्री शांता शेळके यांच्या निधनाला सहा जून रोजी चार वर्षे झाली. कवयित्री म्हणून त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेता 'शांता शेळके मराठी कविता ग्रंथालय' शनिवार पेठेत सुरू होत आहे. एखाद्या मान्यवर कवी अथवा कवयित्रीच्या नावाने सुरू होणारे आणि केवळ मराठी कवितांना वाहिलेले हे राज्यातले पहिलेच ग्रंथालय असावे!

हे ग्रंथालय उभारण्यासाठी पुणे मराठी ग्रंथालयाने पुढाकार घेतला आहे. या काव्यग्रंथालयास शांताबाईंच्या कुटुंबियांनी पाच लाख रुपयांची देणगी दिली असल्याचे या ग्रंथालयाचे एक विश्वस्त आणि पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांनी सांगितले. सुरुवातीला या ग्रंथालयात शांताबाईंच्या कवितासंग्रहांसह इतर कवींच्या पाचशे ग्रंथांचा समावेश असेल. त्यांच्या नावाने दरवर्षी पुरस्कार प्रदान तसेच कविताविषयक उपक्रमांसाठी एक कायमस्वरूपी व्यासपीठही उभे राहील. शांताबाईंशी जिव्हाळ्याचे संबंध असणाऱ्या मंगेशकर कुटुंबानेही ग्रंथालयाच्या संकल्पनेचे स्वागत केले असून भविष्यात त्यासाठी मदत करण्याची तयारीही

दर्शवली आहे.

मराठीतले आद्य कवी ज्ञानेश्वर ते आजचे लोकप्रिय तरुण कवी संदीप खरे यांच्यापर्यंत हे ग्रंथालय अद्ययावत करण्याची योजना आहे. नऊ जुलैपासून हे ग्रंथालय सुरू होणार असून त्यामध्ये आधुनिक मराठी कवितेसह, त्यावरील समीक्षा, लेख, परिचय ग्रंथ आणि संदर्भ साहित्याही ठेवण्यात येणार आहे. ऑक्टोबर महिन्यात या ग्रंथालयाचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

१९५० मध्ये 'राम राम पाव्हनं' या सिनेमातील गीतांमुळे कवयित्री आणि गीतकार म्हणून अवघ्या मराठी रसिकांच्या मर्मबंधातील ठेव बनलेल्या शांताबाईंनी ३०० मराठी सिनेमांसाठी गीते लिहिली. त्याचबरोबर 'मी डोलकर दर्याचा राजा' किंवा 'असा बेभान हा वारा' ही गाणीही तेवढीच दाद घेणारी आहेत. हुजूरपागा आणि एस. पी. कॉलेजात शिक्षण घेतलेल्या शांताबाईंचे 'पूर्वसंध्या', 'गोंदण', 'आस्वाद', 'तोच चंद्रमा' आणि 'इत्यर्थ' असे एकूण २५ कवितासंग्रह प्रकाशित झाले.

### * विद्यापीठातून ज्योतिषशास्त्र शिकवा

''कुडमुड्या ज्योतिषांची संख्या वाढू नये, यासाठी ज्योतिषशास्त्र हा विषय विद्यापीठाच्या माध्यमातून शिकवला जावा,'' असे आवाहन दहाव्या अखिल भारतीय ज्योतिष अधिवेशनाचे अध्यक्ष वास्तूतज्ज्ञ व ज्योतिषतज्ज्ञ य. न. मग्गीरवार यांनी पुणे येथे केले.

अधिवेशनाचे उद्घाटन नाणीजचे नरेंद्र महाराज यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र ज्योतिष परिषदेचे कार्याध्यक्ष सिद्धेश्वर मारटकर, माजी आमदार प्रकाश देवळे, 'केसरी'चे संपादक डॉ. दीपक टिळक आदी यावेळी उपस्थित होते.

ज्योतिषशास्त्र हा विषय भारतापेक्षा परदेशांतीलच विद्यापीठे स्वीकारीत आहेत. असे नमूद करून ते म्हणाले, ''हा विषय विद्यापीठात शिकवण्यावर भारतात वाद आहे. यामध्ये अंधश्रद्धा निर्मूलनवाद्यांनी आधी प्रामाणिकपणे हा विषय समजून घ्यावा. त्यांची एक भूमिका पटण्यायोग्य आहे आणि ती म्हणजे लोक कोणत्याही कुडमुड्या ज्योतिष्याने सांगितलेले विधान सत्य मानून त्याला दक्षिणा देऊन मोकळे होतात. या भूमिकेत बदल आवश्यकच आहे आणि तो ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासकांनीही स्वीकारावा; मात्र त्यासाठीच या विषयाचे शास्त्रशुद्ध ज्ञान असणे आवश्यक आहे.''

''ज्योतिषशास्त्राला विद्वानांमुळे पुन्हा शास्त्राचे स्वरूप येत असून, ते लोकांना पटवून सांगणे ही विद्वानांची जबाबदारी आहे,'' असेही त्यांनी सांगितले.

### * कविवर्य ग्रेस यांना मानपत्र

''कलावंताची तडफड ही त्याच्या कलेचा प्राण असते. या तडफडीतूनच कला निर्माण होते. तृप्तीच्या बदल्यात मी माझी तडफड कोणाला देणार नाही,'' असे ज्येष्ठ कवी ग्रेस यांनी सांगितले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची पिंपरी-चिंचवड शाखा आणि कलारंग प्रतिष्ठानच्या वतीने ग्रेस यांना महापौर मंगला कदम यांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरविण्यात आले. डॉ. गं. ना. जोगळेकर अध्यक्षस्थानी होते. बाळकृष्ण सोनवणे (जळगाव), अरुण म्हात्रे (मुंबई), राजेंद्र दास (कुर्डुवाडी), डॉ. प्रतिभा इंगोले (अमरावती), आश्लेषा महाजन (पुणे) या कवींचा तसेच स्थानिक कवी हेमंत जोशी, राज अहेरराव आणि प्रियांका लुणावत यांचा सत्कार करण्यात आला. उद्धव कानडे यांनी ग्रेस यांच्याशी संवाद साधला.

ग्रेस म्हणाले, ''मी माझ्या कवितेचा प्रचार करत नाही; तसेच कवितेचे समर्थन करण्यासाठीही येथे आलो नाही. समज-गैरसमजातून दुर्बोधतेसारख्या गोष्टी निर्माण झाल्या. माझ्यात आणि कवितेच्या रसिकवर्गात, वाचकवर्गात नको असलेले अंतर निर्माण झाले. परंतु, शब्दांची मांडणी प्रतिभेचे संचित घेऊन पुढे आल्यास हे अंतर खोटे ठरते.''

श्री. जोगळेकर म्हणाले, ''ग्रेस यांच्या अनुभवामुळे उपस्थित कवींना आव्हान मिळाले आहे. ग्रेस, आरती प्रभू, जी. ए. कुलकर्णी, कवी बी यांच्यासारख्या चिंतनशील कविवर्यांनी मराठी साहित्याचे वैभव वाढवले.''

परिषदेचे शाखाध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी प्रास्ताविक केले.

### * समाजाला विचारप्रवृत्त करण्यास पथनाट्यांचे माध्यम योग्य

''अभिनय, कलाकार, प्रेक्षक आणि मोकळी जागा या चार घटकांवर पथनाट्ये चालत असून, चालू विषयांवर समाजाला विचारप्रवृत्त करण्यासाठी ही चळवळ अविरत सुरू राहील,'' असा निर्धार दिल्लीतील 'जननाट्य मंचा'च्या मलयश्री हाश्मी यांनी महाराष्ट्र कल्चरल सेंटर आणि अतुल पेठे प्रॉडक्शन यांच्यातर्फे 'राजकीय पथनाट्ये' या विषयावरील कार्यक्रमात व्यक्त केला. समर नखाते यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

सुमारे पस्तीस वर्षांपूर्वी या पथनाट्य चळवळीला सुरुवात झाल्याचे सांगून त्या म्हणाल्या, ''कामगार संघटना, शेतकरी संघ, महिला संघटना आणि युवक संस्थांसाठीच सुरुवातीला पथनाट्ये केली जायची; मात्र त्यानंतर त्याची वाढती लोकप्रियता लक्षात घेऊन 'नुक्कड नाटक' ही संकल्पना प्रत्यक्षात आली. पथनाट्यातील विचारांशी प्रेक्षकांचे नाते निर्माण व्हावे आणि त्यावर विचारांना दिशा मिळावी, हा मुख्य उद्देश आहे.''

'हल्लाबोल' या नाटकाच्या सादरीकरणादरम्यान १९८९ मध्ये सफदर हाश्मी यांचा दुर्दैवी अंत झाला असला, तरी सार्वजनिक जागेतच पथनाट्यांचे सादरीकरण अद्याप कोणताही खंड पडला नसल्याचेही मलयश्री हाश्मी यांनी स्पष्ट केले.

आगामी काळात अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी 'मोबाईल थिएटर'ची संकल्पना मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सुधन्वा देशपांडे यांनी 'जननाट्य मंचा'विषयी माहिती देताना पथनाट्ये प्रत्येक वेळी लिखित स्वरूपात असतात असे नाही, अनेकदा त्यांचे स्वरूप जननाट्य मंचातील कलावंत आणि प्रेक्षकांच्याही 'कल्पने'तून साकार होते, असे सांगितले.

### * साडेबारा कोटी पाठ्यपुस्तके– १२० कोटी रुपये

पहिली ते दहावीची सुमारे साडेआठ कोटी पाठ्यपुस्तके तयार असून राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी मिळतील, असा विश्वास शालेय शिक्षणमंत्री प्रा. वसंत पुरके यांनी व्यक्त केला.

२००६-०७ या शैक्षणिक वर्षासाठी सुमारे साडेबारा कोटी पाठ्यपुस्तके लागणार आहेत. त्यासाठी १२० कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. तसेच, यंदा पहिली, पाचवी, नववी आणि अकरावीसाठी नवीन अभ्यासक्रमाचा समावेश असलेली पुस्तके छापली जातील. रोज सुमारे १२ लाख पुस्तके 'महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळा'कडे छापून तयार होतात. या गतीने पुस्तके छापल्यास शाळा सुरू होईपर्यंत आवश्यक संख्येने पुस्तके तयार असतील, असे मंडळाचे अध्यक्ष वसंत काळपांडे यांनी सांगितले.

दहावीपर्यंतच्या विद्यार्थिनींना आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना 'सर्व शिक्षा अभियानां'तर्गत मोफत पुस्तके वाटण्यात येतात. या योजनेअंतर्गत यंदा जवळपास साडेपाच कोटी पुस्तके विद्यार्थ्यांना देण्यात येतील. यापैकी सुमारे ७० टक्के पुस्तके जिल्हा व तालुका स्तरावर वाटण्यात येतात.

### * बालनाट्य चळीवळीपुढील समस्या

''बालरंगभूमी केवळ सुटीच्या दिवसांतच कार्यरत राहते. अनेक वेळा तालमींसाठी जागाही नसते. नाट्यचळवळ वर्षभर चालण्यासाठी शाळांनी सहभागी व्हावे,'' असे मत बालनाट्यकार प्रा. जयंत तारे यांनी व्यक्त केले. ''बालरंगभूमीला पैशाची चणचण हा सर्वात मोठा प्रश्न आहे. या नाटकांना आता दाता राहिला नाही. शासनही अनुदान देत नाही. बाहेरगावी जाऊन प्रयोग करण्याइतपत आर्थिक ताकद संस्थांमध्ये नसल्याने तिकडे नाटक फारसे होत नाही. जेवढे पैसे घातले जातात, तेवढेही परत मिळण्याची खात्री नसते. त्यामुळे बालरंगभूमीचे काम करणे खूप कठीण आहे.''

बालरंगभूमीला दुसरी महत्त्वाची अडचण असते ती नाट्यगृहांची. पुण्यात यशवंतराव चव्हाण नाट्यगृह व भरत नाट्य मंदिर येथेच मुख्यत: बालनाट्ये होतात. बालनाट्यासाठी सकाळी नऊची वेळ असते. पण, इतक्या लवकर बालप्रेक्षकांना येणे शक्य नसते. त्यामुळे नाटके बहुतांश वेळा उशिरा सुरू



होतात. केवळ एका तासात चांगली नाटके सादर करणे अवघड जाते. त्यामुळे बालनाट्यासाठी १० ते १२ ही दुपारची वेळ द्यावी. सुटीव्यतिरिक्तही सवलतीच्या दरात नाट्यगृहे मिळावीत, अशी मागणी नाट्यसंस्थांनी केली आहे.

''सरकारतर्फे घेण्यात येणाऱ्या राज्य बालनाट्य स्पर्धा बंद पडल्या आहेत. त्या परत सुरू झाल्यास नाट्य चळवळीला प्रेरणा मिळेल. सध्या जिल्हा परिषदेतर्फे घेण्यात येणाऱ्या आंतरशालेय नाट्य स्पर्धांना ग्रामीण भागातूनही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळतो. ग्रामीण भागातील मुलांना स्वत:ची कला दाखविण्याची एवढीच एक संधी असते. त्यांच्याकडे अनेक वेळा साधनांची कमतरता असते. त्यातूनच त्यांना नेपथ्य, संगीत आदी व्यवस्था कराव्या लागतात. मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी अनेक शिक्षक धडपडत असतात. या शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठीही सरकारने वेगळ्या योजना आखणे गरजेचे आहे. किंबहुना, प्रभावी वाचनपद्धती, वातावरणनिर्मिती, भावपूर्ण-अर्थपूर्ण बोलणे आदींचे प्रशिक्षण दिल्यास सर्वच विषयांच्या शिक्षणासाठी त्याचा उपयोग होऊ शकेल.

शाळांमधून होणाऱ्या स्नेहसंमेलनात नाट्यस्पर्धा घ्याव्यात, नाट्य परिषदेनेही बालनाट्यासाठी व्यासपीठ निर्माण करावे, अशी सूचना प्रकाश पारखी यांनी केली.

### * रशियातील वृत्तपत्र स्वातंत्र्याची गळचेपी

वृत्तपत्रीय स्वातंत्र्याची गळचेपी करण्याबद्दल रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यावर ५९ व्या जागतिक वृत्तपत्र परिषदेत सडकून टीका करण्यात आली. एकशे दहा देशांतील विविध वृत्तपत्रांचे संपादकही या परिषदेत सहभागी झाले होते.

क्रेमलिनमध्ये झालेला हा उद्घाटन समारंभ जगभरातून आलेल्या वृत्तपत्रांचे मालक, प्रकाशक व संपादकांच्याच नाही, तर खुद्द रशियन राज्यकर्त्यांच्याही कायम लक्षात राहील. समारंभ भव्य व शानदार होता, आधुनिक रशियाचे झगमगीत दर्शन घडविणारा होता. पण अखेर लक्षात राहिला तो पुतिन यांच्यावर 'वर्ल्ड असोसिएशन ऑफ न्यूजपेपर्स' (वॅन) चे अध्यक्ष गॅवि ओरिली यांनी चढविलेला जोरदार हल्ला.

''वृत्तपत्रीय स्वातंत्र्याबद्दल आपल्याला आस्था असल्याचे तुम्ही अनेकदा सांगितले असले तरी तुमच्या सरकारचे वागणे मात्र सातत्याने विपरीत राहिले आहे,'' असे ओरिली म्हणाले.

खच्चून भरलेले सभागृह पूर्ण स्तब्ध होते. चेहऱ्यावरची सुरकुतीही हलू न देता व्यासपीठावर बसलेले पुतिन लक्ष देऊन ऐकत होते आणि ओरिली यांची सरबत्ती सुरू होती.

रशियातील सरकारमध्ये सर्वोच्च पदावर असलेल्यांच्या मनात वृत्तपत्रांना स्वातंत्र्य देण्याची प्रामाणिक इच्छा खरोखरीच आहे का, अशी शंका व्यक्त करून ओरिली यांनी एका पाठोपाठ एक प्रश्न उपस्थित केले.

१) रशियन सरकारला प्रश्न विचारण्याची, त्याच्यावर टीका करण्याची कितपत मुभा इथल्या वृत्तपत्रांना आहे?

२) येथील पत्रकारांना भीतीच्या सावटाखाली काम करावे लागते, असा आरोप आजही का केला जातो?

३) दूरचित्रवाणीचे माध्यमही इथे सरकारी नियंत्रणाखाली आहे. त्यामुळे वस्तुनिष्ठ मतप्रदर्शनाला इथे वाव कुठे आहे?

४) अनेक मोठी, खासगी वृत्तपत्रे सरकारशी जवळीक असलेल्या उद्योगपतींच्या मालकीची आहेत. मग वृत्तपत्रीय स्वातंत्र्यात पूर्वीपेक्षा सुधारणा झाली आहे, असे खरेच म्हणता येईल का?

५) राष्ट्रीय वृत्तपत्रांच्या बाबतीतही ही स्थिती असताना स्थानिक व प्रादेशिक स्तरावरही तेथील वृत्तपत्रांवर अशीच दडपणे येत नाहीत का?

ओरिली यांनी केलेल्या या कमालीच्या बोचऱ्या टीकेचा परामर्श पुतिन आपल्या मुख्य भाषणात घेतील अशी सर्वांची अपेक्षा होती. प्रत्यक्षात मात्र पुतिन यांनी या विषयाला अगदी ओझरता स्पर्श केला. कळीच्या सर्व मुद्द्यांना बगल देत त्यांनी वृत्तपत्र स्वातंत्र्याला आपले सरकार बांधील असल्याची पुन्हा एकदा ग्वाही दिली.

शोध पत्रकारिता केल्याबद्दल इराणच्या तुरुंगात गेली सहा वर्षे छळ सोसावा लागलेल्या अकबर गांजी या इराणी पत्रकाराला 'वॅन'चा 'गोल्डन पेन' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार याच समारंभात देण्यात आला.

वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या 'वर्ल्ड असोसिएशन ऑफ न्यूजपेपर्स' (वॅन) या संघटनेची १८ हजार वृत्तपत्रे सदस्य आहेत. पॅरिसमध्ये या संघटनेचे मुख्य कार्यालय आहे. राष्ट्रीय वृत्तपत्रांच्या ७३ संघटना, एकशे दोन देशांमधील वृत्तपत्रे आणि त्यांचे प्रतिनिधी यांचाही सदस्यांमध्ये समावेश आहे. त्याशिवाय ११ वृत्तसंस्था आणि प्रादेशिक, तसेच जागतिक स्तरावरील वृत्तपत्रांचे गट हेही या संघटनेत समाविष्ट आहेत.

### * भा. द. खेर– वय वर्षे नव्वद

अगदी कोवळ्या वयात मी 'लेखक' होण्याचे ठरवले. मी लेखक झालो. लेखक म्हणूनच जगलो. लेखन हीच माझी जीवननिष्ठा आहे, अशा शब्दांत ज्येष्ठ साहित्यिक भा. द. खेर यांनी आपले मनागत मांडले.

श्री. खेर यांनी १२ जून रोजी वयाची नव्वदी गाठली. 'चरित्रात्मक कादंबरी'ची वाट मराठीत रुळवणारे खेर या वयातही लेखनात रमले आहेत. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर यांच्या चरित्रावरील 'संजीवन' या कादंबरीच्या इंग्रजी अनुवादाचे प्रकाशन किसन महाराज साखरे यांच्या हस्ते एमआयटी येथे १२ जूनला झाले.



मी सुदैवी माणूस ठरलो कारण मला चांगल्या संधी मिळाल्या, असे कृतज्ञतेने नमूद करीत ते म्हणाले, "वयाच्या सातव्या वर्षी मी लेखक होण्याचे नक्की केले होते. माझे पहिले लेखन सत्यकथेत प्रकाशित झाले. १९३९ मध्ये माझा पहिला कथासंग्रह 'नादलहरी' प्रसिद्ध झाला. त्यानंतर १९४० मध्ये माझी पहिली कादंबरी 'विजय' प्रकाशित झाली. जपानवर अणुबाँब टाकण्यात आला तेव्हा मी सावरकरांच्या 'अग्रणी'मध्ये कार्यकारी संपादक होतो. बाँबची बातमी तेव्हा मी दिली होती, हे आजही आठवते. 'हिरोशिमा' ही कादंबरी या हल्ल्यावर आधारित होती. जपानमध्ये या कादंबरीची प्रत बाँबहल्ल्याच्या स्मृती जागविणाऱ्या संग्रहालयात ठेवण्यात आली आहे."

मी आधी लेखक आहे, त्यानंतर पत्रकार आहे, असे ते म्हणाले. अलीकडे माहितीच्या अधिकारामुळे पत्रकारिता सुधारली आहे. अधिक मोकळी झाली आहे, असे मत त्यांनी मांडले. शंभरहून अधिक कादंबऱ्या, असंख्य लेख, पत्रकारितेच्या निमित्ताने केलेले विपुल लेखन...हे सारे वयाच्या या टप्प्यावर समाधान देणारे आहे. या लेखनाला वाचकांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे मी तृप्त आहे, अशी भावना खेर त्यांनी व्यक्त केली.

### * रामभाऊ जोशी– ८६

"समाजाच्या कल्याणासाठी काम केल्याचे मला समाधान आहे; मात्र सध्याच्या पत्रकारितेबद्दल धास्ती वाटते. समाजापासून ती दूर जाऊ नये, म्हणून पत्रकारितेतील नव्या पिढीने वाचकांचा विश्वास संपादन करावा. विश्वासार्हता वाढवून सामाजिक स्वास्थ्य, जागृती व संस्कार टिकविण्यासाठी पत्रकारिता करावी," असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार रामभाऊ जोशी यांनी केले.

श्री. जोशी यांचा ८६ व्या वर्षात पदार्पणाबद्दल पुणे श्रमिक पत्रकार संघातर्फे 'सिंबायोसिस'चे अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर पत्रकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजीव साबडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष विठ्ठल जाधव, सरचिटणीस उदय दांडेकर होते.

"रामभाऊ जोशी यांचे शिक्षण कमी झाले असले, तरी त्यांचा व्यासंग दांडगा आहे. अनुभवाच्या जोरावर त्यांनी यशाचे शिखर गाठले," असे सांगून ज्येष्ठ पत्रकार राजीव साबडे यांनी त्यांच्या कर्तृत्वाचा आढावा घेतला.

'लोकमत'चे संपादक अनंत दीक्षित म्हणाले, "पत्रकारितेतील कोणतेही मोठे पद दीर्घकाळ न मिळतादेखील सर्व महाराष्ट्रभर लौकिक मिळविणाऱ्या पत्रकारांपैकी श्री. जोशी आहेत."

श्री. जोशी हे उत्साह, आनंद आणि स्फूर्तीचा धबधबा असल्याचे श्री. साबडे यांनी सांगितले. जयराम देसाई यांनी सूत्रसंचालन केले.

## * दत्ता पुराणिक यांचा संकल्प

'श्यामची आई' हे साने गुरुजी यांचे पुस्तक घरोघरी पोहोचविण्याचा संकल्प दत्ता पुराणिक यांनी सोडला आहे. त्यांनी गेल्या अकरा वर्षांत सुमारे बारा हजार पुस्तकांची विक्री केली आहे.

अमळनेर हे पुराणिक यांचे जन्मगाव. साने गुरुजी त्यांच्या शाळेसमोरून चालत जाताना दररोज विचारपूस करत असत, अशी आठवण ते आजही सांगतात. इंग्रजांच्या जाचामुळे काही काळ साने गुरुजी भूमिगत राहिले. त्या वेळी त्यांची सेवा करण्याची संधी श्री. पुराणिक यांना मिळाली. गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाने भारावून १९५० मध्ये त्यांनी पुणे गाठले. पुढे १९८८ पर्यंत पुण्यातील 'लष्करी अभियांत्रिकी सेवा' (एमईएस) या संस्थेत त्यांनी नोकरी केली.

निवृत्तीनंतर साने गुरुजींच्या कार्याचा वसा समाजापर्यंत पोहोचवावा, असे वाटल्याने त्यांनी १९९४ मध्ये पुणे विद्यार्थी गृहातून प्रथम 'श्यामची आई'च्या काही प्रती विकत घेतल्या. त्या हातोहात खपल्याने त्यांचा हुरूप वाढला. त्यानंतर नियमितपणे 'श्यामची आई'च्या प्रती घरोघरी जाऊन विकण्यास त्यांनी सुरुवात केली. पुराणिक हे स्वत:च्या खिशातून प्रवासखर्च करून; तसेच गरजू मुलांना कमी किमतीत पुस्तके विकतात. सकाळी आठलाच ते घराबाहेर पडतात. बारापर्यंत घरी येऊन पुन्हा दुपारी चार ते रात्री आठ या वेळेत विक्रीसाठी बाहेर पडतात. सकाळी एकही प्रत विकली न गेल्यास दुपारी जेवत नाहीत. एखादे व्रत घेतल्याप्रमाणे त्यांची ही सेवा अविरत सुरू आहे.

बालनाट्यांचे दिग्दर्शक ही पुराणिक यांची दुसरी ओळख. त्यांनी स्थापन केलेल्या 'संगम' रंगभूमी'च्या माध्यमातून त्यांनी अनेक बालनाट्ये बसविली आहेत. त्याशिवाय 'श्यामची आई'चे कथाकथनही ते करतात. अखेरच्या श्वासापर्यंत 'श्यामची आई' घरोघरी पोहोचविण्याचे काम सुरूच राहील, असा त्यांचा मानस आहे.

## * महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या संपादकपदी डॉ. सु. प्र. कुलकर्णी

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र असलेल्या महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या संपादकपदी डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे.

डॉ. कुलकर्णी यांनी यापूर्वी डॉ. अ. वा. कुलकर्णी यांच्या निधनानंतर पत्रिकेची धुरा सांभाळली आहे. ते अहमदनगर येथील सारडा महाविद्यालयाचे मराठी विभागाचे माजी प्रमुख असून अहमदनगरच्या साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्षही होते, तसेच नगरच्या श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव व विश्वस्त आहेत. कुलकर्णी परिषदेच्या कार्यकारी मंडळात नगरचे प्रतिनिधित्व करीत असल्याची माहिती परिषदेचे प्रसिद्ध प्रमुख प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली. पत्रिकेच्या संपादक मंडळात पद्माकर कुलकर्णी (सोलापूर), मधु नेने (वाई), प्रा. रामचंद्र शिंदे (सांगली), प्रा. डॉ. किसन पाटील (जळगाव), अरुण मैड (अंबरनाथ) यांचा समावेश करण्यात आला असून सल्लागार म्हणून डॉ. अरविंद संगमनेरकर, कोषाध्यक्ष ह. ल. निपुणगे, रत्नाकर कुलकर्णी हे मार्गदर्शन करणार आहेत.

## * गजानन वाटवे– वय वर्षे ९०

''उत्तम कविता हा माझा छंद आहे. आवडलेली कविता सुरात गुंफणे हे माझे वेड आहे. त्यासाठीच आजवर जगत आलो. हेच काम करत 'शतायुषी' व्हावे, असे वाटते...''

ज्येष्ठ भावगीत गायक गजाननराव वाटवे उद्या (ता. ८) नव्वदाव्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्यानिमित्त पत्रकारांशी बोलताना त्यांनी या भावना व्यक्त केल्या.

''वाढदिवस साजरा करू नये, असे मला वाटत होते. वयोमानाने आता मर्यादा आल्या आहेत; पण रसिकांचे प्रेम, आदर यांचा अनादरही करता येत नाही. त्यामुळे मी होकार दिला,'' असे सांगून श्री. वाटवे म्हणाले, ''मला आजही चाल सुचते, नवी कविता वाचावी-ऐकावी असे वाटते. अजूनही काम करावेसे वाटते. हे काम करणे जोवर सुरू आहे, तोवर मला जगायचे आहे.''

सुरेखा नारळे यांची एक कविता त्यांनी गाऊन दाखवली.

नेत्र थकले थकले, वाट पाहून पाहून
हात थांबले थांबले, दान घेऊन घेऊन
मूक जाहले जाहले, बोल बोलून बोलून
तीर गाठला गाठला, नौका हाकून हाकून
औक्ष सरलं सरलं, जिणं जगून जगून
राम भेटला भेटला, गुण गाऊन गाऊन!

वयाच्या नव्वदीतही श्री. वाटवे यांचे सूर व उच्चार स्पष्ट होते. समोर नेहमीची हार्मोनिअम नव्हती; पण बोटे हवेतच अचूक सुरांवर फिरत होती. गाण्यातली मन:पूर्वकता तीच होती. नंतर ते म्हणाले, ''या गाण्यातील शब्द आणि भाव माझ्या आताच्या अवस्थेशी जुळणारे वाटले. म्हणून मला चालही सुचली.''


''नव्या पिढीतील श्रीधर फडके, सुरेश वाडकर, रवींद्र साठे हे गायक मला आवडतात. मला उत्तम कविता गायच्या होत्या म्हणून चित्रपटक्षेत्रात शिरलो नाही; पण मला त्याची खंत नाही. जे मिळाले त्यात मी समाधानी आहे,'' अशी कृतार्थतेची भावनाही त्यांनी व्यक्त केली.

## * विक्रमी पुस्तक

जगभरातील भारतीय विक्रमादित्यांचा अचाट आणि अफाट विक्रमांचा वेध घेणाऱ्या 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस्' या पुस्तकाने १७ व्या वर्षात पदार्पण केले आहे. या रेकॉर्डस्च्या पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन १९९० मध्ये झाले होते.

२००६ या वर्षातील ‘लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस्’च्या नव्या आवृत्तीचे प्रकाशन गुरुवारी मुंबईत झाले. या पुस्तकाच्या नव्या आवृत्तीमध्ये जगभरातील दहा हजारांहून अधिक भारतीयांच्या अचाट आणि अफाट विक्रमांची नोंद घेण्यात आली आहे. या प्रकाशन समारंभास शौर्यचक्र पुरस्कार विजेते आणि कृत्रिम पायाच्या बळावर हेलिकॉप्टर चालविणारे पायलट कमांडर उदय सौंधी, अद्वितीय स्मरणशक्ती लाभलेले निशांत कासीभाटला, लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस्चे संपादक विजय घोष, कोका-कोला इंडियाचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल सिंग आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस्ने यंदाच्या पुस्तकात वैद्यक विज्ञान, रेडिओ, दूरचित्रवाणी, मनोरंजन, वाहतूक आदींसह नवीन १८ क्षेत्रांचा समावेश केला आहे. या पुस्तकात गायिका शोभा मुद्‌गल, निर्माती एकता कपूर यांच्यासह १० जणांच्या मुलाखती आहेत. या नव्या पुस्तकात ‘पीपल्स ऑफ द इअर’ या नव्या विभागाचाही समावेश करण्यात आला आहे. या प्रकाशन समारंभात सतीश गुजराल, डॉ. विजयपत सिंघानिया, जे. एन. कौल, कमांडर उदय सौंधी, निशांत कासीभाटला यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ❐


Amruta's Mehendi Designs
Bridal & Arabic




**अमृता खोड्ये**

मेहेंदीच्या विविध प्रकारांबद्दल सचित्र मार्गदर्शन करणारे पुस्तक

**५०रु. / पोस्टेज २०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**








बालपणीच्या उबदार आठवणींची, संवेदनशील, भावनिक गुंफण.

**फुले आणि पत्री**

**माधुरी शानभाग**

स्वर्गीय आवाज लाभलेल्या एका गायिकेची; अपालाची संघर्षमय कहाणी

**गांधर्वी**

**बाणी बसू**

**अनु. मृणालिनी गडकरी**

**१७०रुपये**




**पोस्टेज २५ रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# ओळख डॅन ब्राऊनची



द दा विंची कोड या कादंबरीने गेल्या तीन वर्षांत कोट्यवधी रुपये मिळवणारा भाग्यवंत लेखक डॅन ब्राऊन हा फक्त चाळीस वर्षे वयाचा आहे आणि फक्त चार पुस्तकांचा लेखक आहे.

डॅनची पहिली कादंबरी १९९८ मध्ये प्रसिद्ध झाली. डिजिटल फोर्ट्रेस. तिची नायिका सुसान फ्लेचर; नॅशनल सिक्युरिटी एजन्सीची क्रिप्टोग्राफर– सांकेतिक गुप्त लिपीची अभ्यासक-तज्ज्ञ.

१९९६ मध्ये पूर्ण वेळ लेखक व्हायचा निर्णय त्याने घेतला तो त्याच्या पत्नीच्या प्रेरणेने...

हॉलिवुडमध्ये बेव्हरली हिल्स प्रिपेटरी स्कूलमध्ये शिक्षक म्हणून नोकरी करणारा डॅन ब्राऊन गायक, गीतकार आणि पियानो वादक या भूमिका करण्यासही उत्सुक होता. त्याचे वडील शिक्षक होते; शालेय पुस्तकांचे लेखक होते. त्याची आई संगीतकार होती. ती चर्चमध्ये ऑर्गन वाजवायची. घरातले वातावरण कट्टर सनातनी. धार्मिक. चर्चमध्ये नियमित जाण्याचे वळण. सुटीमध्ये चर्चतर्फे होणाऱ्या शिबिरांमध्ये आईवडील त्याला आवर्जून पाठवत. ॲमहर्स्ट विद्यापीठातून स्पॅनिश व इंग्लिश साहित्यात पदवी घेतल्यावर डॅनिएलने काही काळ ॲलन लेक या कादंबरीकाराकडे लेखनिक म्हणून काम केले; पण संगीतातही त्याला आवड होती. तो सिंथेसायझरवर संगीतरचना करायचा. मुलांसाठी सिन्थॲनिमल्स ही कॅसेटही त्याने तयार केली. नंतर डॅलिएल्स ही स्वत:चीच संस्था सुरू करून प्रौढांसाठी परस्पेक्टिव्ह हा अल्बम काढला. हॉलिवूड त्याला सारखे साद घालत होते... शिक्षक म्हणून मुलांना हाताळत असताना नॅशनल ॲकॅडमी ऑफ साँग रायटर्स या संस्थेत त्याने नाव नोंदवले... या संस्थेची संचालिक ब्लिथ न्यूलॉन त्याला मार्गदर्शन करी. ती त्याच्यापेक्षा दहा-बारा वर्षांनी मोठी; पण नव्या कवींच्या गीतांना मार्केट मिळवून देण्यामध्ये प्रवीण... तिला डॅनच्या संगीतक्षेत्रातील धडपडीला मर्यादा आहेत असे कुठेतरी जाणवले असावे... त्याच्या लेखनगुणाची अधिक खात्री तिला वाटली असावी... आणि त्याच्या सहवासाची ऊबही तिला सुखद, उत्कट अनावर झाली... आणि आपल्यापेक्षा वयाने अधिक असलेल्या ब्लिथच्या प्रेमात डॅनही पडला. ती त्याची लेखनातलीही सहकारी झाली.

डिसेप्शन पॉइंट ही दुसरी कादंबरी 'नासा' या अमेरिकन अंतरिक्ष प्रवास संशोधन केंद्राच्या पार्श्वभूमीवर आधारलेली आहे. रॅचेल सेक्स्टन ही बुद्धिमान संशोधिक नायिका. विश्लेषणात तरबेज. कोणाही पुरुषात न्यूनगंड निर्माण व्हावा इतकी हुशार आणि तल्लख.

'एंजल्स अँड डेमन्स' या कादंबरीत प्रा. रॉबर्ट लँगडन ही व्यक्तिरेखा प्रथम येते. हार्वर्ड युनिव्हर्सिटीतील कलेचा इतिहास आणि धार्मिक प्रतिकशास्त्र यांचा हा प्राध्यापक... आपल्या बुद्धिचातुर्याने आणि कलाविषयक विश्लेषणाने जगभर लौकिकप्राप्त. व्हॅटकिन, इल्युमिनाटी पंथ, महास्फोट सिद्धान्त वगैरे विषयांवरील त्याची मते प्रक्षोभक आणि स्फोटक असतात. 'द दा विंची कोड'मध्ये हाच डॅन ब्राऊन प्रतिकशास्त्राचा जाणकार भाष्यकार म्हणून होली ग्रेलशी संबंधित गूढ रहस्यांवर प्रकाश टाकतो.

**–शंकर सारडा**

## सभासदांना विनंती

भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पीनकोड सहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य झाले आहे. आपला अंक वितरित होण्यासाठी कृपया पीनकोडसह आपला संपूर्ण पत्ता लिहून पोस्टकार्डद्वारे मासिकाच्या पत्त्यावर पाठवावा. हि विनंती.

## दर्जेदार असे काही.....

# मारिओ पुझो



'गॉडफादर' या विश्वविख्यात कादंबरीचे लेखक मारिओ पुझो यांच्या बहुतांश कादंबऱ्या संघटित गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर आधारित आहेत. मुळचे इटालियन असणारे पुझो संघटित गुन्हेगारीच्या एकूणच अंतर्रचनेवर आपल्या कादंबऱ्यांद्वारे झगझगीत प्रकाश टाकतात What a wicked world, it drove a man to sin असे नमूद करून त्यांनी गुन्हेगारी निर्माण होण्याबद्दल देशोदेशीच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीलाच जबाबदार धरले आहे.

गॉडफादर खेरीज पुझोंच्या 'द लास्ट डॉन, ओमेर्ता, द फोर्थ के' आदी कादंबऱ्याही संघटित गुन्हेगारीचे मानवी जीवनावर होणारे दूरगामी परिणाम दाखवतात. वाचकाला वास्तवाबद्दल अधिक सजग, सावध करतात. अशा या कादंबऱ्यांचे उत्कृष्ट मराठी अनुवाद...

**पोस्टेज प्रत्येकी २५ रु.**




**द लास्ट डॉन**


अनु. अनिल काळे


किंमत ३५०रु.

**ओमेर्ता**

अनु. अनिल काळे

किंमत २२०रु.




**द फोर्थ के**


अनु. वनिता सावंत

किंमत २००रु.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# 'ओशो' यांचे साहित्य



पूर्व आणि पश्चिमेकडील असा कोणताही धर्म, पंथ, मतवाद, तत्वज्ञान नाही जेथे 'ओशो' रजनीशांची सूक्ष्म दृष्टी पोचलेली नाही. काही विशेष कारणांनी त्यांनी एखादा विषय सोडून दिलाही असेल. परंतु या जगात जेवढे धर्म आणि मतमतांतरे आहेत त्या सर्वांचा समन्वय त्यांच्या विचारांमध्ये दिसून येतो. कृष्ण, बुद्ध , महावीर, शंकराचार्य आणि जीझस यांच्यापासून ते काण्ट, हेगेल आणि श्रीअरविंदांपर्यंत ते सर्वांशी चर्चा करतात आणि गीता, वेदोपनिषदांपासून कबीर, ताओ, झेन, तंत्रापर्यंत सर्व तत्वज्ञान त्यांच्या दृष्टीसमोर हजर असते.

तत्वज्ञान आणि काव्य यांचे अपूर्व मीलन ओशोंच्या अप्रतिम साहित्यात आढळते ओशोंच्या काही निवडक पुस्तकांचे अनुवाद 'मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे' करण्यात आले आहेत. अशी काही पुस्तके....

| | | |
|---|---|---|
| **एक एक पाऊल** | अनु. भारती पांडे | १००/- |
| **म्हणे कबीर दिवाणा** | अनु. भारती पांडे | १२०/- |
| **भक्तीत भिजला कबीर** | अनु. भारती पांडे | १२०/- |
| **हा शोध वेगळा** | अनु. भारती पांडे | १२०/- |
| **माझे माझ्यापाशी काही नाही** | अनु. भारती पांडे | १२०/- |
| **हसत-खेळत ध्यानधारणा** | अनु. मीना टाकळकर | ७०/- |
| **मुग्ध कहाणी प्रेमाची** | अनु. मीना टाकळकर | १२०/- |
| **ध्यानसूत्र** | अनु. माधव कर्वे | १००/- |
| **मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही** | अनु. मृणालिनी गडकरी | ९०/- |
| **नवी पहाट** | अनु. प्रज्ञा ओक | १२०/- |
| **साक्षात्काराची देणगी** | अनु. प्रज्ञा ओक | १५०/- |
| **स्वत:चा शोध** | अनु. प्रज्ञा ओक | १५०/- |
| **विद्रोही** | अनु. माधुरी काबरे | १२०/- |
| **बंडखोर** | अनु. माधुरी काबरे | ९०/- |


**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

विशेष वार्ता

## सहावे अखिल भारतीय भाषिक प्रकाशक संमेलन पुण्यात संपन्न

फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, दिल्ली आणि अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले सहावे अखिल भारतीय प्रकाशक संमेलन दिनांक १६ व १७ जून रोजी पुण्यात संपन्न झाले. प्रकाशकांचे असे पहिलेच संमेलन पुण्यात आयोजित केले गेले. देशभरातील तसेच महाराष्ट्रातील अनेक नामवंत प्रकाशकांनी यात सहभाग घेतला.

या संमेलनात एकूण चार विषयांवर चर्चासत्रे झाली. यात वाचनसंस्कृतीचा विकास, नवीन तंत्रज्ञान आणि प्रादेशिक भाषांमधील प्रकाशने, प्रादेशिक भाषेतील साहित्याचा इतर भाषांत प्रसार व वितरण– भारतात आणि भारताबाहेर, केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना व त्यांचा भाषिक प्रकाशकांना होणारा उपयोग आदी विषयांबाबत ऊहापोह झाला.



FIP चे मानद अध्यक्ष मा. दीनानाथ मल्होत्रा दीप प्रज्वलन करताना डावीकडे FIP चे अध्यक्ष मा. शक्ती मलिक, उजवीकडे मा. विश्वास दास्ताने

संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ प्रकाशक सदानंद भटकळ (पॉप्युलर प्रकाशन, मुंबई) तसेच दीनानाथ मल्होत्रा (मानद अध्यक्ष, FIP) यांच्या शुभहस्ते झाले. उद्घाटन सत्रात बोलताना 'FIP' चे अध्यक्ष शक्ति मलिक यांनी 'FIP' च्या स्थापनेचा उद्देश, महत्त्व व भूमिका स्पष्ट केली. मराठी प्रकाशकांनी अशा संमेलनांमध्ये भाग घेऊन अधिक संख्येने उपस्थित राहिले पाहिजे, तसेच मराठीतील अनेक दर्जेदार साहित्यकृतींचे इतर भाषांत अनुवाद झाले पाहिजेत, अशी अपेक्षा मलिक यांनी व्यक्त केली.

ज्येष्ठ प्रकाशक सदानंद भटकळ यांनी आपले हृद्य व अनुभवसंपन्न मनोगत व्यक्त केले. या संमेलनामुळे प्रकाशनक्षेत्रातील दुसऱ्या व तिसऱ्या पिढीशी हितगुज साधता येईल, अशी अपेक्षा त्यांनी प्रकट केली.

मराठी प्रकाशक संघाच्या कार्याचा आढावा घेताना अध्यक्ष विश्वास दास्ताने म्हणाले, १९९६ साली 'अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघा'ची स्थापना झाली. पुणे हे मुख्यालय असून स्थापना झाल्यापासून संघाने अनेक पूरक उपक्रम आयोजित केले. पुस्तक प्रदर्शनांचे लहान गावात आयोजन करण्यात आले. या निमित्ताने नवीन पुस्तकही ग्रामीण भागात पोहोचू लागले. वाचनाची आवड जोपासण्यासाठी लहान मुलांच्या कार्यशाळा आयोजित केल्या. त्याचा अपेक्षित परिणाम हळूहळू साध्य होत आहे. लवकरच पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाच्या सहकार्याने प्रकाशन-व्यवसाय अभ्यासक्रम अंमलात येणार असून 'शरद गोगटे' यांनी या योजनेला मूर्त रूप दिले आहे, असे दास्ताने यांनी सांगितले.

या प्रसंगी मराठीतील काही नामवंत प्रकाशकांचा आणि पुस्तकविक्री व्यवसायाला विशेष योगदान देणाऱ्या विक्रेत्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यात पद्मगंधा प्रकाशनचे अरुण जाखडे, पॉप्युलर बुक सेंटरचे नंदकुमार बजाज, विद्या बुक्स, औरंगाबादचे शशिकांत पिंपळापुरे, जवाहर बुक डेपो, मुंबईचे दिलीप भोगळे, कोल्हापूरचे अरुण गाडगीळ तसेच वरदा प्रकाशनचे ह. अ. भावे आदींचा समावेश होता.

भारतीय प्रकाशनक्षेत्राचे अर्ध्वयू मानले जाणारे दिल्लीच्या 'हिंद पॉकेट बुक्स'चे दीनानाथ मल्होत्रा यांचे बीजभाषण उपस्थित सर्वच प्रकाशकांना मार्गदर्शक ठरले. ते म्हणाले, आज पुस्तक प्रकाशनक्षेत्रात भारताचा जगात सहावा क्रमांक असून आपल्याकडे २२ भाषांमध्ये एकूण ८०,००० पुस्तके दरवर्षी प्रकाशित होतात. जगात सर्वाधिक वाचकसंख्या भारतात आहे हे प्रमाण निश्चितच आशादायक आहे. भारतीय प्रकाशक संघटित झाल्यास निश्चितच एक मोठी क्रांती घडेल मात्र दुर्दैवाने आपण संघटित होण्याबाबत उदासीन आहोत.

प्रकाशक हा लेखक आणि वाचक यांच्यातील मध्यस्थ न राहता तो समाजात मोठी भूमिका बजावू शकतो. वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी लेखक आणि प्रकाशकांनी मोठ्या संख्येने एकत्र आले पाहिजे. लेखक आणि प्रकाशकातील व्यक्तिगत सौहार्दपूर्ण स्नेह जपल्यास प्रकाशनक्षेत्राचे मूल्य जपले जाईल, असे




**उपाध्यक्ष अनिल मेहता, मानद अध्यक्ष दीनानाथ मल्होत्रा यांच्याशी हितगुज करताना, मध्यभागी शक्ती मलिक**

मल्होत्रा म्हणाले.

उद्घाटन सत्रानंतर 'वाचनसंस्कृतीचा विकास' या विषयावर पहिले सत्र झाले. यात प्रामुख्याने नागपूर येथील साहित्य प्रसार केंद्राच्या 'मकरंद कुलकर्णी' यांनी केंद्राने चालवलेल्या उपक्रमांबाबत माहिती दिली. ते म्हणाले, १९७० साली नागपूरात 'साहित्य प्रसार केंद्र' सुरू झाले. १९७५ साली प्रायोगिक स्तरावर मुलांसाठी वाचनस्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यात आले. 'विद्यार्थ्यांनी पुस्तके स्वत: खरेदी करून वाचनाची सवय लावून घेतली पाहिजे' हा या उपक्रमाचा हेतू होता. त्यासाठी हा उपक्रम अतिशय यशस्वी झाला. दहावी-बारावीच्या तसेच स्पर्धापरिक्षेतील अनेक गुणवंतांनी या उपक्रमाला आपल्या यशाचे मूळ श्रेय दिले आहे. यासारखीच दुसरी म्हणजे 'रसिक-वाचक संघ योजना'. या योजनेनुसार २२ रुपये भरून केंद्राचे सभासद होता येते. ही योजनाही गेली पंचवीस वर्षे यशस्वीरीत्या चालू आहे, अशी माहिती कुलकर्णी यांनी दिली.

दुसऱ्या सत्रात केरळ येथील डी. सी. बुक्सचे संचालक रवी डी. सी. यांनी 'नवीन तंत्रज्ञान आणि प्रादेशिक भाषा प्रकाशने' या विषयावर मार्गदर्शन केले. भविष्यात प्रकाशनव्यवसाय कसा असेल आणि नवीन तंत्रज्ञानाचा त्यात कशा प्रकारचा अंतर्भाव असेल याचे उत्कृष्ट प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करताना रवी यांनी उपस्थित प्रकाशकांना दिङ्मूढ केले. प्रकाशकांनी प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक



पुस्तकाबरोबरच त्याच्या सीडीचेही निर्माण करावे असा सल्ला देताना रवी यांनी ई-बुक्स, ई-न्यूजलेटर्स, पोर्टल्स, वेबसाइट, ऑनलाइन शॉपिंग आदी अत्याधुनिक सुविधांचा प्रकाशनव्यवसायात प्रभावी वापर होऊ शकतो, याचे महत्त्व पटवून दिले.

तिसऱ्या सत्रात पॉप्युलर प्रकाशनच्या 'रामदास भटकळ' यांनी 'अनुवाद प्रक्रियेवर' प्रकाश टाकला. ते म्हणाले, आज देशातील अनेक भाषांमध्ये उत्तमोत्तम साहित्य आहे. मात्र ते सर्व भाषांत जाण्यासाठी त्याच्या व्यापक अनुवादकार्याची आवश्यकता आहे. 'साहित्य अकादमी' आदी संस्था अनुवादाचे कार्य करतात मात्र याला ठराविक गती मिळणे आवश्यक आहे. याला केंद्रस्थानी धरून लवकरच अनुवाद सुविधा केंद्र आकाराला येत आहे. यात सर्वप्रथम गुजराती, मराठी, कन्नड, सिंधी आणि कोकणी या भाषांचा अंतर्भाव आहे. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'सारख्या अनुवादाला चालना देणाऱ्या प्रकाशनसंस्थांच्या सहकार्याने या प्रक्रियेला गती देण्यात येईल, असे भटकळ यांनी सांगितले.

गुजरात येथील नवजीवन ट्रस्टचे प्रमुख 'जितेनभाई देसाई' यांनी पुस्तकांच्या वितरण प्रक्रियेबाबत मौलिक मार्गदर्शन केले. ते गुजरात विद्यापीठाचे माजी कुलगुरू असताना गुजरातमधील प्रत्येक विद्यापीठात किमान एक पुस्तकविक्री केंद्र असावे, अशी योजना मांडली गेली होती. मात्र योजना उत्तम असूनही, इतर कुलगुरूंच्या उदासीन वृत्तीमुळे असफल झाल्याचे त्यांनी सांगितले.

चौथ्या सत्रात महाराष्ट्र राज्याचे ग्रंथालय उपसंचालक 'आनंद केळकर' तसेच दिलीपराज प्रकाशनचे 'राजीव बर्वे' यांनी केंद्र व राज्य सरकारतर्फे चालवल्या जाणाऱ्या विविध शिक्षण योजनांची माहिती दिली. या योजनांचा प्रकाशकांना कसा उपयोग होऊ शकतो, याचेही मार्गदर्शन त्यांनी केले. राज्यपुरस्कारार्थ निवडल्या जाणाऱ्या ग्रंथनिवड समितीत प्रकाशकांचा प्रतिनिधी असावा, अशी सूचना त्यांनी केली.

शेवटच्या सत्रात FIP चे अध्यक्ष शक्ति मलिक आणि मराठी प्रकाशक संघाचे मानद अध्यक्ष शरद गोगटे यांनी संपूर्ण अधिवेशनाचा आढावा घेतला. उपस्थित सर्व प्रकाशकांना या संमेलनाने नवी दिशा दिल्याचे गोगटे यांनी सूचित केले. अशा अधिवेशनांमुळे प्रकाशनव्यवसायाला अत्यंत पूरक मार्गदर्शन मिळते, असे सांगून गोगटे यांनी संमेलनाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल FIP चे उपाध्यक्ष अनिल मेहता यांचे आभार मानले. उपस्थित सर्व प्रकाशकांनीही टाळ्यांच्या गजरात अनिल मेहता यांना मानवंदना दिली.

❐

## दखल



# रवी डी. सी.

## आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरणारा प्रकाशक

पुण्यातील सहाव्या अखिल भारतीय प्रकाशकसंमेलनासाठी कोट्टयायम, केरळहून आलेल्या रवी डी. सी. या तरुण, उमद्या प्रकाशकाने संपूर्ण संमेलनावर छाप पाडली. प्रकाशन व्यवसायाला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन रवी डी. सी. यांनी केरळमधील ८०% बाजारपेठ काबीज केली आहे. आज ते भारतातील पहिल्या 'पाच' नामवंत प्रकाशकांमध्ये गणले जातात.

रवी डी. सी. यांची 'डी. सी. बुक्स' ही केरळमधील सर्वात मोठी प्रकाशनसंस्था आहे. आजमितीस या प्रकाशनसंस्थेची 'स्वत:ची' ३७ पुस्तकविक्री केंद्रे आहेत. दररोज किमान एक पुस्तक प्रकाशित करण्याचा 'डी. सी. बुक्स'चा लौकिक आहे.

रवी यांचे वडील दिवंगत 'श्री. किझायकेमुरी' हे मल्याळम प्रकाशन व्यवसायाचे अर्ध्वयू समजले जात. मल्याळम भाषेतील प्रकाशन व्यवसायात 'स्व. किझायकेमुरी' यांनी दिलेल्या उल्लेखनीय योगदानामुळे भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' पुरस्काराने गौरविले. वडिलांनी स्थापित केलेल्या व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत रवी यांनी आपल्या प्रकाशनसंस्थेचे कार्य आणखी व्यापक केले आहे.

ग्रंथप्रसार व प्रचारकार्याशी निगडीत अनेक केंद्रीय व राज्यस्तरीय समित्यांवर कार्यरत असणाऱ्या रवी डी. सी. यांनी प्रादेशिक भाषांमधील पुस्तकांची 'मल्याळम भाषांतरे' मोठ्या प्रमाणावर केली आहेत. मराठीत रणजित देसाई यांनी 'राजा रविवर्मा', वि. स. खांडेकर यांच्या 'अमृतवेल' व 'ययाति' तसेच विश्वास पाटील यांच्या 'महानायक' या कादंबऱ्यांचा मल्याळममध्ये अनुवाद प्रकाशित झाला आहे.

❐




## चरित्र / व्यक्तीचरित्र...



राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या दैदिप्यमान व्यक्तीमत्वाचा, कार्यकर्तृत्वाचा सर्वंकष वेध

**योद्धा शास्त्रज्ञ राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम**

**माधव मोर्डेकर** — ४० रुपये

दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर आकाशाला गवसणी घालणाऱ्या अंतराळवीर कल्पना चावलाची प्रेरक चरित्रकहाणी

**स्वप्नाकडून सत्याकडे**

(कल्पना चावलाची कहाणी)

४० रुपये — **माधुरी शानभाग**






कल्पक आणि प्रतिभासंपन्न दिग्दर्शनातून उच्च अभिरूचीचे चित्रपट देणाऱ्या मा.विनायकांच्या चतुरस्त्र व्यक्तीमत्वाचा आढावा

**जीवनयात्रा अभिनेता-दिग्दर्शक मा. विनायक**

**भाई भगत** — १५० रुपये

पोस्टेज प्रत्येकी २० रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.




# द दा विंची कोड

## गेल्या तीन वर्षांत सर्वांत जास्त खपलेले पुस्तक

**मूळ लेखक-डॅन ब्राऊन**
**अनुवाद- अजित ठाकूर**

'द दा विंची कोड'चा मराठी अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे नुकताच बाजारात आला आहे. जगभर गेल्या तीन वर्षांत पाच कोटी प्रतींच्या खपाचा उच्चांक गाठणाऱ्या या कादंबरीवरील चित्रपटानेही पहिल्याच वीकएंडला बॉक्स ऑफिसवर ३.७ बिलियन डॉलर्सची कमाई करून आजवरच्या विक्रमी उत्पन्नाच्या सर्वोच्च चित्रपटांत स्थान पटकावले आहे. एकूणच लेखक डॅन ब्राऊनचे नशीब जोरदार दिसते.

येशू ख्रिस्त आणि ख्रिश्चन धर्म या संदर्भात वेगळी भूमिका मांडण्याचा प्रयत्न अनेक संशोधक गेली शेकडो वर्षे करीत आहेत; त्यात येशू ख्रिस्ताचा मृत्यू, त्याचे पुनरुत्थान, त्याच्या धर्माचा नंतर झालेला प्रसार, त्या शिष्यवर्गातील सुंदोपसुंदी आणि सरशीचे राजकारण, बायबलची रचना, ख्रिस्ती धर्माची संघटनात्मक व संस्थात्मक बांधणी, मूळ ख्रिस्ताच्या शिकवणीतील गैरसोयीच्या भागाला दुय्यम स्थान देण्याचा चर्च व व्हॅटकिन यांजकडून झालेला प्रयत्न, त्या संदर्भात पाळण्यात आलेली गुप्तता, ती गुप्तता टिकवण्यासाठी उभी केली गेलेली यंत्रणा वगैरे विषयांबाबत युरोप-अमेरिकेत सतत नवनवीन संशोधनात्मक पुस्तके प्रसिद्ध होत आहेत. इ.स. १०९९ मध्ये स्थापन झालेली प्रायरी ऑफ सायन ही संस्था युरोपात कार्यरत आहे. तिची स्थापना गोडफ्रुआ द बुइयाँ या फ्रेंच राजाने जेरुसलेम शहरावर कब्जा मिळवल्यावर केली. येशू ख्रिस्ताच्या काळापासून ज्या रहस्याचे जतन त्याच्या घराण्याने केले होते, ते रहस्य पुढेही अबाधित राहावे, दुसऱ्या कोणाला ते कळू नये यासाठी ही ब्रदरहूड त्याने स्थापन केली; एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हे रहस्य पोहोचवण्याची जबाबदारी या पंथावर टाकली गेली. जेरुसलेममधली मूळ सालोमनच्या उद्ध्वस्त देवळाच्या अवशेषाखाली काही कागदपत्रे



लपवलेली होती, त्या कागदपत्रांत गोडफ्रुआचे रहस्य नोंदवलेले होते; ते गुप्त कागदपत्र हस्तगत करण्यासाठी चर्चचेही प्रयत्न चालू होते. प्रायरीने हे गुप्त कागदपत्र त्या अवशेषांखालून काढण्यासाठी एक सैनिकी गट तयार केला. त्यासाठी नऊ सरदारांची नेमणूक केली. त्यांना टेम्पलर नाइटस असे नाव मिळाले. टेम्पलर सरदारांबद्दल बऱ्याच दंतकथा-आख्यायिका प्रचलित होत्या. यात्रेकरूंचे संरक्षण करण्याचे काम हे सरदार करीत असे बाह्यत: सांगण्यात येई; परंतु त्यांचे खरे काम देवळाच्या उद्ध्वस्त ढिगाऱ्याखाली असणारी कागदपत्रे शोधणे हे होते. त्या सरदारांना काहीतरी नक्कीच सापडले; त्यामुळे ते कल्पनातीत श्रीमंत व प्रभावशाली झाले. राजाच्या परवानगीने त्यांनी उद्ध्वस्त मंदिरामध्येच आपले मुख्य केंद्र उभे केले. या देवळातच प्रायरीची कागदपत्रे आणि खजिना लपवलेला आहे. नऊ वर्षे त्यांनी शोध घेऊन तेथील खजिना युरोपात नेला.

**प्रायरीने हे गुप्त कागदपत्र त्या अवशेषांखालून काढण्यासाठी एक सैनिकी गट तयार केला. त्यासाठी नऊ सरदारांची नेमणूक केली. त्यांना टेम्पलर नाइटस असे नाव मिळाले.**

दुसरा पोप इनोसंट याने या सरदारांना स्वतंत्र सैन्याचा दर्जा दिला; राजे व धर्मगुरू यांचा अंकुश त्यांच्यावर चालू नये अशी या हुकुमनाम्यामुळे सोय झाली. त्याचा फायदा घेऊन त्यांनी बारा देशांमध्ये प्रचंड संपत्ती गोळा केली. त्यातून सध्याची बँकिंग व्यवस्था सिद्ध झाली. त्यांची वाढती ताकद पाहून पोप पाचवे क्लेमंट यांनी टेम्पलर सरदारांचा पराभव करून त्यांची संपत्ती मिळवण्यासाठी एक गुप्त कट आखला. शुक्रवार १३ ऑक्टोबर १३०७ या दिवशी या सरदारांची धरपकड करून त्यांना नेस्तनाबूत करण्याबद्दल युरोपातल्या आपल्या सर्व सैनिकांना आदेश पाठवले. त्या आदेशात या सरदारांवर पाखंडी, समसंभोग करणारे, सैतानाची पूजा करणारे, लैंगिकदृष्ट्या विकृत, क्रूसचा अनादर करणारे वगैरे आरोप करून त्यांना पकडून, शिक्षा देऊन पृथ्वीवरचे पाप धुवून काढावे असे म्हटले होते. या योजनेनुसार बऱ्याच सरदारांना जाळण्यात आले. छळण्यात आले. परंतु या सरदारांचेही काही हितचिंतक सत्तेवर होते; त्यामुळे त्यांनी गुप्त कागदपत्रे व्हॅटिकनच्या हाती पडू दिली नाहीत. ती प्रायरी ऑफ सायनकडून मिळवून रातोरात टेम्पलर सरदारांच्या एका जहाजावर हलवली. तेथून ती कोठे हलवली गेली. हे फक्त प्रायरीच्याच प्रमुखांना ठाऊक असण्याची शक्यता. ते कागदपत्र लंडनमध्ये वा इंग्लंडमध्ये

**आता हे जे काही गुपित आहे त्याबद्दल सांगरीयल असाही एक शब्द वापरण्यात येतो. सांगरीयल म्हणजे होली ग्रेल. शेवटचा प्याला. येशूचा चषक असे मानले जात असले तरी काहींच्या मते ही चषकाची गोष्ट रूपकात्मक आहे.**

कुठेतरी असावेत असा एक अंदाज. प्रायरीच्या फक्त चार प्रमुख सदस्यांना हे गुपित ज्ञात असावे, असा संकेत आहे. हे गुपित कागदपत्रांप्रमाणे एखाद्या वस्तूच्या वा व्यक्तीच्या रूपातही असू शकेल. होली ग्रेल म्हणजे क्रूसावर चढण्यापूर्वी आपल्या शिष्यांसमवेत भोजन घेताना ख्रिस्ताने वापरलेला कप वा चषक या स्वरूपात किंवा गुप्त खजिन्याच्या नकाशाच्या रूपात किंवा येशूच्या जीवनरहस्यातील साथीदार मेरी मॅगदालेन आणि तिच्या वंशजाच्या रूपात असू शकेल– असेही तर्क वेळोवेळी मांडण्यात येतात.

आता हे जे काही गुपित आहे त्याबद्दल सांगरीयल असाही एक शब्द वापरण्यात येतो. सांगरीयल म्हणजे होली ग्रेल. शेवटचा प्याला. येशूचा चषक असे मानले जात असले तरी काहींच्या मते ही चषकाची गोष्ट रूपकात्मक आहे. त्याचा स्त्रीत्वाशी संबंध असावा... प्रायरीच्या प्रमुखांची हजार वर्षांची परंपरा दाखवता येते. तिचे प्रमुख सदस्य म्हणून लिओनार्दो द विंची, न्यूटन, व्हिक्टर ह्युगो, ज्यां कॉक्टो यांनी काम केल्याचे आढळते.

प्रायरी ऑफ सायन या गुप्त रहस्याचे पिढ्यान्‌पिढ्या ज्याप्रमाणे जतन करते आहे, त्याचप्रमाणे ते रहस्य जाणून घेण्यासाठी ओपस देई ही दुसरी एक गुप्त संघटनाही कार्यरत आहे. ती पोपच्या, व्हॅटिकनच्या आधाराने व आशीर्वादाने फोफावते आहे. प्रायरी ऑफ सायनच्या सदस्यांचा मागोवा घेत राहून ती कागदपत्रे हस्तगत करणे, प्रायरीच्या सदस्यांना छळणे वा ठार मारणे, त्यासाठी मारेकरी वा निष्ठावंत अनुयायी तयार करणे, कॅथॅलिक धर्माशी कट्टर निष्ठा बाळगून प्रायरीतर्फे त्या विरोधात जे काही होण्याची शक्यता आहे, त्याचा वेळीच बंदोबस्त करणे हा ओपस देईचा उद्देश. या संस्थेचे काम आताही गुप्तपणे चालते आहे. न्यूयॉर्कमध्ये या संस्थेने लेक्सिंग्टन ॲव्हेन्यूवर पावणेपाच कोटी डॉलर्स खर्च करून आपले राष्ट्रीय कार्यालय नुकतेच उभे केले आहे. त्यावर आता स्वतंत्र पुस्तकेही निघाली आहेत. ओपस देईला गॉड्स् माफिया, कल्ट ऑफ ख्राइस्ट असेही कोणी म्हणतात. खुद्द पोपनेच तिला मान्यता व धर्माधिकार दिलेला आहे. या संस्थेच्या विरोधकांनी एका वेबसाइटवर या पंथाच्या क्रौर्याची उदाहरणे दिलेली आहेत. कॅथॉलिक तत्त्वे कडकपणे पाळणे, शुद्ध आचरण ठेवणे, स्वत:ला



आत्मक्लेश करून घेणे, आश्रमीय जीवन अंगीकारणे, परमेश्वराचे कार्य करणे– वगैरे नियम काटेकोरपणे अमलात आणले जात.

या दोन्ही गुप्त संघटनांच्या अस्तित्वाचे पुरावे आता उपलब्ध आहेत.

'द दा विंची कोड' ही ऐतिहासिक रहस्यकथा लिहिताना डॅन ब्राऊनने या दोन्ही संघटनांमधील स्पर्धा-संघर्षाचा चपखल वापर करून घेतला आहे. त्या निमित्ताने गुप्त कागदपत्रांच्या सांकेतिक लिपीचे वाचन, धार्मिक प्रतिकांचे अध्ययन-आकलन यांचाही उपयोग केला आहे. ह्या कादंबरीतील या संस्था, चर्च व शिल्पकला, चित्रकला यांची वर्णने अचूक आहेत असा निर्वाळा डॅन ब्राऊन आरंभीच देतो.

**पॅरिसमधील लूव्हरे म्युझियम, लंडन-स्कॉटलंडमधील चर्चेस, लिओनार्डो द विंची याची द लास्ट सपर, मोनालिसा वगैरे गाजलेली चित्रे, ओपस देई वगैरे संघटनांची कार्यपद्धती यांचाही कथानकाच्या रचनेसाठी चातुर्याने वापर केला आहे.**

कादंबरीच्या आरंभीच 'हे सगळे वास्तव व अचूक आहे' असे रोखठोकपणे बजावण्यात आल्याने वाचकांची अपेक्षा वा जिज्ञासा चाळवली जावी हे स्वाभाविकच होय.

पॅरिसमधील लूव्हरे म्युझियम, लंडन-स्कॉटलंडमधील चर्चेस, लिओनार्डो द विंची याची द लास्ट सपर, मोनालिसा वगैरे गाजलेली चित्रे, ओपस देई वगैरे संघटनांची कार्यपद्धती यांचाही कथानकाच्या रचनेसाठी चातुर्याने वापर केला आहे. धार्मिक प्रतीके आणि सांकेतिक गुप्तलिपीचे वेगवेगळे प्रकार या कागदपत्रांमध्ये अनुस्यूत आहेत आणि त्यांचा अभ्यास करणारे म्हणून हार्वर्ड विद्यापीठातील धार्मिक प्रतिकशास्त्राचे प्रा. रॉबर्ट लँगडन, क्रिप्टोलॉजीची अभ्यासक सोफी नेव्ह्यू आणि होली ग्रेलचे अभ्यासक ली टीबिंग या व्यक्तिरेखा कादंबरीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

कादंबरीच्या 'प्रास्ताविक' प्रकरणातच लूव्हरे वस्तुसंग्रहालयाचा क्युरेटर जॅक सॉनिए याच्यावर एका भव्य चित्रदालनात रात्री दहानंतर हल्ला झालेला असून हल्लेखोर ''ती वस्तू कुठं आहे ते सांग'' असे म्हणताना समोर येतो.

''तू काय म्हणतो आहेस ते माझ्या लक्षात येत नाही'' असे म्हणून क्युरेटर उडवाउडवीचा प्रयत्न करतो. पण हल्लेखोर त्याने थांबत नाही. ''आज ती वस्तू मूळ मालकाला परत करायची आहे. ती कुठे लपवली आहेस ते सांग. प्राण गमवावे एवढे हे गुपित तुला महत्त्वाचे वाटते का?''

तेव्हा जॅक सॉनिए त्याला काहीतरी सांगतो.

**लँगडन त्या प्रतिकाचा अर्थ प्रेम व देवतांचे दैवत, स्त्रीचे पावित्र्य; पण सध्या हे चिन्ह रक्तपाताशी, सैतानाशी निगडित मानले जाते हेही स्पष्ट करतो.**
**13-3-2-21-1-1-8-5**
**O, Draconian Devil%**
**Oh, Lame Saint**

हल्लेखोर त्यावर म्हणतो, ''इतर तिघांनी मला असेच सांगितलेय... तूही गेलास की केवळ हे गुपित जाणणारा मी एकटाच उरेन.'' आणि हल्लेखोराची आणखी एक गोळी सॉनिएच्या दिशेने सुटते.

हल्लेखोर निघून जातो. जखमी सॉनिए अंगातले सर्व बळ एकवटून हे गुपित माझ्याबरोबर जाता कामा नये, ते योग्य व्यक्तीपर्यंत पोचवायलाच हवे म्हणून आपल्या रक्ताने स्वत:च्या उघड्या शरीरावर एक पेंटॅकलची आकृती काढतो. जमिनीवर चार ओळी सांकेतिक भाषेत लिहितो... एक चित्र ओढून घेऊन सुरक्षा यंत्रणा चालू करतो.. घंटा वाजते. पोलिस येतात... त्याचा निष्प्राण देह बघतात. त्याच्या देहावरचे ते चिन्ह आणि त्या चार ओळी वाचून कोड्यात पडतात... त्या संध्याकाळी हार्वर्डचा धार्मिक प्रतीकशास्त्राचा प्राध्यापक डॉ. राबर्ट लँगडन याच्याबरोबर जेवणाची क्युरेटरची अपॉइंटमेंट असते हे डायरीवरून पोलिसांना दिसते... ते डॉ. लँगडनला हॉटेलमध्ये मध्यरात्रीनंतर भेटतात... गुप्तहेरखात्याचा प्रमुख लेफ्टनंट जेरोम कोलेत क्युरेटरच्या मृतदेहाची छायाचित्रे दाखवून चौकशी करतो... शरीरावरील ती चिन्हे बघून लँगडनला आश्चर्य वाटते... त्याला लूव्हरे म्युझियममध्ये नेण्यात येते... तेथे फ्रेंच केंद्रीय गुप्तहेर खात्याचा कॅप्टन बेझु फाश त्याला भेटतो; मदोन्मत्त बैलाप्रमाणे गुरगुरत प्रश्न विचारतो... मृतदेह असलेल्या दालनात नेतो... त्या देहावर बेंबीवर पेंटॅकलची, पंचकोनी ताऱ्याची आकृती असते.

लँगडन त्या प्रतीकाचा अर्थ प्रेम व देवतांचे दैवत, स्त्रीचे पावित्र्य; पण सध्या हे चिन्ह रक्तपाताशी, सैतानाशी निगडित मानले जाते हेही स्पष्ट करतो.

13-3-2-21-1-1-8-5

O, Draconian Devil%

Oh, Lame Saint

कॅ. फाश मृतदेहाशेजारी फरशीवर लिहिलेल्या तीन ओळींकडे लँगडनचे लक्ष वेधतो... त्यांचा अर्थ आरंभी तरी लँगडनच्या लक्षात येत नाही.

...त्याचवेळी तेथे गुप्तहेर खात्यातील गुप्तलिपी-तज्ज्ञ अधिकारी सोफी नेव्ह्यू ही तरुणी येते; तिला जॅक सॉनिएच्या मृतदेहाचे फोटो बघायला मिळालेले असतात. म्हणून ती त्यावरच्या खुणांचा वा फरशीवरील संदेशाचा अर्थ लावण्यासाठी तेथे आपण होऊनच आलेली असते. ती जॅक सॉनिएची नात असते; आणि



दुपारीच तिला फोनवरून गाठण्याचा प्रयत्न जॅकने केलेला असतो, त्यामुळे तिला कुतूहल असते. गुप्तलिपी संकेताचे शिक्षण इंग्लंडमध्ये घेऊन आल्यावर फ्रान्सच्या गुप्तहेर खात्यात तिची नेमणूक झालेली असते. बत्तीस वर्षांची सोफी ऑफिसमधल्या सर्वच पुरुषांचे चित्त हरण करणारी ठरली तर नवल नाही.

**सोफी ती ओळ वाचून त्याच्या शोधात आलेली असते. इए चा अर्थ उघडपणे जाणवणारा पोस्टस्क्रिप्ट असा नसून, प्रिन्सेस सोफी असा आहे. तिचे आजोबा तिला प्रिन्सेस सोफी असे लहानपणी म्हणत हे ती स्पष्ट करते...**

सोफी शिताफीने प्रा. लँगडनला 'तुमच्या अमेरिकन एम्बॅसीचा फोन आहे' असे सांगून स्वत:चा रेकॉर्डेड संदेश ऐकवते. ''तुमच्या जीवाला धोका आहे. तुम्ही लगेच अमेरिकन एम्बॅसीमध्ये जा. तरच तुमची अटक टळेल...'' लँगडन बाथरूमला जायचे म्हणून कॅ. फाशच्या तावडीतून तात्पुरती सुटका करून घेतो. कोपऱ्यावरच्या बाथरूममध्ये जातो– तेथे सोफी त्याला भेटून त्याच्या कोटाच्या खिशातून लपवलेली चीप काढून दाखवते. ''तू कोठे जातोस हे या चीपमुळे कॅ. फाशला कळते... असे सांगून ती चीप साबणाच्या वडीत घुसवून खाली उभ्या असलेल्या मालट्रकमध्ये फेकते. मालट्रक सुरू झाल्याबरोबर कॅ. फाश त्यामागे जातो आणि लँगडन-सोफी त्या गुप्त संदेशावर चर्चा करतात. सोफी सांगते, या संदेशात चौथी ओळ होती ती कॅ. फाशने पुसलेली आहे. ती ओळ होती,

PS Find Robert Langdon.

सोफी ती ओळ वाचून त्याच्या शोधात आलेली असते. PS चा अर्थ उघडपणे जाणवणारा पोस्टस्क्रिप्ट असा नसून, प्रिन्सेस सोफी असा आहे. तिचे आजोबा तिला प्रिन्सेस सोफी असे लहानपणी म्हणत हे ती स्पष्ट करते... आपल्या नावाची ही आद्याक्षरे आहेत, आपले आजोबा म्हणजे क्युरेटर जॅक सॉनिए... हे ऐकल्यावर लँगडनही थक्क होतो. त्या संदेशाची फोड करून एका चित्राच्या मागच्या बाजूला बघितल्यावर तिला एक किल्ली सापडते. त्या किल्लीवर काही अक्षरे असतात.

...ट्रकच्या मागावर गेलेला कॅ. फाश आपण फसलो हे लक्षात येताच पुन्हा लूव्हरेवर येतो... सोफी लँगडनला घेऊन पहाऱ्यावरच्या पोलिसांना चुकवून लँगडनला आपल्या कारमधून बाहेर काढते. अमेरिकन वकिलातीकडे जाते. पण तेथे खूप पोलिस दिसतात तेव्हा ती कार उलट दिशेने घेते. किल्लीवरील 24 Rue Haxo ही अक्षरे सोफीला दिसतात... आपली कार स्टेशनवर ठेवून सोफी एका टॅक्सीत बसते. टॅक्सी ड्रायव्हरला त्या पत्त्यावर टॅक्सी घ्यायला सांगते... तो पत्ता असतो

**त्यावेळी होली ग्रेलचा जन्मभर व्यासंग करणाऱ्या श्रीमंत इंग्लिश सरदाराची आठवण लँगडनला होते. तो पॅरिसजवळच एका मोठ्या इस्टेटीवर राहात असतो. संस्थानिकासारखा ऐषआरामात...**

एका स्वीस बँकेचा...

त्या स्वीस बँकेत त्या किल्लीमुळे त्यांना प्रवेश मिळतो. तळघरातल्या गुप्त दालनात सेफ डिपॉझिट व्हॉल्ट असतात. तेथे ते जातात. ती किल्ली आणि पासवर्ड या दोहोंची व्हॉल्ट उघडण्यासाठी गरज असते... हा दहा अंकाचा नंबर– पासवर्ड काय असावा असा प्रश्न सोफीला पडतो... आणि लूव्हरच्या फरशीवरचा 13-3-2-21-1-1-8-5 हा नंबर तिला आठवतो. फिबानोची मालिका उलटसुलट करून मांडणारे हे अंक– बघून सोफीला बँकेतल्या व्हॉल्टच्या नंबरचा अंदाज येतो... आणि फिबानीची 1123581321 ही मालिका समोर ठेवून ती नंबर दाबते... आश्चर्य म्हणजे व्हॉल्ट उघडतो... आत एक बॉक्स असतो. बुटाच्या खोक्याएवढा. पण जड. मजबूत लाकडाचा. झाकणावर गुलाबाचे फूल.

या बॉक्समध्ये आणखी एक पेटी असते... पाच पाकळ्यांचा गुलाब. होली ग्रेलचे प्रतिक... प्रायरीचे बोधचिन्ह... याच खोक्यात ख्रिस्ताचा प्याला, होली ग्रेल असणार की?... त्या खोक्याला हलवले तर आत द्रवपदार्थ असल्याचे जाणवले... आतल्या नळकांड्यात क्रिप्टेक्सच्या पाच चकत्या... त्या विशिष्ट क्रमाने फिरवल्या तर आतले गोल जुळून नळकांडे उघडते... आतील पोकळ जागेत गुप्त कागदपत्रे– वस्तू... सोफीला हे सर्व आजोबांनी लहानपणी सांगितलेले असते... अशा क्रिप्टेक्सची रचना लिओनार्डो द विंचीने केली होती हेही आजोबांनी स्पष्ट केलेले असते, ते तिला आठवते... हा क्रिप्टेक्स जबरदस्तीने उघडण्याचा प्रयत्न केला तर त्यातील माहिती लिहिलेल्या भूर्जपत्रावर आतील काचेच्या बाटलीतील द्रव व्हिनेगार बाटली फुटून भूर्जपत्राला विरघळवून टाकतो. त्या गुप्त संदेशाचा लगदा होऊ शकतो...

पाच चकत्या– त्यावरची २६ अक्षरे– म्हणजे सव्वा कोटी कॉंबिनेशन्स होऊ शकतात... या नळकांड्यात होली ग्रेल कुठे आहे त्याचा नकाशा असेल का? हा कीस्टोन म्हणजे गुलाबाच्या चिन्हाचा आत कोरलेला दगड...लिओनार्डो द विंची या प्रायरीच्या ग्रँडमास्तरने तयार केलेला हा कीस्टोन असेल का?... अशा कीस्टोनचा शोध फ्रान्समधल्या चर्चेसमध्ये इतिहासकार एका दशकावर घेत होते...

मग हा कीस्टोन आजोबांनी माझ्या हाती यावा असे का ठरवले असावे? असा प्रश्न सोफीला पडतो. ''तुला एक कौटुंबिक गुपित सांगायचे आहे असेही



आजोबा म्हणत. ते गुपित काय असावे?... प्रायरीचे ग्रँडमास्टर– आपले आजोबा होते हे खरे का?... असे अनेक प्रश्न सोफीला पडतात...

पोलिसांचा ससेमिरा चुकवून या क्रिप्टेक्सचा परवलीचा अंक शोधणे हे आव्हान आता सोफी आणि लँगडन यांच्यापुढे असते...

त्यावेळी होली ग्रेलचा जन्मभर व्यासंग करणाऱ्या श्रीमंत इंग्लिश सरदाराची आठवण लँगडनला होते. तो पॅरिसजवळच एका मोठ्या इस्टेटीवर राहात असतो. संस्थानिकासारखा ऐषआरामात...

**होली ग्रेल म्हणजे कोण?... मेरी मॅगदालेन आणि येशू ख्रिस्त यांच्यात राजघराण्याचे रक्त असते... आणि त्यांचे वंशज आजही विद्यमान असतात... सोफी ही त्या वंशाची आजची प्रतिनिधी...**

टीबिंगच्या इस्टेटीवर जाऊन हे दोघे होली ग्रेलबद्दलची माहिती मिळवतात...

टीबिंग म्हणतो, ''तुम्ही हे क्रिप्टेक्स व्यवस्थित दडवून ठेवलेय ना?''

प्रा. लँगडन उत्तर देतो, ''ते तू तुझ्या सोफासेटखालचा केर कधी काढतोस त्यावर अवलंबून आहे.''

त्यातला विनोद टीबिंगच्या लक्षात यायला वेळ लागतो...

तेवढ्यात ओपस देईचा एक मारेकरी त्या दालनात प्रवेश करून तो क्रिप्टेक्स हस्तगत करू पाहतो... त्याला टीबिंग जखमी करतो.

...आणि पोलिसांच्या गाड्यांचा सायरन कानावर येतो... कॅ. फाश येत आहे अशी वर्दी द्वाररक्षक देतो.

टीबिंग त्या दोघांना घेऊन स्वत:च्या खाजगी विमानाने लंडनला जायचा निर्णय घेतो... त्या क्रिप्टेक्सचा उलगडा करून, होली ग्रेलचा शोध लावायचा असा त्याचा निर्धार असतो...

...पुढे खूप काही घडते...

त्या क्रिप्टेक्सचा काहीसा उलगडा होतो... पण तोही गूढ असतो. लंडनमधल्या चर्चेसमध्ये त्यातील खाणाखुणा शोधण्याचा प्रयत्न हे सगळे करतात...

त्यातच टीबिंग हा ओपस देईचा एक प्रमुख कार्यकर्ता असल्याचे प्रकट होते...

होली ग्रेल म्हणजे कोण?... मेरी मॅगदालेन आणि येशू ख्रिस्त यांच्यात राजघराण्याचे रक्त असते... आणि त्यांचे वंशज आजही विद्यमान असतात... सोफी ही त्या वंशाची आजची प्रतिनिधी...

वगैरे खूप काही नंतर उलगडत जाते...

या रहस्यमय थरारकथेच्या अनेक कथासूत्रांपैकी मुख्य कथासूत्राची ही रूपरेखा...

ओपस देईची दहशतवादी कृत्ये... तिचे प्रमुख असलेले धर्मगुरू... त्याचे पोप व व्हॅटकिनशी असणारे संबंध... त्याने ओपस देईच्या एका निष्ठावंत कार्यकर्त्यावर सोपवलेले होली ग्रेलचे गुपित प्रायरीच्या मुख्य सदस्यांकडून हस्तगत करण्याचे काम...

फ्रान्समधील गुप्तहेर खात्याचा प्रमुख कॅ. फाश याचाही या गुप्त पंथांशी असणारा संबंध... त्या यंत्रणेच्या कामकाजातील बारकावे... स्वीस बँकांचे व्यवहार...

लिओनार्डो द विंचीच्या चित्रांची वैशिष्ट्ये... चर्चेसची खास आकर्षणे...

...आणि ख्रिस्ताच्या मूळ चरित्राला कालानुसार मिळालेल्या कलाटण्या... ख्रिस्ती धर्माचा इतिहास, गुप्त दस्तऐवज, प्रतिकशास्त्रे, गुप्त लिपी यांचा पूर्वकाळातील आणि सद्य:कालीन वापर...

अशा अनेक बाबींवर प्रकाश टाकताना डॅन ब्राऊन काहीतरी वेगळे दाखवून देत असतो.

त्यामुळे अत्यंत वेगाने यातील घटनांची मालिका पुढे जात राहते... फ्लॅशबॅकने जुन्या घटकांची उजळणी होते... नव्या घटनांशी त्यांची सांगड घातली जाते.

हे पुस्तक गाजण्याची कारणे अनेक आहेत... पण वाचनीयता हा या पुस्तकाचा प्रमुख गुण आहेच. अवघ्या छत्तीस तासांत घडलेले, वेगाने पुढे जाणारे नाट्य... उत्कंठा वाढवणारे, पुढे काय अशी उत्सुकता वाढवणारे प्रसंग... एकापाठोपाठ एक येत राहतात... त्यामुळे शेवटपर्यंत पुस्तक खाली ठेववत नाही.

**पृष्ठे : ४५२ ● किंमत : ३२०रु. ● सभासदांना : २४० रु. ● पोस्टेज: २५रु.**


## पुणे ते पंतप्रधानांचे कार्यालय

**बी. जी. देशमुख** **अनु. अशोक पाध्ये**

माजी केंद्रिय सचिव बी. जी. देशमुख यांच्या 'अ कॅबिनेट सेक्रेटरी लुक्स बॅक' या गाजलेल्या पुस्तकाचा अनुवाद

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




## शान्ताबाई शेळके यांनी अनुवादित केलेल्या कादंबऱ्या



स्वभावाने भिन्न असूनही चार बहिणींच्या परस्परांवरील उत्कट प्रेमाचे, आशा आकांक्षांचे, भविष्यातील स्वप्नांचे हृदयस्पर्शी चित्रण

**चौघीजणी** — मूळ लेखिका लुईसा मे अल्कॉट

**३००रु.**




हेलन केलर या असामान्य व्यक्तिमत्त्वाची वेधक, रोमांचक तितकीच स्फूर्तीदायक जीवनगाथा

**आंधळी** — मूळ लेखिका कॅथरिन पियर्स

**११०रु.**





अदम्य आत्मविश्वास, तीव्र ज्ञानलालसा आणि अनावर जीवनासक्ती यांची प्रेरक आणि सुंदर गाथा

**आंधळ्याचे डोके** — मूळ लेखक वेद मेहता

**१२०रु.**

**पोस्टेज प्रत्येकी २५रु.** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# कवडसे

## सामान्यांच्या व्यक्तित्वातील असामान्य कंगोऱ्यांचे दर्शन

## योगिनी वेंगुर्लेकर

'कवडसे' हा योगिनी वेंगुर्लेकर यांच्या बारा कथांचा संग्रह.

सामान्य माणसांच्या जगण्यातले असामान्य कंगोरे उजळून टाकणाऱ्या प्रकाशाचे कवडसे टिपणाऱ्या या कथा आजच्या अनेकविध समस्यांना हात घालतात. अवतीभवती घडणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या, मूल्यहीन बाजारीकरणाच्या विरोधात आवाज उठवण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्वसाधारण माणसांचा कणखरपणा ही या कथांच्या लेखनामागची मुख्य प्रेरणा दिसते. सद्य:कालीन चंगळवादी सवंग पर्यावरणात सेवाभावी वृत्तीचा फक्त दिखाऊ दांभिकपणा सर्वत्र दिसतो; सेवाभावाच्या आड भरघोस अर्थप्राप्तीचा स्वार्थी हिशोबीपणा प्रभावशाली दिसतो. विशिष्ट मूल्ये पाळणारी मनस्वी माणसे आजही आहेत; परंतु कुठल्याही लहानमोठ्या आमिषाला बळी पडणारी माणसेच येथे पावलोपावली भेटतात.

योगिनी वेंगुर्लेकर यांना या मूल्यहीनतेची मनोमन चीड आहे. ढोंगीपणाचा राग आहे. परंतु सगळीकडेच बजबजपुरी माजलेली दिसते; तेव्हा आशेने बघायचे तरी कोणाकडे असा प्रश्न त्यांना पडतो. क्लोनिंग, इंटरनेट, चॅटिंग, कारखानदारीत उदारीकरणाचा शिरकाव, मार्केटिंग, न्यायव्यवस्थेतील दिरंगाई, ॲम्युझमेंट पार्क, भ्रष्टाचार, स्त्रियांवरील अत्याचार, चंगळवादी दृष्टिकोन, संपत्तीची हाव, सत्तेची अभिलाषा यांनी आजच्या जीवनशैलीवर मोठा परिणाम केलेला आहे. या कथांमधून दिसते ते आजचे, या घडीचे जग मोठे गुंतागुंतीचे आहे.

### क्लोनिंग

स्वत:च्या ओव्हरीचा सेल डेव्हलप करून आपल्या गर्भाशयात आपलाच अंकुर वाढविण्याची क्लोनिंगची शक्यता सद्य:कालीन वैद्यकीय प्रयोगशाळांनी आपल्या आटोक्यात आणली आहे. फ्लॉरेन्स ही ऑरलँडोहून एनसीएल मध्ये



प्राणिसृष्टीच्या डीएनएच्या साखळीचा अभ्यास करायला येते; तिचा सध्याचा प्रियकर रोनॅल्डो, तिची आई व सावत्र वडील यांचीही ओळख आपल्याला होते. तिला सहाय्यक म्हणून काम करणाऱ्या भारतीय नवविवाहित तरुणीला फ्लॉरेन्सच्या रूपात फ्लॅगशिप पुढे चाललंय अशी ग्वाही मिळते. क्लोनिंग बेबीजना मुळात बापच नसतो, तर मग ''आदर्श मुलगी, आदर्श पत्नी अशी आदर्श नाती उतरवून टाकून एक मुक्त माणूस, फक्त स्त्री म्हणून जगत रहायला काय हरकत आहे?'' असा सवाल तिला फ्लॉरेन्स करते. ''कुणाच्याही मदतीशिवाय तू निर्मितिक्षम, सर्जनशील आहेस; याची जाणीव देणारा क्षण– बाई म्हणून खऱ्या स्वातंत्र्याचा क्षण... त्या क्षणी जगाच्या या पसाऱ्यात सम्राज्ञी स्वत:ला म्हणवशील आणि शँपेन फसफसून तुझ्याही केबिनमध्ये ओसंडेल'' असे फ्लॉरेन्सचे आवाहन ऐकल्यावर तीही शँपेन ओठाला लावते. तरीही तिला प्रश्न पडतो– चाकोरीबद्ध जीवन जगता जगता आपणास चाकोरीचंच कौतुक करायला जमतं. क्लोनिंगमुळं मुलाला बापच नसणार; आई म्हणून सर्वस्वी एकच व्यक्ती सगळ्याला जबाबदार. एक अगदी आपल्यासारखीच मुलगी वाढवायची हे नैतिक की अनैतिक? बरोबर की चूक? ...आणि बाईचं स्वातंत्र्य किती मोलाचं?... आपण फ्लॉरेन्सच्या फ्लॅगशिपमागे जाऊ शकणार नाही. स्वातंत्र्यप्रिय स्खलनशील स्त्री म्हणून जगण्याची आपली उर्मी किती खोल आहे हे आपणच ठरवायला हवं... निर्णय चुकला तर जीवघेणी कठोर शिक्षा अटळ! आपल्या स्त्रीत्वाचा महोत्सव या वेगानं बदलत जाणाऱ्या जगात साजरा करण्याएवढी धिटाई आहे का आपल्या अंगात? असा प्रश्न ती स्वत:लाच करते.

**स्वातंत्र्यप्रिय स्खलनशील स्त्री म्हणून जगण्याची आपली उर्मी किती खोल आहे हे आपणच ठरवायला हवं... निर्णय चुकला तर जीवघेणी कठोर शिक्षा अटळ! आपल्या स्त्रीत्वाचा महोत्सव या वेगानं बदलत जाणाऱ्या जगात साजरा करण्याएवढी धिटाई आहे का आपल्या अंगात?**

### चुरचुरीत चॅटिंग

क्लोनिंगसारखाच आजकाल तरुणांना झपाटून टाकणारा विषय म्हणजे फोनवरचे शृंगारिक चॅटिंग.

फोनवर चावट, चटपटीत, शृंगारिक, उन्मादक संभाषणात तरुणतरुणींना अडकवून इंटरनॅशनल रेटने फोनचे बिल लावणाऱ्या सेंटर्सच्या जाहिराती अधूनमधून येत असतात. त्या पार्श्वभूमीवरची चलन ही कथा या संग्रहात आहे. मुंबई महानगरीत जो तो आपल्या कामात. आपलं मन कुणाशी मोकळं करावं तर तसा कोणी

**तो जे स्वतः अनुभवू शकत नाही ते केवळ शब्दांनी बोलण्यासाठी म्हणून तो आस्थाकडे फोन करीत असतो... आपण त्या क्रियेत न गुंतता अनुभव द्यायचा. रतिक्रीडेचं सुख शब्दांतून द्यायचं...''**

नाही. 'आस्था' ही सेवाभावी संस्था अशा लोकांसाठी काढण्यात आलेली... गरजवंतानं या संस्थेचं कार्ड विकत घ्यायचं. गरजेनुसार फक्त नंबर फिरवायचा. फोनवर मग तुमचं बोलणं सगळं ऐकून घेणारी व्यक्ती भेटते. गोड, चुरचुरीत, मधाळ शब्दांनी आधार देते. अशा या सेवाभावी संस्थेत काम करणाऱ्यांना मानधनही देण्यात येते– असे कळल्यावर प्रिया अशा एका आस्थाच्या सेंटरवर जाते... तेथील व्यवस्थापिका आशा तिला कामाचे स्वरूप समजावून सांगते. ए, बी, सी या कॅटेगरीज. ए ही जनरल कॅटेगरी. बी ही सेमी स्पेशल आणि सी ही टॉपची स्पेशल. फोनवर बोलण्याच्या स्किलवर, क्लाएंटशी किती वेळ बोललं यावर आणि क्लाएंटनं पुन:पुन्हा मागणी करणं यावर स्वयंसेवकांचं मानधन ठरतं... प्रियाला पहिलाच कॉल अटेंड करायला सांगण्यात येते. तो असतो एका तरुणाचा... तो तरुण म्हणतो, ''नुसत्या गोड आवाजावरून मी तुला माझ्या नजरेसमोर आणलीय. फुलाच्या लांब दांड्यासारख्या तुझ्या घट्ट मांड्या... आणि मऊ मुलायम पाकळ्यांसारखे तुझे ओठ...'' तेव्हा प्रिया ताडकन म्हणते, ''फाजीलपणा नको. तुमची अडचण सांगा.'' त्याचे उत्तर येते... ''तेच तर सांगतोय. तू कधी भेटशील? राणी, मी अगदी तुंबलोय ग!'' प्रिया संतापून रिसीव्हर आदळते...

यावर आशाकडे ती तक्रार करते, तेव्हा आशा तिला कामाचे स्वरूप आणखी स्पष्ट करून सांगते... ''हा फोन करणारा मुलगा तरुण आहे. ॲक्सिडेंटमध्ये पाय गेल्याने व्हीलचेअरवर बसून असतो... त्याला एकटेपणाचा कंटाळा येतो. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी त्याला 'आस्था'तील मुलींशी बोलावंसं वाटतं. सेक्स ही त्याची पॉवरफुल गरज आहे. तो जे स्वत: अनुभवू शकत नाही ते केवळ शब्दांनी बोलण्यासाठी म्हणून तो आस्थाकडे फोन करीत असतो... आपण त्या क्रियेत न गुंतता अनुभव द्यायचा. रतिक्रीडेचं सुख शब्दांतून द्यायचं...''

समाजसेवेच्या या पद्धतीचे प्रियाला आश्चर्य वाटते. ''पैशासाठी काय मी स्वत:ला विकू?'' असे ती नवऱ्याला विचारते. नवरा भरत हो म्हणतो... : ती पुन्हा आस्थावर जाते. असे कॉल्स अटेंड करते. आपला नवराच पलीकडून बोलतो आहे असे समजून आपल्या शब्दांच्या माध्यमातून रतिक्रीडेचं सुख



ग्राहकांपर्यंत पोहोचवू लागते. ...पण पुढं पुढं तिच्या बोलण्यात यांत्रिकपणा, निरुत्साह दिसू लागतो... तिची मागणी करणारे क्लाएंट कमी कमी होऊ लागतात.. तेव्हा आशा तिला सांगते, ''तुझ्या आवाजात तो आकर्षकपणा उरलेला नाही... आजारी म्हाताऱ्या बाईशी बोलल्यासारखं क्लाएंटला वाटतं. त्यांना समाधान मिळत नाही.''

–आणि आपला नवरा भरत हाच आस्थासाठी चटपटीत बोलणाऱ्या बायका मिळवतो हे तिला कळते, तेव्हा ती भरतसाठी चिठ्ठी लिहून ठेवून घर सोडते. ''पोंबुप्यालाच गावंढळपणाने राहिले असते तर बाईचा असाही वापर असतो हे समजलं नसतं... एवढा मोठा धडा दुसऱ्या कुणीही दिला नाही... मला आता फक्त माझ्यासाठी जगायचं आहे... इथे मी परत येईनच असे नाही.''

**एका पारंपरिक भारतीय तरुणीची ही भावना; शारीरिक जवळिकीला ती वर्ज्य मानतेच; शाब्दिक रतिक्रीडेलाही ती गर्ह्य मानते. त्यातही तिला आपल्या स्त्रीत्वाचा, आपल्या सत्त्वाचा उपमर्द झाल्यासारखे वाटते.**

एका पारंपरिक भारतीय तरुणीची ही भावना; शारीरिक जवळिकीला ती वर्ज्य मानतेच; शाब्दिक रतिक्रीडेलाही ती गर्ह्य मानते. त्यातही तिला आपल्या स्त्रीत्वाचा, आपल्या सत्त्वाचा उपमर्द झाल्यासारखे वाटते.

### न्यायालयीन दिरंगाई

सध्याच्या न्यायव्यवस्थेतील दिरंगाईने कोणालाही आपल्या हयातीत मिळण्याची शाश्वती उरलेली नाही. झुंज या कथेतील देवयानीला एक ट्रकवाला उडवतो, तिच्या पायांवरून ट्रकची मागची चाकं जातात. तिच्या स्कुटीचा पार चुराडा होतो... पंचनामा होईपर्यंत ट्रकच्या टायरच्या खुणाही नष्ट होतात... कोर्टात खटला होतो. गोयल ट्रान्सपोर्ट केस जिंकते. देवयानीचे वडील काळे सर अपील करतात. ''पंख तुटलेल्या माझ्या या चिमणीला पुन्हा ताकद दिल्याशिवाय, तिच्यावरचा अन्याय दूर झाल्याशिवाय मी गप्प बसणार नाही'' असे काळे सर म्हणतात... आठ वर्षांनी न्यायमूर्ती निकाल देतात. दहा लाखांची नुकसानभरपाई कोर्ट काळे दांपत्याला देते. ट्रक ड्रायव्हरला दहा वर्षांची शिक्षा सुनावते... कुणालाही लाच न देता, कुठल्याही गुंडाला हाताशी न धरता काळे सर न्याय मिळवतात खरा; पण जिला अपघात झाला ती देवयानी काही दिवसांपूर्वीच या जगाचा निरोप घेऊन गेलेली असते. काळेसरांची बायको विचारते, ''किती उशीर केलात? हा न्याय कुणासाठी आणला आहे ते सांगा.''

काळेसर निर्धारपूर्वक म्हणतात, ''या महानगरीत एक तरी देवयानी रोज अपघातात हातपाय गमावून बसते. त्या प्रत्येक मुलीला न्याय मिळावा म्हणून आता आपणच उभं रहायचं. अधिक ताठ, अधिक खंबीर बनून.''

**अनाथाश्रमातल्या मुलींना मदत करायच्या नावावर त्यांचे प्रदर्शन करून निधीसंकलन करणाऱ्यांच्या खोटा सेवाभाव 'मार्केट'मध्ये दिसतो. टीव्हीवर नूडल्सच्या जाहिरातीत अनाथाश्रमातील गुड्डीला दाखवून नूडल्सचे उत्पादक 'प्रत्येक पॅकमागे एक रुपया या अनाथाश्रमातील मुलामुलींसाठी देण्यात येणार आहे' असे आवाहन करीत असतात...**

## उच्चभ्रू महिलांची समाजसेवा

दुबईचा चार दिवसांचा दौरा करून स्मिता परांजपे मुंबईला फ्लाइट नंबर ५७३ ने परत येतात... पावणेतीन तासांच्या प्रवासाने थकून गेलेल्या स्मिताबाईंना विमानतळावर घेण्यासाठी नवरा आलेला नाही, ड्रायव्हरच आलाय म्हणून थोडा रागच येतो. भरपूर खरेदी करूनही अमकंतमकं घ्यायचं राहिलंच याची खंत त्यांना सतावत असते. नवऱ्याचं हॅपी पार्क– संगणकावर चालणारे खेळ, नाचगाणं, खाणंपिणं... पोहणं, मसाज, सौना बाथ, स्टीम बाथ... प्लेझर ट्रिप्स, स्टॅग पार्टीज... घरी पोहोचताच नवरा सुदर्शन म्हणतो, ''चार दिवसांत किती वेगळी एकदम टवटवीत दिसायला लागलीस तू... वाटतंय... अश्शीच उचलावी...'' बाई लाजतात... नवरा आपली होंडाई २२९८ घेऊन जातो... बाई महिला दिनाचा प्रोग्रॅम आखायला क्लबमध्ये जातात... सेक्स वर्कर्सना आमंत्रण द्यायची कल्पना मांडण्यात येते... त्यासाठी सेक्स वर्कर्सच्या वस्तीत जाण्याचा बेत ठरतो. स्मिताबाई त्या वस्तीतल्या रुग्णालयातही जातात... ''या बाया चैन करायला सोकावलेल्या असतात, कमी वेळात खूप पैसा मिळतो म्हणून हे घाणेरडे धंदे करतात. नीतिमत्तेची पायमल्ली करतात. आमचे पुरुष– यांच्या नादी कशाला लागतील?'' असे त्या म्हणतात. आपल्या संस्थेने या वर्कर्ससाठी काही करू नये असे त्या म्हणतात, त्याचवेळी होंडाई २२९८ तेथून जाताना त्यांना दिसते; आणि त्या हैराण होतात... उच्चभ्रूंच्या जगातले हे दांभिकपण लेखिका वेगवेगळ्या लहानमोठ्या कृतीतून दाखवते.

अनाथाश्रमातल्या मुलींना मदत करायच्या नावावर त्यांचे प्रदर्शन करून निधीसंकलन करणाऱ्यांच्या खोटा सेवाभाव 'मार्केट'मध्ये दिसतो. टीव्हीवर नूडल्सच्या जाहिरातीत अनाथाश्रमातील गुड्डीला दाखवून नूडल्सचे उत्पादक 'प्रत्येक पॅकमागे एक रुपया या अनाथाश्रमातील मुलामुलींसाठी देण्यात येणार आहे' असे आवाहन करीत असतात... निष्पाप चेहरा दाखवून गुड्डीची गरिबी बिनदिक्कत वापरली जातेय म्हणून सुषमा संतापाने आरडाओरडा करते.



## काश्मिरातील अतिरेकी

काश्मीरमध्ये लष्करी अधिकारी म्हणून काम करणारा परीक्षित टेररिस्टांच्या बॉंबस्फोटात मारल्या गेलेल्या सलील खान– जमीला बेगम यांच्या मुलीला घरी घेऊन येतात. वाढवितात. अठरा वर्षांनी आभाला जम्मू सरकार सलीलखानची एकमेव वारस म्हणून दहा लक्ष रुपयांची नुकसानभरपाई देण्यात येते. हीच आभा राष्ट्रीय प्रबोधिनीत जाऊन लष्करी अधिकारी बनून येते आणि परीक्षितच्या मृत्यूनंतर शपथ घेते, ''पपा, तुझ्यासारखं कर्तव्यनिष्ठ, निःस्पृह आयुष्य मी जगेन आणि माणसाची माणूस म्हणून जगण्यातील प्रतिष्ठा नष्ट करणाऱ्या नराधमांना मी धुळीला मिळवीन असे वचन देते.''

**''पपा, तुझ्यासारखं कर्तव्यनिष्ठ, निःस्पृह आयुष्य मी जगेन आणि माणसाची माणूस म्हणून जगण्यातील प्रतिष्ठा नष्ट करणाऱ्या नराधमांना मी धुळीला मिळवीन असे वचन देते.''**

## उद्योगसमूहाची पडझड

औद्योगिक क्षेत्रातही सध्या खूप चढउतार, उलाढाली चालू आहेत. प्रसिद्धीच्या झोतात असलेली अनेक घराणी कुठल्या क्षणी वादाच्या भोवऱ्यात किंवा व्यावसायिक पेचप्रसंगात सापडतील याचा नेम नसतो. एकीकडे उद्योगमहर्षी म्हणून गौरव होत असताना दुसरीकडे त्याच उद्योगाचा डोलारा दोलायमान झाल्याचेही दृष्टोत्पत्तीस येते. कारखानदारांची पुढची पिढी उच्चविद्याविभूषित होऊन वेगळी मते, वेगळी धोरणे घेऊन व्यवसायात पदार्पण करतात; आणि व्यवसायाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न करतात. 'ठिणगी' या कथेत भोपळे उद्योगसमूह ५० टक्के डिव्हिडंड जाहीर करून आपली प्रतिमा उंचावणारे लेख वगैरे छापून आणतात. रोबो निर्मितीच्या एका नव्या प्रकल्पाची घोषणा करतात... पण त्याचवेळी कारखान्यात दीर्घकाळ काम केलेले आणि स्वेच्छानिवृत्ती योजनेखाली घरी पाठवण्यात आलेले कॅप्टन शिंदे नानासाहेब भोपळे यांची भेट मिळवण्यासाठी कंपनीत येतात. नानासाहेबांना ते विचारतात, ''रोबोच्या प्रकल्प आणि रत्नागिरीचं युनिट यासाठी फिनिक्स इन्व्हेस्टमेंटचा पैसा तुम्ही वापरत आहात. काही निर्णय चुकले; तो पैसा बुडाला. शेअर मार्केटमध्ये तुमच्या शेअरचा भाव गडगडला... एक मराठी माणूस एवढी झेप घेतो याचं अप्रूप आम्हांला वाटतं. निर्णय चुकल्याने नुकसान झालं तर तेही मी मान्य करतो. पण ही गुंतवणूक नुकसानकारक आहे म्हणून कर्ज न काढता लोकांचे पैसे वापरण्यात आले असं काही तज्ज्ञ म्हणतात. ते साफ खोटं आहे. एवढंच तुम्ही सांगा.''

> **''या उद्योगसमूहाची पडझड होतेय याचं मला दुःख होतंय. पण तुमच्या हव्यासापायी आमचे पैसे बुडाले... तुमच्या हव्यासापायी लोकांचे पैसे बुडवण्याचा पायंडा पडता कामा नये... सामान्य माणसानं आपली ताकद ओळखली पाहिजे.**

नानासाहेब कॅप्टन शिंदे यांना १० हजाराचा चेक देऊ पाहतात– पण शिंदे सांगतात, ''माझी ठेव बुडाली. नोकरी संपली. म्हणून मी तुमच्याकडून पैसे मिळवण्यासाठी आलो आहे असे नाही. मला फक्त वस्तुस्थिती जाणून घ्यायची आहे... तुम्ही माझ्या प्रश्नाचं उत्तर देईपर्यंत मी इथंच मेनगेटजवळ सतरंजी अंथरून बसेन...''

नानासाहेब त्यांच्यावर उखडतात... ''हवं तर कोर्टात जा... चालू लागा.''

आणि कारखान्यातील कर्मचाऱ्यांना ले ऑफ देण्यात येऊ लागतो.

गाडी थांबवून नानासाहेब कॅप्टन शिंदे यांना म्हणतात, ''तुम्ही ठिणगी टाकलीत. तिचा वणवा झाला... उद्योगसमूहाची एकेक वीट ढासळत चालली आहे... तुम्ही समाधानी आहात?''

कॅप्टन शिंदे म्हणतात, ''या उद्योगसमूहाची पडझड होतेय याचं मला दुःख होतंय. पण तुमच्या हव्यासापायी आमचे पैसे बुडाले... तुमच्या हव्यासापायी लोकांचे पैसे बुडवण्याचा पायंडा पडता कामा नये... सामान्य माणसानं आपली ताकद ओळखली पाहिजे. तुम्ही वेळीच प्रामाणिक उत्तर दिलं असतं तर बरंच सावरलं गेलं असतं... पण आता उशीर झाला.''

'आतंक'मध्येही महालक्ष्मी म्युच्युअल फंडातील शेकडो कोटी रुपये बुडतात आणि सरकार त्याच्या शाखांना टाळे लावते. अर्थमंत्री पत्रकार परिषदेत जाहीर करतात, ''हा आर्थिक आतंक निपटून काढण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत... लोकांना न्याय मिळवून देणं आमचं कर्तव्य आहे...''

पत्रकार नुकत्याच मेलेल्या या वित्तसंस्थेवर मृत्युलेख लिहिण्यात गढतात,पण व्हायचे ते नुकसान झालेलेच असते.

सद्य:स्थितीत भेडसावणाऱ्या अशा विविध प्रश्नांना, विविध क्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या या कथांतील ताजेपणा त्यांची वाचनीयता वाढवतो. काही कथांमध्ये एकापेक्षा अधिक आशयकेंद्रे वा मुख्य व्यक्तिरेखा येतात; त्यामुळे कथेतला एकसंधपणा ढळतो. नेमके लक्ष्य कोणते? असा प्रश्न पडतो. प्रसंगांचा पसारा वाढतो... तरीही त्यातील पोटतिडीक, चीड, अस्वस्थता जाणवते. म्हणूनच हा संग्रह वाचायला हवा.

**पृष्ठे : १६८ ● किंमत : १२०रु. ● सभासदांना : ९०रु. ● पोस्टेज:२०रु.**




# संतुलित आरोग्यासाठी मार्गदर्शक पुस्तके

**हृदयविकार निवारण**
शुभदा गोगटे
२००रु.


**भारतवैद्यक**
डॉ. शाम अष्टेकर
६००रु.
पोस्टेज ३५रु.

**चाळिशीनंतरची वाटचाल**
डॉ. सुभाष दांडेकर
१००रु.

**हसता हसता आरोग्य**
अनु. दिगंबर गाडगीळ
९०रु.

**२० मिनीटे तंदुरुस्तीसाठी**
शेली बात्रा अनु. गंगाधर महाम्बरे
१३०रु.

**पोस्टेज प्रत्येकी २५रु.** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# गोल गोल राणी

वपुंच्या कथालेखनाचा वारसा समर्थपणे चालवणाऱ्या कन्येचे पहिलेच पुस्तक.

## स्वाती चांदोरकर

'गोल गोल राणी' हा स्वाती चांदोरकर यांचा पहिलाच कथासंग्रह.

स्वाती चांदोरकर या लोकप्रिय कथालेखक व कथाकथनकार वसंत पुरुषोत्तम काळे यांच्या, वपुंच्या कन्या. आपल्या साहित्यकार पित्याचा वारसा स्वाती चांदोरकर जिद्दीने पुढे चालवू शकतील याची ग्वाही देणारा हा कथासंग्रह आहे. वपुंच्या चाहत्यांना त्यामुळे मोठाच दिलासा वाटेल. मध्यमवर्गीय माणसाच्या जीवनातील लहानमोठ्या सुखदु:खांचा माफक मानवतावादी आणि काहीसा आदर्शवादी वेध घेणाऱ्या वपुंच्या कथा आपल्या मनमानसाच्या तारा दीर्घकाळ झंकारत ठेवतात. 'तूच माझी वहिदा' सारख्या कथा आपल्या फँटसीतल्या स्वप्नभराऱ्यांना वास्तवाचे भक्कम अधिष्ठान कसे अटळ आणि आश्वासक आहे याचे भान देतात आणि आपल्या आयुष्याची चाकोरी आणि चौकट कुटुंबातील सर्वांच्या सहृदय संवेदनक्षमतेला संवादी ठरते याचेही सात्त्विक सच्छिल दर्शन घडवतात. आपल्या मर्यादा हेच आपले सामर्थ्य ठरते; त्याने स्थैर्य आणि स्वास्थ्य लाभते... अनुभव खूप गुंतागुंतीचे असले, नियतीचे खेळ खूप चमत्कृतिपूर्ण असले तरी आपल्या अल्पबळावरही आपण निभावून नेऊ शकतो असा दृढ विश्वास वपुंच्या कथा वाचकाच्या अंतर्यामी, सुप्त मनात सहजपणे रुजवतात... त्यामुळे वपुंच्या कथांचे आकर्षण आजही तितकेच प्रभावशाली ठरते.

वपुंचा हाच वारसा स्वाती चांदोरकर चालवते आहे; त्याला स्वत:ची काही परिमाणे देऊन अधिक व्यापक करू पाहत आहे असे या संग्रहावरून जाणवते; वपुंचीच काही वाक्ये, काही निरीक्षणे आपण वाचतो आहोत, वपुंच्याच पठडीतल्या व्यक्तिरेखा आणि भावभावना आपल्यासमोर येत आहेत असे अधूनमधून जाणवत राहते. स्वाती चांदोरकर यांच्या कथांमधून उमटणारे हे परिचित सूर कुठेच खटकत



नाहीत; उलट आश्वासक वाटतात. आनंद देतात.

'दिशाहीन'मध्ये भाऊसाहेब ज्योतिर्भास्कर ही पदवी घेऊन घरी भारावलेल्या अवस्थेत येतात. त्यांची धाकटी बहीण. निनी त्यांची दृष्ट काढून म्हणते, ''भाऊ, वहिनीची साडेसाती संपली. पत्रिका तिची, पण फळ मात्र तुला मिळालंय. म्हणजेच तिच्या पत्रिकेचं पाठबळ तुझ्या पत्रिकेत आहे.'' हे ऐकून भाऊसाहेब म्हणतात, ''निनी, तू माझी भाषा बोलतेस!''

...वपु कदाचित् असेच आपल्या कन्येला म्हणत असतील.

स्वाती चांदोरकर आपल्या बहुतांश कथांमध्ये मध्यवर्ती व्यक्तीच्या अवघ्या आयुष्याचा वेध घेतात... त्यातील महत्त्वाचे टप्पे सांगून त्यातून कथा फुलवत जातात. हे टप्पे दाखवताना त्या केंद्रिभूत व्यक्तीच्या आयुष्याचा अन्वयार्थ लावत जातात आणि अटळ अशा निष्कर्षापर्यंत जाऊन त्या थांबतात... अंतर्मुख होतात... वाचकांनाही अंतर्मुख करतात.

**स्वाती चांदोरकर आपल्या बहुतांश कथांमध्ये मध्यवर्ती व्यक्तीच्या अवघ्या आयुष्याचा वेध घेतात... त्यातील महत्त्वाचे टप्पे सांगून त्यातून कथा फुलवत जातात. हे टप्पे दाखवताना त्या केंद्रिभूत व्यक्तीच्या आयुष्याचा अन्वयार्थ लावत जातात.**

### प्रत्येक टप्प्यावर ऐनवेळी माघार...

'गोल गोल राणी' ही संग्रहातील पहिलीच कथा घ्या.

या कथेची निवेदिका 'मी'च आहे. खेळताना अडम तडम् करताना तिला मैत्रिणी मुद्दामहून अडकवतात आणि ती डाव अर्धवट सोडून पळ काढते. भागूबाई म्हणून तिला सगळ्याजणी चिडवतात... इथं आपलं काय चुकलं हेच तिच्या लक्षात येत नाही.

नाटकात काम करायचे तर शाळेत तिला दुय्यम भूमिका दिली जाते... आपल्याला दुय्यम भूमिका– या विचाराने त्रस्त अशी ती आपलं वाक्य म्हणतच नाही. नाटकातून बाद होते.

कॉलेजात आकाशवर तिचे प्रेम बसते... ती डायरीत सारे काही लिहिते. वडील तिची ती डायरी वाचतात... तिच्या हे लक्षात आल्यावर ती डायरी लिहिण्याचे थांबवते.

आकाशला नोकरी लागते... तिचे त्याच्याशी लग्न लावून देण्यात येते. मानपानात काटकसर केल्याने सासरची मंडळी नाराज. मधुचंद्र म्हणजे अमावस्याच ठरते.

डोहाळे कडक लागतात. वरचेवर रजा मिळवणे अवघड ठरते... गर्भ पाडायचा प्रयत्न फसतो... मुलगा होतो पण तो मतिमंद... पायाने अधू... गोल गोल राणी... छातीपर्यंत पाणी...

बॉस जरा लघळपणा करतोय हे दिसल्यावर ती आपली नोकरी सोडते. वडील म्हणतात, तुला तुझ्यासाठी कमवत राहणं जरुरीचं आहे... तू चूक केलीस.'' ती पुन्हा नोकरी मिळवते.

डोहाळे कडक लागतात. वरचेवर रजा मिळवणे अवघड ठरते... गर्भ पाडायचा प्रयत्न फसतो... मुलगा होतो पण तो मतिमंद... पायाने अधू... गोल गोल राणी... छातीपर्यंत पाणी... राजूला घरी एकटं सोडणं अशक्य. नोकरीचा राजीनामा. घरातच ब्युटी पार्लर. राजूनंतर आनंदचा जन्म. तो मात्र नॉर्मल. धडधाकट. ठणठणीत... आनंद बारावी पास होतो.

...ब्युटी पार्लरमध्ये आलेल्या एका आनंदच्या मैत्रिणीला राजू घट्ट मिठीत धरतो... ती राजूला मारते... राजूचा केविलवाणा चेहरा.. डोळे भेदरलेले, सशाचे.

राजूमुळे आनंदचे आयुष्यही उद्ध्वस्त होणार का?... राजूचे वागणे, इतरांचे मरणे...

यातून सोडवणूक करण्याचा मार्ग?

असे आयुष्यभरचे वेगवेगळे प्रसंग सांगून 'मी'पुढच्या या सर्व समस्यांचे 'गोल गोल राणी, इथे इथे पाणी'मधून दर्शन घडवले जाते.

'मी'च्या अवघ्या आयुष्याचीच वाताहत होते... स्वप्ने भंगतात... नाटकात काम मिळत नाही... वडील डायरी चोरून वाचतात... बॉस अंगावर हात टाकतो... मतिमंद मुलाचं दुःख सहन करावं लागतं... त्याचं अस्तित्व संपूर्ण कुटुंबाचंच अस्तित्व धूसर बनवतं...

एवढा सगळा घटनाक्रम अवघ्या दहाअकरा पृष्ठांत लेखिका मांडते. प्रत्येक दृश्य, प्रत्येक टप्पा समोर चित्रदर्शी शैलीत उभा करते.

हीच तऱ्हा इतर कथांचीही दिसते. एकेक कथा म्हणजे आयुष्याचा काही मोजक्या प्रसंगांतून मांडलेला विशाल पट.

'शुभमंगल'मधील नवविवाहिता नीमा दीड खोलीच्या हक्काच्या घरात प्रवेश करते... हनीमूनला माथेरानला जाते. कलावंत नंदनची चित्रकला बघून हरखते... पण त्याचं उत्पन्न बेतास बात. अनिश्चित... तिची नोकरी हाच कुटुंबाचा आधार... घरात राहणाऱ्या नणंदांचा तोरा... लहानसहान गोष्टीतून कोंडमारा... तशात नीमाला



मूलबाळ नाही म्हणून टोमणे... जिला मूल नाही त्या स्त्रीच्या नशिबी सर्वांचे प्रहार... त्यातून पतिपत्नीत येणारा दुरावा... 'नीमा आई बनू शकते पण मी बाप नाही बनू शकत' हे नंदनने उघड केल्यावर 'आपल्या पुरुषी अहंकारापुढे माझ्यातला चित्रकार हरवून गेला' अशी त्यालाच झालेली जाणीव... 'जीवन म्हणजे सुखदुःखाचा गोफ. दुःखाविण ना प्रपंच होतो... सरली आशा, सरले जीवन. पदर न सुटती राहिला गोफ.' अशी तो स्वतःची समजूत घालतो. स्वतःपुरते जगाशी, जीवनाशी जुळवून घेण्याचे तत्त्वज्ञान अंगी बाणवतो.

'जीवन म्हणजे सुखदुःखाचा गोफ. दुःखाविण ना प्रपंच होतो... सरली आशा, सरले जीवन. पदर न सुटती राहिला गोफ.' अशी तो स्वतःची समजूत घालतो. स्वतःपुरते जगाशी, जीवनाशी जुळवून घेण्याचे तत्त्वज्ञान अंगी बाणवतो.

### यशवंतची यशोगाथा

आयुष्यातले असेच अनेक टप्पे प्रकट करणारी 'फूट आणि फूटवेअर' ही कथा आहे. तिचा नायक आहे चौकात कोपऱ्यात बसणारा एक छोटा चर्मकार मुलगा... मोठी छत्री, छत्रीच्या दांड्याला चार विटा... मऊसर बैठक. पट्टेरी लुंगी व बनियन घातलेला मुलगा... काम नसेल तेव्हा पुस्तक वाचत बसणारा... निवेदकाला त्याचे कौतुक वाटते... त्याची ओळख तो करून घेतो. चौकशी करतो. छत्री दुरुस्तीच्या निमित्ताने त्याची माहिती काढतो. दहावीच्या परीक्षेला तो बसणार असतो... सेकंड क्लासमध्ये दहावी पास होतो. निवेदक त्याला ५१ रुपये बक्षीस देतो... निवेदकाचा मुलगाही दहावी पास होतो. सेकंड क्लासमध्ये... मुलाचे आपण किती लाड करतो. गाईडस, सेल्फ स्टडी... आणि या चर्मकार मुलाला तशा काही सुविधा नसताना तोही सेकंड क्लासमध्ये येतो– याची कुठेतरी सल राहते. त्याच्या आणि त्याच्या बायकोच्याही मनात!

हा चर्मकार मुलगा यशवंत पुढे स्वतःची टपरी घालतो... पदवीधर होतो... आणि एके दिवशी शॉपिंग मॉलमध्ये स्वतःचे आलिशान दुकान सुरू करतो. कारमध्ये हिंडतो... निवेदकाला आपल्या कारमधून घरी पोहोचविण्याची तयारी दाखवतो. त्यावेळी निवेदकाला प्रथम दिसते की यशवंत पांगळा आहे... आणि अपंगांसाठी जयपूर फूट उपलब्ध करून देण्यासाठी तो जयपूरलाही जात-येत असतो... भावी जीवनाचे त्याचे ध्येय सेवाभावाचे असते. शारीरिक दुबळेपणावर, आर्थिक दुरावस्थेवर मात करून यशवंतने मारलेली ही मजल– यशवंतची ही यशोगाथा निवेदकालाही नवे बळ देते... तो एका दमात तीन मजले चढून

**जरुरीपेक्षा जास्त प्रोटेक्शन आणि दुसरीकडे आईवडील थोडे दूर असल्याने वाटणारी एकटेपणाची भावना- यामुळे रोहनचा हट्टीपणा जास्त वाढत जातो.**

आपला फ्लॅट गाठतो.

**रोहनची परवड**

चुकीच्या मार्गाने जाणाऱ्या रोहनची जी परवड होते तिचे तपशील 'मृगजळ'मध्ये बघायला मिळतात.

आजी-आजोबा यांच्या लाडात वाढलेला रोहन हट्टी, अनावर होत जातो. जरुरीपेक्षा जास्त प्रोटेक्शन आणि दुसरीकडे आईवडील थोडे दूर असल्याने वाटणारी एकटेपणाची भावना– यामुळे रोहनचा हट्टीपणा जास्त वाढत जातो. अधूनमधून पैशांची मागणी करणे, खोटे बोलणे, भावनात्मक ब्लॅकमेल करणे, वडिलांच्या ऑफिसात जाऊन पैसे मागणे, शाळा बुडवणे, इत्यादी प्रकार चालू राहतात. वर्गातील मित्रांचा सॉलिड पोपट करणे, त्यांना सॉलिड येडा बनवून चैन करणे, 'चम्पी'चा पचका करणे, लेक्चर्सना बुट्टी मारणे, पॉश हॉटेलात जाऊन खाणे, पैजा लावणे– एकापेक्षा एक सवाई असे वाह्यात गुण तो अंगी बाणवत जातो.

त्याच्याकडे लक्ष देता यावे म्हणून आई आपली वैद्यकीय प्रॅक्टिस बंद करण्याचा विचार करते... संध्याकाळचे क्लिनिक बंद करून रोहनसाठी वेळ मोकळा ठेवते... शाळेत सहा महिन्यांची फी त्याने थकवलेली असते म्हणून प्रिन्सिपल बोलावतात... रोहन नापास होतो.

पुढे रोहन बिझनेसमध्ये पडतो. लिक्विड सोपचे रॉ-मटेरियल घेऊन योग्य ते मिक्श्चर करून बाटलीत भरून विकायचे हा पहिला धंदा... दारोदार हिंडून तो सोप विकणे हे अर्थातच त्याला कुठे जमणार?

नंतर तो एका मल्टी लेव्हल मार्केटिंग कंपनीच्या जाळ्यात अडकतो. दोन हजार रुपये भरून मेंबर व्हायचे. इतरांना मेंबर करायचे. प्रत्येक मेंबरमागे शंभर रुपये... त्यातही त्याचा बोऱ्या वाजतो.

...आणि एके दिवशी तो येऊन सांगतो, 'मला लग्न करायचे आहे... मंजिरीवर माझे प्रेम आहे...' घर चालवण्यासाठी पैसा हवा. तो अर्थात आईबाबांनी द्यायचा... एका कंपनीत गुंतवण्यासाठी एक लाख रुपयांची तो मागणी करतो... त्या कंपनीचा मालक करोडो रुपये जमवून गायब होतो. आणि अल्पावधीतच रोहन गुंडांच्या मारहाणीला बळी पडतो...

अशी घटनांची लांबलचक मालिका या कथेच्या रूपात समोर येते.



**व्यवसाय– बुडवणारा, सावरणारा**

**एकीकडे कृतज्ञता; दुसरीकडे मध्यमवर्गीय माणसाने व्यवसाय करताना दाखवलेली बेफिकीरी त्याला रसातळाला नेते ही शक्यता... या दोहोंचा मेळ घालणारी ऋणानुबंध ही एकापरीने बोधकथाच!**

विजाकाकाच्या मोटार गॅरेजमध्ये आणि टुरिस्ट-टॅक्सीच्या धंद्यामध्ये लहान वयातच काम करून अनुभव मिळवणारा. 'ऋणानुबंध'चा निवेदक पुढे स्वत:चा तसाच व्यवसाय सुरू करतो... त्यात जम बसवतो. नवीन गाडीची डिलिव्हरी गुरुपौर्णिमेला घेतो. सिग्नलला एक कळकट माणूस फडके घेऊन त्याची ती नवी चकचकीत गाडी पुसू लागतो... 'युवर कार नाइस. न्यू ब्रँड, काँग्रॅच्युलेशन्स' असे म्हणतो. तेव्हा त्याला निवेदक पाचशेची नोट देतो... त्याची बायको व मुले आश्चर्याने बघतात... तो फडके मारणारा इसम विजाकाका असतो. व्यवसायात काही चुकीचे निर्णय घेतल्याने आणि पार्टनरने गोता दिल्याने त्याची ही अवस्था झालेली असते. निवेदकाची भावना– आपण गुरुदक्षिणा दिली आहे...

एकीकडे कृतज्ञता; दुसरीकडे मध्यमवर्गीय माणसाने व्यवसाय करताना दाखवलेली बेफिकीरी त्याला रसातळाला नेते ही शक्यता... या दोहोंचा मेळ घालणारी ऋणानुबंध ही एकापरीने बोधकथाच!

**स्वत:च्याच बाबतीत फसणारे भविष्य**

पत्रिकेवर विश्वास ठेवणाऱ्यांच्या आयुष्याच्या कहाण्या सांगणाऱ्या दोन कथा या संग्रहात आहेत. 'दिशा'मध्ये देशमुखांना ज्योतिषाचा छंद लागतो. भट गुरुजींकडे ते वरचेवर जात राहतात. शेतीवाडीकडे दुर्लक्ष करूनही पत्रिका बघण्याचा अभ्यास जारी ठेवतात. लग्नाला पाच वर्षे झाली तरी घरात पाळणा हलत नाही. त्यामुळे सर्वजण सचिंत... पत्रिकेवरून नानाला कळते– आपल्या नशिबी पितृयोग नाही... गुरुजी त्याला मेडिकल चेकअपसाठी पाठवतात. दोघांतही काही दोष नसल्याचे कळते. नाना पत्नीला सांगतो, "ह्या समाजात मूल नसलेल्या स्त्रीला जे काही क्लेश सहन करावे लागतात, ते तू हसतमुखाने सहन केलेस. मी तुझा कायमचा उतराई आहे." सासू-सासरे नातवाला न बघताच इहलोकाचा निरोप घेतात... नाना उमाला तिच्या मुलाची– रवीची पत्रिका पाहून त्याच्या मुंजीचा मुहूर्त २१ जानेवारीला उत्तम आहे, मुलगा खूप नाव कमावेल, प्रकृती दणकट, ग्रहमान छान, भरपूर शिक्षण असे भविष्यही सांगतात. दैवयोग असा की हा मुलगा शाळेच्या बसला अपघात झाल्याने मुंजीच्या आधीच मृत्युमुखी पडतो. उमा नानांना

धारेवर धरते. ''बंद करा हे पत्रिका बघणं... लोकांना गोड आशा लावणं'' असं ती त्वेषाने म्हणते. नानांना धक्का बसतो. ते पत्रिका पाहणे थांबवतात; पण बायको म्हणते, ''चार सामान्य लोकांपेक्षा तुम्ही वरच्या पातळीवरचे आहात. इतरांपेक्षा त्या शक्तीच्या जवळ आहात... तुमची साधना खरी आहे... बस अपघातात एकाच वेळी बत्तीस मुलं गेली... शास्त्राला मर्यादा आहेत... तुम्ही अपघातातल्या मुलांच्या पत्रिका मिळवा. त्यातून काही नवा आडाखा बसवता येतो का ते बघा...''

आणि नाना नव्या उमेदीने या कामाला लागतात.

'दिशाहीन'मधले ज्योतिर्भास्कर भाऊसाहेब मात्र आपल्या भाच्याबद्दलचे भविष्य चुकल्याने घरदार सोडून परागंदा होतात. जगाला दिशा देणारे भाऊसाहेब स्वत: दिशाहीन होतात.

...मानवी भावभावनांचे नाट्य, चढउतार टिपण्यात स्वाती चांदोरकर यांना असणारे स्वारस्य त्यांच्या कथांना व्यापक अधिष्ठान देते. सहृदयतेने आणि करुणात्मक दृष्टीने त्या सज्जनांच्या प्रगतीकडे आणि अध:पतितांच्या घसरगुंडीकडेही बघू शकतात. वपुंचा वारसा समृद्ध करण्यात स्वाती चांदोरकरांना उत्तम यश लाभावे हीच रसिकांची इच्छा असणार!

**पृष्ठे : १३६ ● किंमत : १००रु. ● सभासदांना : ७५ रु. ● पोस्टेज: २०रु.**


## ललितलेख संग्रह

**चित्तचित्रे**



**९०रु.**

आपल्या स्वप्नांचा प्रवास स्वच्छंदपणे सांगणाऱ्या काही स्वप्नशोधकांचे मनोगत

**संकलन-संपादन**
**अरुण शेवते**

**पोस्टेज प्रत्येकी २० रु.**

**स्वप्नी जे देखिले**



**९०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**





## मार्गदर्शनपर...

*मनात व शरीरात खोलवर दडलेले ताणतणाव दूर करून आनंदी जीवन कसे जगावे याविषयी मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून सुयोग्य मार्गदर्शन करणारी ही पुस्तके, यातून मनाला क्रियाशील व उत्साही बनवण्यासाठीचा खास मानसिक 'पौष्टिक' आहार मिळेल*




**चिंतामुक्त जीवन**
आर. डी. मुनोत
**१६०रु.**



**आपण आपले ताणतणाव**
अंजनी नरवणे
**१००रु.**



**मनावर विजय**
एकनाथ ईश्वरन्
**१२५रु.**



**निरामय यशासाठी ध्यान**
शुभदा गोगटे
**७०रु.**

**पोस्टेज प्रत्येकी २५ रु. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# पाऊलवाटेवरले गाव

मानवी नात्यांमधील तरल भावबंध उलगडून दाखवणाऱ्या संवेदनाक्षम कथा.

**आशा बगे**

नामवंत लेखिका आशा बगे यांचा नवा कथासंग्रह 'पाऊलवाटेवरले गाव' त्यांच्या प्रगल्भ कथालेखनातला एक नवा टप्पा दर्शविणारा आहे. मध्यमवर्गीयांच्या कथा; परंतु स्थलकालातीत नात्यांचा एक व्यापक, प्रत्यय त्या देऊ पाहतात. 'अतिथी' ही या संग्रहातील एक अविस्मरणीय कथा.

दोन दिवस तुफान पाऊस... तरीही डॉ. सुदर्शन आणि नलिनी कारने निघतात... सुदर्शनची पत्नी उमा आठदहा वर्षांपूर्वी वारलेली. मोठा मुलगा सुभाष काहीसा दुरावलेला. विवाहित. त्याची मुलगी सई. डॉ. सुदर्शनची नात... नलिनी नवऱ्याच्या, भास्करच्या मृत्यूनंतर अनेक वर्षे एकटी... तिच्या दोन्ही मुली लग्न करून परदेशात... डॉ. सुदर्शन आणि नलिनी– दोघेही पन्नाशीत... तरी लग्न करायचे ठरवतात. नलिनी पत्र लिहून मुलींना या लग्नाबद्दल पूर्वसूचना देते. त्यांचे मत असे की– स्नेह असावा. पण लग्न नको... तरीही त्यांची पत्रे येतात... सुभाषला मात्र तशी काही कल्पना देणे डॉ. सुदर्शन यांना जड जाते... केवळ दोन दिवस बाहेर जातोय असे ते सुनेला सांगतात, तर छोट्या सईला मात्र गावाला जाणार आहोत... तुला बाहुली आणणार आहोत याची कल्पना देतात. नलिनी घराच्या किल्ल्या मैत्रिणीला– प्रतिभाला देऊन घर साफसूफ करून ठेव सांगते. ''तुमच्याबरोबर घरात प्रवेश करायचा तर...'' ती सुदर्शनला सांगते.

पाऊस वाढत जातो... वायपर्स अडकतात. ''आज पावसात निघायलाच नको होतं.'' नलिनीच्या शेऱ्यावर ''आता परत फिरायचं का?'' असा संतप्त सवाल डॉ. सुदर्शन करतो.

वाटेत एका ठिकाणी झाड आडवे पडलेले. गाडी पुढे जाणे अशक्य. लहानसा पूल. दोन्ही बाजूंना वाहनांची रांग... हॉटेल बंद...



**आजी त्यांना मुगाची खिचडी, लिंबाचे लोणचे, आमसुलाचे सार, मेतकूट वाढते. आपल्या दिवंगत पत्नीच्या हातच्या स्वयंपाकाची डॉ. सुदर्शनला आठवण होते.**

गाडी उलट्या दिशेने... पण वाटेतच बंद पडते. ती बाजूला उभी करून दोघे एका उजेड असणाऱ्या बंगल्याचे दार वाजवतात... एक तरुणी दार उघडते.

''गाडी बंद पडलीय... पाऊस भयंकर... पाऊस थांबेपर्यंत राहता आलं तर...?''

ती 'आजी' म्हणून हाक मारते... त्या दोघांना भिजलेले बघून आजी त्यांना घरात या म्हणते. घरात आजोबा आजारी असतात. मरणोन्मुख...

आजी म्हणते, ''तुम्हांला एक सांगते... ही माझी नात नंदू. हे हिचे आजोबा... खूप आजारी आहेत. शेवटचीच घटका म्हणायची... रात्र उलटेल न उलटेल.''

''मी डॉक्टर आहे. मी बघतो.'' डॉ. सुदर्शन गाडीतून सूटकेस आणतात... जीनची बाटलीही.

नलिनीला ते आवडत नाही... कॉफीचा ट्रे येतो. जेवणाचा आग्रह होतो...

डॉ. सुदर्शन आजोबांना बघतो– ऑक्सिजन लावलेला... ''मुलगा अमेरिकेहून यायला निघाला आहे. सकाळी विमान येईल... तोपर्यंत...'' आजी सांगते.

आजी त्यांना मुगाची खिचडी, लिंबाचे लोणचे, आमसुलाचे सार, मेतकूट वाढते. आपल्या दिवंगत पत्नीच्या हातच्या स्वयंपाकाची डॉ. सुदर्शनला आठवण होते. ती कऱ्हाडे... सुदर्शन म्हणतो, ''जेवण चांगले झालेय. सार मला आवडले.'' नलिनी डोळे वटारते. सुदर्शन नंदूला विचारतो, ''तू आमच्यावर रागावली आहेस– आम्ही या अशा वेळी आलो म्हणून?'' ती तुटकपणे छे म्हणते. तो आजीला विचारतो, ''तुम्ही कऱ्हाडे का?'' आजी हो म्हणते तेव्हा डॉ. सुदर्शन सांगतो, ''माझी पत्नी असंच सार करायची... ती गेल्यावर... इतक्या वर्षांत ती चव पुन्हा...'' नंदूच्या डोक्यात संशय... पत्नी गेली– मग ही बाई कोण? आजी मात्र तिकडे लक्ष न देता म्हणते– ''आजोबांनाही हे सार खूप आवडते– म्हणून केले. असं सार फक्त कऱ्हाड्यांच्याच घरी होते.''

...आजोबांची तब्येत गंभीरच. मृत्यू समोर असूनही मृत्यूचा गंध या घरात नाही, आसपास नाही असं सुदर्शनला जाणवतं... आजीपण आजोबांच्या खोलीत गडबड जाणवते तेव्हा सुदर्शन तिकडे जातो. आजी म्हणतात, ''वेळ आलीय असं वाटतं... नळ्या काढून टाकाव्या. या वेळी तरी त्यांनी निरुपाधिक असावं.''

**''जा. स्वच्छ आंघोळ करून घ्या. सगळा दोष धुवून निघेल. तसाही या मरणाला दोष नाही. पिकलं पान झाडावरून गळून पडलं. आयुष्य पूर्ण खर्च करून आलेलं निवान्त मरण...''**

सुदर्शन ऑक्सिजन काढतो. बाहेर रुद्राचा घोष...

सकाळी सातला सुदर्शन उठतो. पाऊस थांबलेला असतो. मुलाला विमानतळावरून आणायला गाडी गेलेली असते. आजी सुदर्शनला म्हणतात, ''निघा तुम्ही. तुम्ही यात अडकू नका.'' तरी सुदर्शन काही वेळ थांबतो. म्हणतो, ''आम्ही लग्न करायला जात आहोत.''

आजीचे डोळे चमकतात. त्या म्हणतात, ''जा. स्वच्छ आंघोळ करून घ्या. सगळा दोष धुवून निघेल. तसाही या मरणाला दोष नाही. पिकलं पान झाडावरून गळून पडलं. आयुष्य पूर्ण खर्च करून आलेलं निवान्त मरण...'' सुदर्शन गाडीजवळ येतो. ''आपण दोषबिष मानत नाही.''हा त्याचा बुद्धिप्रामाण्यवादी बाणा. रस्ता खुला झालेला असतो.

जीवन-मृत्यूचे अनोखे नाट्य अल्प अवकाशात टिपणारी ही कथा. पन्नाशीतल्या दोघांच्या लग्नाची. दोघांची पूर्वाश्रमीची मुले आहेत... दोघे घरी न सांगता लग्नासाठी निघालेले आहेत. भरपूर पाऊस. वाटेत झाड पडलेले. कोठेतरी मुक्काम करणे भाग आहे... जे घर सापडते तेथे आजोबा मृत्यूशय्येवर... तरीही आजीने केलेले स्वागत... आणि निघताना दिलेला आशीर्वाद... डॉ. सुदर्शन... आपल्या प्रौढ मुलाला आपण लग्न करायला निघालो आहोत हे सांगण्याचे टाळणारा... पण गरज नसतानाही आजीचा निरोप घेताना ते आवर्जून सांगणारा... मृत्युशय्येवर असणारे आजोबा... तरीही आपली भूक लक्षात घेऊन जेवणाचा भरपेट आस्वाद घेणारा... या सर्वांकडे पाहणाऱ्या वेगवेगळ्या व्यक्ती आणि त्यांच्या त्यांच्या विचारपद्धती... प्रत्येक लहानसहान कृतीचे इतरांच्या मनावर उमटणारे किंवा न उमटणारे तरंग...

आशा बगे यांच्या 'पाऊलवाटेवरले गाव'मध्ये केवडा, गाव, लग्न, कलश, ॲन्टिक, पुन्हा एकदा जन्म या अन्य कथाही आहेत. गाव, केवडा आणि लग्न या दीर्घकथा आहेत.

## दिवंगत मुलाच्या आठवणी जागवणारा अभीन

आपल्या शेजारी राहण्यास आलेल्या कुटुंबातील अभीनच्या सतारवादनाचे, वाचनवेडाचे कुतूहल जयाला वाटत राहते; त्याच्याकडे बघून त्याच्याच वयाच्या पण मृत झालेल्या आपल्या मुलाचे कार्तिकचे व्यक्तिमत्त्वविशेष जयाला जाणवत



**साध्या प्रसंगांपासून निवेदनाला आरंभ होतो आणि त्या निवेदनात मग वेगवेगळ्या व्यक्ती, घटना, त्यांच्या प्रतिक्रिया, त्यातले ताणतणाव प्रकट होत जातात... नात्यांचा एक संवेदनक्षम पट त्यातून आकार घेत राहतो... भावभावनांचा एक आगळाच कॅलिडोस्कोप त्यातून दिसू लागतो.**

असतात. आपली मुलगी कीर्ती आणि हा अभीन यांच्यातील जवळीकही तिला विस्मयचकित करीत असते. आपल्या आणि अभीनच्या घरामधील मोकळ्या प्लॉटवर बांधकाम सुरू झाल्यावर मात्र जयाचे त्याच्याकडे जाणे कमी होते...

''वरवर साध्या दिसणाऱ्या कागदांतून तोच एका विशिष्ट अँगलनं प्रकाशात धरला तर एखाद्या कोड्याचं उत्तर उमटावं तसं झालं... त्या आता नुसत्या रेषा नव्हत्याच. तो दिवाणखाना, ते छत, ते खांबावर कोरलेलं नक्षीकाम, भिंतीचे कोपरे, त्या जुन्या वास्तूचे ते अवशेष... एक नवं रूप घेऊन समोर येतात असं जाणवतं'' (३२) हे वर्णन आशा बगे यांच्या कथांनाही लागू पडते. साध्या प्रसंगांपासून निवेदनाला आरंभ होतो आणि त्या निवेदनात मग वेगवेगळ्या व्यक्ती, घटना, त्यांच्या प्रतिक्रिया, त्यातले ताणतणाव प्रकट होत जातात... नात्यांचा एक संवेदनक्षम पट त्यातून आकार घेत राहतो... भावभावनांचा एक आगळाच कॅलिडोस्कोप त्यातून दिसू लागतो.

आशाताईंच्या या कथांच्या विषयांमधील तरलताही चक्रावून टाकते.

पोस्टमन अनूला एक रजिस्टर पत्र देतो... अनू मतिमंदांच्या संस्थेत काम करते... त्या पत्रात ताराबाई सदाफळांच्या मृत्यूची वार्ता असते. त्या आजारी असताना आपली आठवण काढत होत्या असा उल्लेख असतो... ताराकाकूंच्या आठवणी मग मनात जाग्या होतात. त्या गावी जाऊन रमेश सदाफळ याला भेटतात... घराला भेट देतात... ताराबाईंचे वकील येतात... ''तुम्हाला वीस हजार रुपये द्यावे असे बाईंनी मृत्युपत्रात लिहिले आहे'' म्हणून ते एक लिफाफा अनूला देतात... नंतर डॉ. गोवर्धन येतात... ''तुम्ही आलात बरं झालं. ताराची तशी इच्छा होती...'' त्या दोघांमधलं नातं तिला ठाऊक असावं अशा थाटात ते सहज बोलतात... आणि ती संकोच सोडून प्रसन्न हसते... ताराबाईंच्या अंतिम क्षणी तेच बरोबर असतात... निरोप द्यायला डॉ. गोवर्धन स्टेशनवर येतात. तुफान पाऊस पडतो. गाडी लेट असते. अनू बघते तर डॉ. गोवर्धन दुसऱ्या टोकाला उभे... कोरडे ठणठणीत...

## यश मिळाले पण मी समृद्ध नाही झाले

रेणूने पळून जाऊन एका खालच्या जातीच्या पोराबरोबर लग्न केले म्हणून

"माझा संघर्षच वेगळा होता. मी पाणी विसरले, प्रवाह विसरले. आजूबाजूचे किनारे जणू हरवून टाकले. तरी मला यश मिळाले. पण मी समृद्ध नाही झाले. दोन भिन्न प्रवाहांनी एकमेकांना समृद्ध करीत वाहायचे असते.

घरचे लोक नाराज होतात... वडील, आई, आत्या, वडिलांचे सासरे... अशा अनेकांची त्यानंतर पत्रांमधून प्रकट झालेली मते– रेणूला भेट देऊन वडिलांनी तिचा बघितलेला संसार– त्याची हकीकत, त्यातून प्रकट होणारी त्यांच्या नात्यातील वेगवेगळी आवर्तने 'लग्न'मध्ये कोलाजसारखी येतात.

रेणूला या थोड्या वेगळ्या प्रकारच्या नातेसंबंधातून घरची माणसे तुटण्याशिवाय काय मिळाले? रेणू पीएचडी पर्यंत मजल मारते खरी; 'पण इतक्या वर्षांत पाण्यात उतरलेच तर नाही' अशी रुखरुख तिच्या मनात उरतेच. "माझा संघर्षच वेगळा होता. मी पाणी विसरले, प्रवाह विसरले. आजूबाजूचे किनारे जणू हरवून टाकले. तरी मला यश मिळाले. पण मी समृद्ध नाही झाले. दोन भिन्न प्रवाहांनी एकमेकांना समृद्ध करीत वाहायचे असते. ते माझ्या वाट्याला आले नाही. चंद्रकांतच्याही नाही. आता नयनही पुन्हा याच वाटेनं निघालीय. जागांची फक्त अदलाबदल... काळ खरंच बदलतो आहे का?... कुठल्या रस्त्यावर भेटतील मग बदलाच्या खुणा?" असा प्रश्न तिला पडतो.

**प्रिय व्यक्तीचा अखेरचा निरोप**

पूर्वाश्रमीचा प्रियकर विद्याधर देवकीच्या गावी व्याख्यानासाठी येतो, तिच्याच घरी उतरतो. महाभारताची नायिका या विषयावर बोलतो... जुन्या आठवणींचा रवंथ होतो. देवकी बंगाली साहित्याचा अनुवाद करायची... विद्याधर चित्रे काढायचा. पण देवकीचे आता अनुवादाचे काम थांबले आहे... "ती भाषा आली. पण अनुवाद करण्यासाठी तेवढे पुरे नाही. तो लेखक, त्याचे मर्म, त्याचा तळ, खोली, त्याची भूमी सारे माहीत हवे म्हणून थांबले मी." असे देवकी म्हणते तर विद्याधरची चित्रकला थांबते. का? "माझ्या चित्रात सारख्या सारख्या भिंती यायला लागल्या. चौकटी यायला लागल्या. रंग भडक व्हायला लागले." विद्याधर दुसऱ्या दिवशी तिला म्हणतो, "तू इतकी निकट आसपास आहेस! कालपासून एक वेगळाच फील येतोय... वाटलं की मधे काही घडलेच नाही. पूर्वी जसे आपण जवळ होतो तसे आताही..."

देवकीला श्वास उरात मावत नाहीसे वाटते.

निघताना विद्याधर म्हणतो, "लांबच्या प्रवासाला निघायचे आहे... मला



तुझ्याकडेच यायचं होतं. व्याख्यान हे निमित्तच ग... घशाचा कॅन्सर... आता सेकंडरीज सुरू आहेत. तशी तब्येत बरी आहे पण जवळ वेळ किती आहे हे कळत नव्हतं... मग तुझी आठवण आली... पण मी जगायचं ठरवलं आहे... पण देवकी, मी जे सुरू केलं त्याच्या अस्तित्वाची बीजं त्याच्यातूनच पडावी, वाढावी. एक चक्र सुरू रहावे. इतके करता येईपर्यंत आयुष्य हवे आहे... बस. हा एक मूर्खपणाच आहे खरं म्हणजे..."

'कलश' कथेत हा भावबंधाचा जवळपणा पुन्हा बहरत राहतो.

एका प्रगल्भ मानसिक पातळीवरच्या भावभावनांचा हा सगळा खेळ कधी जीवघेणा तर कधी नियतीचा बेभरवशाचा कारभार असल्यासारखा समोर येत जातो. नात्यांतील सकारण-अकारण दुराव्यांचा अवघा पसारा अंगावर वादळासारखा येऊन कोसळतो...

या कथा म्हणजे प्रलयच. हा प्रलय केवळ पाण्यातच शिरत नाही. मस्तकातही भिनत जातो.

**पृष्ठे : १४४ ● किंमत : ११०रु. ● सभासदांना : ८३ रु. ● पोस्टेज: २०रु.**




एक रक्तपिपासू सिंह माणसांची शिकार करत मोकाट सुटला त्याच्या मागावर एफबीआय चे शिकारीही निघाले. तो खेळ शिकारीचा नव्हता; ते होते एक भीषण राजकीय सूडसत्र...! यात कोणी कोणाची शिकार केली...?

**द लायन्स गेम**

**नेल्सन डेमिल अनु. अशोक पाध्ये**

**किंमत ६८०रु.**
**पोस्टेज ३५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

लोकरीचे विणकाम




३५०रु.
पोस्टेज ३०रु.

आशा पत्रावळी

'विणकामाबद्दल' सोप्या भाषेतील मार्गदर्शन
वाचा, पहा व लगेच सुंदर नमुने बनवा

२००रु.
पोस्टेज २५रु.




क्रोशा विणकाम

प्रभावती पुरम




शिवणकला - एक छंद
स्मॉकींग

हेमा कळके

'स्मॉकींग' या भरतकाम कलेविषयी सचित्र
मार्गदर्शन करणारे पुस्तक

१००रु./ पोस्टेज २०रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.




सार्धंसुधं...

## दात आणि चणे

प्रमोदिनी वडके-कवळे

आठपंधरा दिवसांसाठी गावाला जायचं असलं की लोकांना आपल्या घराची, त्यातल्या वस्तूची फार काळजी वाटते. मग कुणी आपली कुत्रीमांजरं मित्रांकडे सांभाळायला देतात, तर कुणी 'कुंडीतल्या झाडांना आठवणीने पाणी घाला हं' असं गहिवरल्या स्वरात म्हणत घराची किल्ली शेजाऱ्यांकडे देतात. आमच्या मामांनी असाच त्यांचा रेडिओ आमच्याकडे ठेवायला दिला.

उन्हाळ्याच्या सुटीत कुणाच्यातरी लग्नासाठी सहकुटुंब जायचं होतं, म्हणून भाईमामांनी नुकताच घेतलेला रेडिओ नीट सांभाळण्यासाठी आमच्या अण्णांकडे सुपूर्द केला होता.

ही गोष्ट बेचाळीस वर्षांपूर्वीची.

रेडिओ ही त्यावेळी केवळ श्रीमंतांचीच मिरासदारी होती. आज अठ्ठेचाळीस इंची फ्लॅट टी.व्ही.चं वाटत नाही एवढं अप्रूप त्याकाळी रेडिओचं वाटायचं. बाजारात फक्त दोनतीन ठराविक कंपन्यांचे ठराविक आकाराचेच रेडिओ मिळायचे. गावातल्या लक्ष्मीधरांच्या दिवाणखान्यात खास मखर बनवून एखाद्या नवसाच्या गणपतीची प्रतिष्ठापना करावी तसा काचेच्या शोकेसमध्ये रेडिओ ठेवलेला असायचा.

मामांचा रेडिओ आला आणि आमच्या घराचा नूरच पालटून गेला. आमच्या पुढच्या खोलीत त्याला साजेसं सिंहासन नसल्यामुळे स्वयंपाकघरातल्या एका सोयीस्कर फळीवर त्याची स्थापना केली गेली. त्यावेळी घरात नुकतीच वीज आली होती. तिचं कौतुक मनातून पुरतं सरायच्या आतच ही नवी कौतुकाची वस्तू– तात्पुरती का होईना– घरात आल्यामुळे वाड्यातल्या मुलांच्यात आम्हां भावंडांचा भाव वधारला. ही नवलाईची वस्तू अशी सहज ऐकण्याच्या अंतरावर येणं म्हणजे आमच्या मध्यमवर्गी भाडेकरूंच्या वाड्याला लागलेली लॉटरीच होती. रेडिओच्या आवाजाने वाड्यालाच जणू नवी तरतरी आली. आता कुणी ऐकलं तर विश्वास बसणार नाही, पण तेव्हा रेडिओची एवढी अपूर्वाई वाटायची की त्या नादात आम्हां मुलांना तर दुसरं काही सुचेनासंच झालं होतं. गंमतजंमतचे नाना, वाचकांच्या पत्रांना उत्तर देणारे ताईदादा या न पाहिलेल्या व्यक्ती आम्हाला अगदी जवळच्या वाटायला लागल्या. उन्हाळ्याच्या सुटीमुळे आळसावलेलं वेळापत्रक आम्ही रेडिओच्या कार्यक्रमाशी जुळेलसं करून घेतलं. रात्री निवेदिकेचं नमस्ते ऐकल्याशिवाय झोप येईनाशी झाली. एरवी शनिवारच्या शाळेसाठी सकाळी आम्हाला

उठवण्यासाठी आईला पाच हाका, दोन धपाटे आणि शेवटी गदगदा हलवणं एवढी लढाई करावी लागायची. पण आता सकाळी मंगल प्रभातच्या आधीच आमचे डोळे उघडायला लागले. 'आजचे कार्यक्रम' ऐकण्याची उत्सुकता तर परीक्षेच्या निकालासारखीच. श्रुतिका (माझा धाकटा भाऊ सूतिका म्हणायचा.) ऐकणं हा तर मोठा सोहळाच. त्यासाठी रात्रीची जेवणं लवकर उरकायची. गाद्या घालून ठेवायच्या. शेजारच्या वैन्याकाकू आणि इतर मित्रमंडळींना हाका मारायच्या. या सगळ्या उत्साहात आई आणि आजी पण सामील असल्यामुळे अण्णांचा नाईलाज व्हायचा. शेवटी रेडिओ घरात येऊन चार दिवस झाल्यावर त्यांनी जाहीर करून टाकले. ''रेडिओ ठराविक वेळीच लावायचा. उगीच त्याची सवय होईल आणि नंतर जड जाईल.''

पण वाईट सवयी पटकन लागतात हेच खरं. आठ दिवसांनी मामा परत आल्यावर तो बोलका खोका स्वगृही परत गेला तरी त्याचं अस्तित्व आमच्या मनावर रेंगाळत राहिलंच. 'मोठ्ठं झाल्यावर पहिल्यांदा काय करायचं? तर छानसा रेडिओ घ्यायचा... आपला स्वत:चा!' असं वाड्यातल्या प्रत्येक मुलाने मनाशी ठरवून टाकलं.

सातआठ वर्षांनी, रेडिओच्या किमती मध्यमवर्गीयांना परवडण्यासारख्या झाल्यावर आमच्या घरात ट्रान्झिस्टर आला. (तरी अजूनही रेडिओ ही प्रतिष्ठेचीच वस्तू होती. दोन बँडच्या रेडिओचं चक्क लायसन्स काढावं लागायचं. आणि दरवर्षी लायसन्स फीसुद्धा भरावी लागायची.) आता आम्ही भावंडं गंमतजंमतचं वय ओलांडून हिंदी गाणी आणि क्रिकेट कॉमेंटरी ऐकण्याच्या वयात आलो होतो. त्यामुळे रेडिओच्या बटनांशी खेळून आम्ही पुणेमुंबई आणि विविध भारतीखेरीज आणखी दोनचार स्टेशन्स शोधून काढली. सिलोन स्टेशन सापडलं तो दिवस म्हणजे आनंदाची परमावधी होती. अमेरिका सापडल्यावर कोलंबस कसा नाचला असेल त्याची तालीम त्या दिवशी आम्ही करून बघितली. रोज सकाळचं 'आपही के गीत' आणि बुधवारची 'बिनाका' ऐकणं यासारखा दुसरा आनंद नव्हता त्या वयात!

असंच एकदा खेळता खेळता मला पणजी स्टेशन सापडलं. तिथे तर सोमवारी संध्याकाळी 'आपली आवड'सारखा एक कार्यक्रम लागायचा आणि त्यात एकाआड एक हिंदी आणि मराठी लोकप्रिय गाणी लागायची. त्या कार्यक्रमाचं कोकणी भाषेतलं सानुनासिक निवेदनही ऐकायला फार गोड वाटायचं.

त्यावेळी रेडिओवरचे पुढच्या पंधरवड्याचे कार्यक्रम सांगणारं नभोवाणी नावाचं पाक्षिक प्रसिद्ध व्हायचे. रेडिओच्या कौतुकापायी अण्णांनी दोनतीन वेळा तेही विकत आणल्याचं मला आठवतंय.

जिची सवय लागण्याची अण्णांना भीती वाटत होती ती आकाशवाणी



म्हणजे कुटुंबाचा एक घटकच बनून गेली होती. अजूनही शाळेतले दिवस आठवले की शाळेत जाताना बाजूच्या घरातून ऐकू येणारं कागारसभेचं ते विशिष्ट संगीत माझ्या कानात गुंजायला लागतं.

त्याकाळात टॉप टेन वगैरेची प्रथा असती तर तमाम मराठी कुटुंबांनी 'पुन्हा प्रपंच'ला एकमताने पहिला नंबर दिला असता. ही मालिका आणि टेकाडे भावजी हे त्यातलं पात्रही तेवढंच लोकप्रिय होतं. आमच्या घरात आजीपासून धाकट्या संतोषपर्यंत सगळ्यांना सारखाच आवडणारा कार्यक्रम म्हणजे श्रुतिका किंवा नभोनाट्य! ज्योत्स्ना देवधरांचं 'घरगंगेच्या काठी' आणि गोनिदांचा 'पवनाकाठचा धोंडी' या कलाकृती नभोनाट्याच्या रूपात आम्ही अगदी महिनोन्महिने ऐकत होतो. आजीला कमी ऐकू यायचं म्हणून ती रेडिओच्या जवळ बसायची आणि बोलणाऱ्या माणसाच्या तोंडाकडे पहावं तशा नजरेने कार्यक्रम संपेपर्यंत एकटक रेडिओकडे पहात रहायची. व्यंकटेश माडगूळकरांची 'वाटसरू' आणि मुलं पळवण्याच्या घटनेवरीची 'हॅलो कंट्रोल' या श्रुतिका तर इतक्यांदा ऐकून झाल्या की, त्यातले संवाद हेलकाव्यासहित आम्हाला पाठ झाले होते.

काळाच्या ओघात नव्यानव्या सुधारित आणि सोयीस्कर वस्तू बाजारात येतात त्या वापरण्याची आपल्याला नकळत सवयही होते. पण माझ्या मते या वस्तू नुकत्याच जमलेल्या मैत्रीसारख्या असतात. ती कितीही मनमोहक आणि आकर्षक असली तरी आपल्याला मधूनच जुनी मैत्री आठवत राहतेच. आकाशवाणी माझी अशीच जुनी मैत्रीण आहे. दूरदर्शनच्या काळातही मला तिची ओढ लागते. तिची साद खुणावते. माझ्या विश्रांतीच्या वेळी ती मला सोबत करते आणि कामाच्या गर्दीतही माझ्या बरोबर राहते. पहाटे अंथरूणात पडून भक्तिगीतं किंवा धुंदकुंद पावसाळी रात्री दिवा मालवून जुनी दर्दभरी गाणी ऐकताना ती माझे मनोरंजन करत असते तर सकाळी एखाद्या पी.टी. शिक्षकाच्या थाटात माझ्याकडून कार्यक्रमाची रूपरेषा– कणीक मळा, आपले आरोग्य– पोळ्या लाटा, संस्कृत बातम्या– आंघोळीला, पळा. मराठी बातम्या– डबा भरा, अशी शिस्तबद्ध कवायतही करून घेते.

रेडिओवर एखाद्या गाण्याच्या ओळी चालू असताना मनाच्या टाईपरायटवर खटखट होते आणि आठवणींची अक्षरं उमटायला लागतात. एखादं नाट्यगीत आईची वत्सल आठवण जागवून जातं, तर एखादं भावगीत ऐकताना लग्नानंतरचे सुरुवातीचे दिवस परत आल्यासारखं वाटतं. दूरदर्शनवर दुसऱ्या कुणाचंतरी दु:ख आनंद बघताना तुम्ही परकायाप्रवेश करता पण आकाशवाणी तुमच्या कानातून पोटापर्यंत पोहोचू पहाते. रेडिओवर लागणारं एकच गाणं खोलीतल्या चार जणांपर्यंत चार वेगवेगळ्या तऱ्हेने पोहोचतं.

मात्र या जिवलग वाटणाऱ्या आकाशवाणीने मला आयुष्यभर कुरतडणारी

एक टोचणीदेखील दिलीय.

आमच्या अण्णांना वाचनाचा मनापासून कंटाळा. मी लेखन करायला लागले, अधून मधून माझ्या कथा प्रसिद्ध व्हायला लाल्या याचं त्यांना कौतुक वाटायचं. पण त्या पाचसहा पानी कथा वाचणं मात्र त्यांच्या जिवावर यायचं. एकदा ते मला म्हणाले, ''आता तू एखादी श्रुतिका लिही. म्हणजे आम्हाला रेडिओवर तुझं नाव ऐकता येईल.''

मी अण्णांचं ते बोलणं फारसं मनावर घेतलं नाही. एकतर रेडिओवर लेखन करण्याइतकी मी मोठी लेखिका झाले नव्हते आणि रेडिओसाठी लागणाऱ्या विशिष्ट लेखनकौशल्याबद्दल मला तेवढासा आत्मविश्वास नव्हता.

ही कारणं म्हटलं तर पोकळच होती. मी मनावर घेतलं नाही हेच जास्त खरं.

अगदी थोड्याशा आजाराने ध्यानीमनी नसताना अण्णा गेले.

डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात ते गेले आणि माझ्याकडून काहीही प्रयत्न झाले नसताना मार्चमध्ये मला आकाशवाणीसाठी कथाकथन करण्याचं पत्र आलं.

आधी मी थोडे प्रयत्न केले असते, निदान आकाशवाणीवर कसं जाता येईल याबद्दल कुणाकडे चौकशी केली असती तर?

दात असताना चणे नसावेत आणि चणे हातात आल्यावर दात पडलेले असावेत हा अनुभव प्रत्येकाच्याच आयुष्यात कधी ना कधी येऊन जातो.

पण मला तो इतक्या करुण पद्धतीने भेटून जावा?

**प्रमोदिनी वडके-कवळे**

प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८




## समर्पिता

**शरद दळवी**

रामायणकाळातील सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय बदलातून उलगडत जाणारे स्त्रीत्वाचे विविध पैलू

२२०रु. **पोस्टेज २५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



## वास्तुरहस्य

डॉ. नरेंद्र सहस्त्रबुद्धे
डॉ. रविंद्र महात्मे

१२०रु.

**पोस्टेज २५रु.**




**फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स पुरस्कार २००३**

पंचमहाभूतानुरूप वास्तूची आखणी कशी करावी याचे शास्त्रशुद्ध मार्गदर्शन करणारे पुरस्कारप्राप्त पुस्तक

## वॉर्सा ते हिरोशिमा

वि. स. वाळिंबे


३००रु.

**पोस्टेज ३०रु.**




**सोव्हिएत लँडचा नेहरू पुरस्कार १९८४**

दुसऱ्या महायुद्धाच्या आरंभापासून समाप्तीपर्यंत जित आणि जेत्या राष्ट्रांची प्रखर व प्रदीर्घ झुंज सांगणारी महागाथा




**नवीन आवृत्ती**

## वादळमाथा

**राम प्रधान**

यशवंतराव चव्हाण यांच्या वादळी कालखंडाचे, कारकिर्दीचे यथार्थ दर्शन घडवणारे पुस्तक

१२०रु. **पोस्टेज २५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




### * डॉ. अधिकारी पुरस्कार

लोकसभेचे सभापती सोमनाथ चटर्जी यांना 'डॉ. गंगाधर अधिकारी पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. बलराज साहनी- साहिर लुधियानवी फाउंडेशनच्या वतीने ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंतराव गोवारीकर यांच्या हस्ते हा पुरस्कार पुणे येथे देण्यात आला.

डॉ. गंगाधर अधिकारी १९२२ मध्ये भौतिकशास्त्राच्या अभ्यासासाठी बर्लिनला गेले होते. तेथे त्यांनी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. मुंबईला परतल्यानंतर ब्रिटिश सरकारने त्यांना मीरत कटाच्या खटल्यात अटक केली. त्यात त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास झाला. त्या वेळी डॉ. अधिकारी यांच्या सुटकेसाठी डॉ. अल्बर्ट आइनस्टाइन यांनी जाहीर आवाहन केले होते. 'पीपल्स वॉर', 'युगांतर' आदी नियतकालिकांचे ते संपादकही होते.

### * पुणे मराठी ग्रंथालयाचे पुरस्कार

पुणे मराठी ग्रंथालयाच्या वतीने गिरीश प्रभुणे लिखित 'पारधी' या पुस्तकाला कै. विश्वनाथ नरवणे स्मरणार्थ 'चेतना पुरस्कार' आणि सुधा रिसबूड लिखित 'अंतरिक्षाचा वेध' या पुस्तकाला अनंत सुर्वे स्मरणार्थ स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्काराचे वितरण ज्येष्ठ अभिनेते चंद्रकांत गोखले यांच्या हस्ते झाले.

पाच हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह, असे दोन्ही पुरस्कारांचे स्वरूप आहे.

'विज्ञानाची बीजे ऋग्वेदातच सापडतात. विज्ञानाचे संशोधन मात्र युरोपात झाले. विज्ञान हे मानवी मनाचा आविष्कार आहे,'' असे सुधा रिसबूड यांनी आपल्या मनोगतात नमूद केले.

उपेक्षित राहिलेल्या पारधी समाजावर आधारित आपले पुस्तक एक प्रकारे वास्तव कथांचा संग्रह असल्याचे गिरीश प्रभुणे यांनी नमूद केले.

### * डॉ. सौ. मथु सावंत यांना पुरस्कार

नांदेड येथील सुप्रसिद्ध लेखिका डॉ. सौ. मथु सावंत यांना औरंगाबादच्या धोंडीराम माने विकास प्रबोधिनाचा पुरस्कार 'कथाकार भास्कर चंदनशिव' या समीक्षाग्रंथासाठी देण्यात आला.



### * साहित्यालंकार पुरस्कार

प्रसिद्ध साहित्यिक बाळ राणे यांच्या 'प्रज्ञाचक्षू दीपस्तंभ' ग्रंथास महानुभाव विश्वभारती, अमरावती या संस्थेतर्फे या वर्षाचा 'महानुभाव ग्रंथोत्तेजक साहित्यालंकार पुरस्कार देण्यात आला. 'प्रज्ञाचक्षू दीपस्तंभ' हे संत गुलाबराव महाराजांचे ललितचरित्र आहे.

### * दीपास्मृती पुरस्कारासाठी आवाहन

अहमदनगर जिल्ह्यामध्ये विविध क्षेत्रांमध्ये समाजकार्य करणाऱ्या 'दीपा निसळ स्मृती प्रतिष्ठान'च्या वतीने 'दीपास्मृती' पुरस्काराचे आयोजन करण्यात आले आहे.

या पुरस्काराकरिता, पुस्तके १५ सप्टेंबर २००६ पर्यंत 'दीपा निसळ स्मृती प्रतिष्ठान', स्वामी विवेकानंद चौक, गुजरगल्ली, अहमदनगर- ४१४००१ (फोन नं. २३४५०३०) येथे पाठवावीत.

पुस्तके मराठी भाषेत असावीत व त्यांचे प्रकाशन २००५ व २००६ मध्ये झालेले असावे. पुरस्काराकरिता कथा, कादंबरी, बालसाहित्य, प्रवासवर्णन, काव्य, ऐतिहासिक इ. विभागातील पुस्तके स्वीकारली जातील. मात्र अनुवादित पुस्तके स्वीकारली जाणार नाहीत.

पुरस्काराकरिता पुस्तके पाठवताना पुस्तकावर कोणत्याही प्रकारचा मजकूर नसावा. दीपा निसळ स्मृती प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी आयोजित होणाऱ्या काव्यस्पर्धा व छायाचित्रस्पर्धांचे आयोजन यावर्षीही होणार असून त्या स्पर्धा ऑगस्ट २००६ मध्ये जाहीर होणार आहेत.

पुरस्काराचे स्वरूप रु. २०००/- प्रथम, व रु. १५००/ द्वितीय, आणि स्मृतीचिन्ह असे असून पारितोषिक वितरण सोहळा १६ नोव्हेंबर २००६ रोजी अहमदनगर येथे संपन्न होणार आहे.

### * बियाणी पत्रकारिता पुरस्कार

लायन्स क्लब, इंदूरच्या वतीने या वर्षीचा ब्रिजलाल बियाणी पत्रकारिता पुरस्कार लोकमत वृत्तपत्रसमूहाचे अध्यक्ष व खासदार विजय दर्डा यांना प्रदान करण्यात आला.

१० जून रोजी जाल सभागृहात आयोजित समारंभात उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पी. डी. मुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत दर्डा यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. राजाभाऊ देशमुख विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. विदर्भ केसरी पत्रकार आणि माजी अर्थमंत्री ब्रिजलाल बियाणी यांच्या स्मृतीत दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराचे हे नववे वर्ष आहे. यापूर्वी ज्येष्ठ पत्रकार अभय छजलानी (नई दुनिया), रमेश अग्रवाल (दैनिक भास्कर), प्रफुल्ल माहेश्वरी (नव भारत), प्रभाष जोशी (जनसत्ता), जवाहरलाल राठोड (नई दुनिया), सुरेश सेठ (इंदोर समाचार), विद्याधर शुक्ला (दैनिक दोपहर) आणि जयकृष्ण गौड (दैनिक स्वदेश) यांना हा पुरस्कार देण्यात आला.

*** 'संभाजी'ला कवी माधव पुरस्कार**

विख्यात कादंबरीकार विश्वास पाटील यांच्या 'संभाजी' कादंबरीला चिपळूण येथील लो. टिळक स्मारक वाचन मंदिराचा कवी माधव पुरस्कार जाहीर झाला आहे.

श्री. विश्वास पाटील यांच्या झाडाझडती, पांगिरा, महानायक, पानिपत आदी कादंबऱ्या विशेष गाजल्या, अनेक भाषात त्यांची भाषांतरे झाली. अनेक पुरस्कारही प्राप्त झाले. मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रसिद्ध केलेली छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील कादंबरी अनेक विक्रमांकडे वाटचाल करीत आहे. ग्रंथालयाच्या निवड समितीने 'संभाजी' कादंबरीची पुरस्कारासाठी निवड केली. तीन हजार रुपये, स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

नामवंत लेखिका गिरीजा कीर यांच्या 'नक्षत्रवेल' या कथासंग्रहाला याच वाचनालयाचा 'आनंद पुरस्कार' जाहीर झाला आहे. गिरीजा कीर यांचा हा कथा संग्रह दिलीपराज प्रकाशन संस्थेने प्रसिद्ध केला आहे. गेली अनेक वर्षे मराठी साहित्यात विविधांगी लिखाण करणाऱ्या गिरीजा कीर यांनाही आजवर अनेक पुरस्कार प्राप्त णाले आहेत. दोन हजार रूपये व स्मृतीचिन्ह असा हा पुरस्कार आहे. विश्वास पाटील व श्रीमती गिरीजा कीर यांचे ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथालयाचे कार्यवाह धनंजय चितळे यांनी अभिनंदन केले आहे.


**'कवी माधव पुरस्कार २००६'**

# संभाजी

''आमच्या जिजाऊसाहेब आम्हाला नेहमी आठवण करून द्यायच्या- शिवबा, ह्या शंभूच्या वरवरच्या धसमुसळेपणावर जाऊ नकोस. हे पिवळेधमक खणखणीत नाणं आहे? पुढे मागे तुझ्या हिंदवी स्वराज्यावर तसाच प्रसंग ओढावला तर तुझा हा वेडा पोर प्रसंगी प्राण गमावेल, पण सत्व सांभाळेल!''

**('संभाजी' मधून)**




**विश्वास पाटील**

४८० रु.
पोस्टेज ३५ रु.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# वाचकांचा प्रतिसाद

**'एक परिपूर्ण साहित्य अंक'**

आपला जून २००६ चा अंक हातात पडला. दोन-तीन बैठकीतच वाचूनही काढला. अंक नेहमीप्रमाणे खूप आवडला. लेखक डॉ. आनंद यादवांची मुलाखत आवडली. मोठ्या अथक परिश्रमातून डॉ. यादव यांनी 'लोकसखा ज्ञानेश्वर' या ग्रंथाचे लेखन केले आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींवर आजपर्यंत अनेकांनी लेखन केले. परंतु 'लोकसखा ज्ञानेश्वर' हा ग्रंथ मात्र आपल्या वैशिष्ट्यांमुळे मैलाचा दगड ठरेल.

आपला अंक एक परिपूर्ण साहित्यिक अंक आहे. साहित्यिक घडामोडींच्य नव्या नव्या वार्ता आम्हां वाचकांना आपल्या अंकातून घरबसल्या वाचायला मिळतात. आपण 'वाढदिवस साहित्यिकांचे' हा नवा कॉलम सुरू करावा. गावोगावी पुस्तक प्रदर्शने भरवावीत. नवोदित लेखकांसाठी 'पुस्तक प्रकाशन मार्गदर्शन केंद्र' सुरू करावे. आपल्या पुढील वाटचालीसाठी आमच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

**सुनील पांडे, नीरा (पुरंदर)**

---


**मा. संपादक,**

मेहता मराठी ग्रंथजगत या मासिकामुळे ग्रंथजगतमध्ये मेहता प्रकाशन संस्थेने कोणती भर घातली हे जसे समजते तसेच ग्रंथनिवडीसाठीही त्याचा उपयोग होतो. आपल्या विविध योजनांची माहिती मिळते. या मासिकामुळे साहित्यवार्ता, विविध घोषित केले गेलेले पुरस्कार, एखाद्या साहित्यिकाच्या निधनानंतर त्यांच वाङ्मयीन निर्मितीतल्या ठळक गोष्टी यांची उजळणी होते. संपादकीयमधून नवा विचार समजतो. दर्जा आपण राखणार होताच कारण मुळातच तो मेहता प्रकाशनाकडे आहे दर्जेदार ग्रंथनिर्मितीसोबतच ग्रंथप्रसाराला वाहिलेले मासिक चालवणे ही कदाचित काळाची गरज असेल पण त्यातही वैविध्य राखून ते मोहक बनवणे हे आपले व आपल्या सहकाऱ्यांचे कौशल्यच आहे. आपल्याला शुभेच्छा.

**डॉ. सतीश बडवे, औरंगाबाद.**

# श्रद्धांजली

## * शरश्चंद्र बडोदेकर : एक सर्जनशील ग्रंथसंपादक



श्री. शरश्चंद्र बडोदेकरांसारख्या अत्यंत नेमस्त आणि शिस्तप्रिय व्यक्तीचा अंत रस्त्यावर झालेल्या अपघातामुळे व्हावा हा एक अत्यंत विचित्र व खेदजनक योगायोग आहे. बडोदेकर हे एक दक्ष ग्रंथसंपादक होते. हाती आलेल्या हस्तलिखितांतील लिखाणाचा अत्यंत काळजी-पूर्वक विचार करून लेखक, विषय आणि वाचक या सर्व दृष्टींनी अधिक समाधानकारक ठरेल अशी संहिता करून घेण्याचा अत्यंत चोख प्रयत्न ते करत असत. लिखाणातील भाषा, विषयाचा परिपोष, त्यातील तपशील व संदर्भांची अचूकता, संभाव्य वाचकाच्या गरजा या सर्व बाजूंचा ते अतिशय शिस्तशीर विचार करत असत. हा शिस्तशीरपणा त्यांच्या सर्व व्यवहारात व वागण्यात असे. रस्त्याच्या रहदारीचे नियमही ते अत्यंत काटेकोरपणे पाळत असत. बेशिस्त आणि बेदरकार रहदारीने त्यांचा बळी घेतला आणि ग्रंथप्रकाशन व्यवसाय एका जाणकार आणि अनुभवी ग्रंथसंपादकाला मुकला.

राज्यशास्त्र या विषयातील मुंबई विद्यापीठाची पदवी घेऊन त्यांनी सचिवालयात नोकरी घेतली. प्रथमपासून चौफेर वाचनाची सवय लावून घेतलेल्या बडोदेकरांचा स्वभावच चिकित्सक आणि संदर्भ व तपशीले तपासणारा. भाषांची आवड आणि जाण, शब्दांच्या नेमक्या अर्थछटा ओळखून ते चपखल वापरण्याकडे कल, या सर्व स्वभाव व प्रकृतिविशेषांना सचिवालयातील खर्डेघाशी नोकरीत काही वाव मिळणे कठीणच होते. ही नोकरी चालू असतानाच जयहिंद कॉलेजमधील वृत्तविद्या व संज्ञापन या विषयांचा सायंकालीन अभ्यासक्रम त्यांनी केला. आणि संधी मिळताच १९६७ साली, निश्चिंत आयुष्याची शिदोरी मानली जाणारी सरकारी नोकरी सोडून त्यांनी ग्रंथप्रकाशनासारख्या बेभरवश्याचा उद्योग समजल्या जाणाऱ्या क्षेत्रात प्रवेश केला. त्यांनी त्यावेळी नव्याने निघालेल्या सोमैय्या प्रकाशनाच्या संपादकीय विभागात एक सहसंपादक म्हणून नोकरी घेतली.

एकतर हे काम त्यांच्या स्वभावधर्माला मानवणारं होतं. दुसरा अत्यंत महत्त्वाचा



सुयोग म्हणजे त्यावेळी सॅम्युअल इस्राएल हे भारतीय ग्रंथप्रकाशन व्यवसायातील संपादनमहर्षी सोमैय्यात संपादन विभागाचे प्रमुख होते. त्यांच्या हाताखाली काम करणं म्हणजे ग्रंथसंपादनाचे वस्तुपाठ गिरवण्यासारखं होतं. दीर्घ अनुभव व जाणकारी वापरून इस्राएल मूळ हस्तलिखितातून एक वाचनीय विश्वासार्ह संहिता लेखकाकडून कशी घडवून घेत हे बडोदेकर अनुभवत होते आणि संपादकीय प्रकृतिधर्म आत्मसात करत होते.

पुढे त्यांनी ओरिएंट लॉंगमन या प्रकाशनसंस्थेत ग्रंथसंपादक म्हणून चार-पाच वर्षे काम केलं. याच काळात त्यांनी दोन वर्षं सत्यकथेमध्ये ‘ग्रंथव्यवहार’ हे सदर लिहिलं. महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, ललित इत्यादीमधून ग्रंथव्यवसायात निर्माण होणारे प्रश्न आणि घडणाऱ्या घटना याबद्दल कळकळीने आणि अभ्यासपूर्ण लेख लिहिले. एव्हाना त्यांना ग्रंथव्यवसायाची चौफेर जाण आली होती. १९७८ साली पुण्यात नॅशनल बुक ट्रस्ट तर्फे ‘पुढील दशकांतील मराठी ग्रंथ प्रकाशन व्यवसाय’ या विषयावर चर्चासत्र झालं होतं. त्यात बडोदेकरांनी ‘पाठ्येतर पुस्तक विक्री व वितरण’ या विषयावर बीज निबंध सादर केला होता. याच सुमारास ग्रंथाली चळवळीचा पडघम वाजू लागला होता. ग्रंथवृत्ती संवर्धनाची आस असलेला प्रत्येक मराठी माणूस ग्रंथालीच्या ललकारीने आकर्षित झाला होता. बडोदेकर ग्रंथालीचे संस्थापक सभासद होते आणि ‘गंगा अवतरते आहे, आळस झटकून टाका’ असा लेखही त्यांनी लिहिला. परंतु अनेकांप्रमाणे त्यांनाही ग्रंथालीबाबत भ्रमनिरास झाल्याचं जाणवलं तेव्हा ग्रंथालीच्या कार्यपद्धतीवर टीका करणारे लेखही त्यांनी लिहिले.

ओरिएंट लॉंगमन मधील नोकरी सोडून १९८० च्या सुमारास त्यांनी पुण्यात स्वत:ची प्रकाशन व संपादकीय सल्ला देणारी संस्था ‘संवाद’ स्थापन केली. काही घरगुती अडचणी यामुळे त्यांना ग्रंथप्रकाशनाचा व्यवसाय आवरावा लागला. मराठी ग्रंथव्यवसायाला त्या काळात ग्रंथसंपादनाची संकल्पना अजून पुरेशी आकळायचीच होती त्यामुळे संपादकीय सल्ला घेणारे प्रकाशकच त्यांना फारसे भेटले नाहीत.

त्यांच्या कर्तृत्वाला खरा वाव मिळाला तो यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात. या दूरशिक्षण विद्यापीठाला अनेक विषयांची पाठ्यपुस्तके निर्माण करावयाची होती. एका अर्थाने एक मोठी प्रकाशन संस्थाच निर्माण करायची होती. बडोदेकरांनी ही जबाबदारी अत्यंत समर्थपणे सांभाळली. मुक्त विद्यापीठाच्या प्रकाशन विभागाची घडी त्यांनी अत्यंत पद्धतशीरपणे बसवली.

ग्रंथसंपादकाने अनाम राहण्याचा व्यावसायिक संकेत आहे त्यामुळे बडोदेकरांच्या संपादन प्रतिभेचा लाभ कोणकोणत्या लेखकांना झाला आहे याचा उल्लेख करता येणार नाही. शुभदा-सारस्वत प्रकाशनसाठी त्यांनी काही पुस्तकांचे संपादक केले होते. त्यातला एक अनुभव फक्त येथे नमूद करतो. एका मान्यवर कायदेतज्ज्ञांचे शास्त्राचे तत्त्वज्ञान (Philospohy of Science) या विषयांवरील इंग्लिश पुस्तक

प्रकाशनाला घेतले होते. मी लेखकांना सुचवलं की, एकदा सर्व हस्तलिखित एका संपादकाच्या नजरेखालून घालूया म्हणून. हा त्यांना काहीसा त्यांच्या विद्वत्तेचा आणि अधिकाराचा अधिक्षेप वाटला परंतु ते तयार झाले. बडोदेकरांनी हस्तलिखित काळजीपूर्वक तपासले. अनेक शंकास्थळांबाबत लेखकांशी चर्चा केली. काही दुरुस्त्या कराव्या लागल्या. पुस्तक प्रकाशित झाल्यावर विद्वान लेखक आपणहून म्हणाले, 'बरं झालं आपण बडोदेकरांकडून मूळ हस्तलिखित वाचून घेऊन त्यात दुरुस्त्या केल्या.'

ग्रंथसंपादकांच्या बाबतीत पुष्कळदा असं म्हटलं जातं की लेखनातल्या त्रुटी बघायला त्यांची नजर सरावल्यामुळे ते सहसा स्वतंत्र लेखन फारसे करू शकत नाहीत. बडोदेकरांनी थोडीच परंतु चांगली स्वतंत्र निर्मितीही केली आहे. जिम कॉर्बेटच्या पुस्तकांची त्यांनी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेससाठी केलेली भाषांतरे चांगली खपली. नॅशनल बुक ट्रस्टसाठी त्यांनी वासुदेवन नायर या मल्याळम लेखकाच्या नालुकेटु या कादंबरीचे हिंदी आवृत्तीवरून भाषांतर केले आहे. याहीपेक्षा विशेष नमूद करण्यासारख्या त्यांच्या दोन अगदी पूर्ण स्वतंत्र अशा निर्मिती आहेत. 'ललित'मधील 'घटका गेली गेली' या सदराला दहा वर्षं पूर्ण झाली तेव्हा ठणठणपाळी शैलीतील लेखनाची स्पर्धा जाहीर केली होती. त्यात बडोदेकरांच्या लेखाला पारितोषिक मिळाले होते. त्याचप्रमाणे दर्जेदार बालवाङ्मय निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी नॅशनल बुक ट्रस्टने स्पर्धा जाहीर केली होती. त्या स्पर्धेत बडोदेकरांच्या 'भालची हौस पुरी फिटली' या हस्तलिखिताची पहिल्या क्रमांकावर निवड झाली होती.

बडोदेकरांचे पुस्तकांवर आणि ग्रंथव्यवसायावर अतोनात प्रेम होते. तसेच त्यांचे मराठी भाषेवरही प्रेम होते. मराठी बहुअंगांनी फुलावी, वाढावी आणि समृद्ध व्हावी, मराठीत विविध विषयांवरील पुस्तकं प्रकाशित व्हावीत, मराठी ग्रंथप्रकाशन व्यवसाय प्रशिक्षित व्यक्तींनी अधिक सुविहीत पद्धतीने व आधुनिक व्यवस्थापन तंत्रे आत्सात करून चालवावा असे त्यांना कायम वाटत असे. अ.भा. मराठी प्रकाशक संघाने जेव्हा जेव्हा अशा प्रकारचे उपक्रम केले तेव्हा तेव्हा बाकी सर्व कामे बाजूला ठेवून, परगावाहून येऊनसुद्धा ते या उपक्रमात सहभागी झाले होते. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या प्रकाशन विभागाची जबाबदारी सांभाळत असताना त्यांनी नॅशनल बुक ट्रस्टच्या सहकार्याने ग्रंथप्रकाशन कार्यशाळाही नाशिक येथे घेतली होती. अगदी अलीकडे पुणे विद्यापीठात ग्रंथसंपादन व ग्रंथप्रकाशनाचा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी नेमलेल्या समितीवरही ते होते व त्यांच्या सूचनांचा आम्हाला अतिशय उपयोग झाला.

आता हा अभ्यासक्रम प्रत्यक्ष सुरू करताना त्यांची फार मोठी उणीव आम्हाला जाणवणार आहे. नियतीच्या निर्णयापुढे इलाज नाही हेच खरे!

**शरद गोगटे, पुणे.**



### * गुलाबदास हरजीवनदास ब्रोकर

ज्येष्ठ गुजराथी साहित्यिक गुलाबदास हरजीवनदास ब्रोकर यांचे शनिवारी वृद्धापकाळाने पुण्यात राहत्या घरी निधन झाले. ते ९७ वर्षांचे होते.

मुंबईच्या 'भद्रनीव हायस्कूल'मध्ये त्यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण झाले. १९३० मध्ये ते एलफिन्स्टन महाविद्यालयातून इंग्रजी आणि गुजराती साहित्यातील पदवी घेऊन बाहेर पडले. स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतल्यानंतर १९३२ मध्ये त्यांना अटक झाली. येरवडा तुरुंगात त्यांनी १६ महिने कारावास भोगला. तिथेच त्यांच्या साहित्यलेखनास प्रारंभ झाला.

ब्रोकर यांनी लघुकथा, नाटके, कविता, समीक्षा, प्रवासवर्णने, अनुवाद मिळून ४० पुस्तके लिहिली आहेत. यात 'लता अने बीजी वातो', 'प्रेम पदारथ', 'नीलीनुं भूत', 'नवा गगननी नीचे' (प्रवाणवर्णन), 'वसंते' (काव्यसंग्रह), 'मननां भूत' (नाटक), 'धूम्रसरे' (नाटक) आदींचा समावेश आहे. त्यांनी 'एकांकी' या एकांकिकांवरील त्रैमासिकाचे संपादनही केले. आतापर्यंत त्यांच्या पुस्तकांचे हिंदी, मराठी, कन्नड, तेलुगू, सिंधी, इंग्रजीमध्ये अनुवाद झाले आहेत. याशिवाय इटली, जर्मनी, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रिया येथील स्थानिक भाषांमध्ये त्यांच्या पुस्तकांची भाषांतरे झाली आहेत.

ब्रोकर यांच्या 'धूम्रसरे' नाटकाला गुजराथी साहित्य परिषदेचे सुवर्णपदक आणि तत्कालीन मुंबई इलाख्याच्या सरकारचे पारितोषिक मिळाले होते. त्यांची 'एक द्वंद्वयुद्ध' ही लघुकथा 'न्यूयॉर्क हेरल्ड ट्रिब्यून' आणि 'जन्मभूमी' या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाली होती. त्यांच्या 'मानसनांमन'ला १९६४ मध्ये गुजरात सरकारचा पुरस्कार मिळाला. १९८३ मध्ये त्यांच्या हस्ते तिसऱ्या जागतिक हिंदी संमेलनाचे, तर १९८७ मध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन झाले होते.

ब्रोकर यांनी विविध पदे भूषविली. ते साहित्य अकादमीच्या तसेच गुजरात साहित्य अकादमीच्या कार्यकारी समितीचे सदस्य होते. भारतीय ज्ञानपीठ समितीचे ते सदस्य होते. गुजरात साहित्य परिषदेचे ते काही काळ अध्यक्ष होते.

विलेपार्ले साहित्यसभेचेही ते अध्यक्ष होते. १९९१ मध्ये त्यांना पद्मश्री, तर १९९२ मध्ये साहित्य वाचस्पती पुरस्कार मिळाला होता. १९१८ मध्ये त्यांना रणजितराम सुवर्णचंद्र पुरस्कार, तर २००२ मध्ये 'गुजरातरत्न' देऊन सन्मानित करण्यात आले होते.

### * माधव गडकरी

सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून निर्भीडपणे पत्रकारिता करणारे व्यासंगी पत्रकार आणि शैलीदार लेखक माधव गडकरी (वय ७७) यांचे १ जून रोजी निधन झाले. त्यांच्यामागे तीन मुली आणि एक मुलगा आहे. अंधेरी येथील

पारशीवाडा स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

माधव गडकरी यांचा जन्म २५ सप्टेंबर १९२८ रोजी झाला. १९४५ मध्ये वयाच्या सतराव्या वर्षी त्यांनी 'निर्झर' हे स्वत:चे मासिक सुरू केले. त्यानंतर 'क्षितिज' व 'निर्धार' ही नियतकालिके चालविली. १९५६ ते १९६२ पर्यंत दिल्लीत आकाशवाणीसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९६२ मध्ये ते 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये रुजू झाले. त्यानंतर १९६७ पासून दैनिक 'गोमंतक'च्या संपादकपदाची जबाबदारी त्यांनी पेलली आणि पत्रकारिता अधिकाधिक समाजाभिमुख केली. १९७६ पर्यंत त्यांनी या पदावर काम केले. त्यानंतर १९८४ पर्यंत 'मुंबई सकाळ'च्या संपादकपदाची धुरा त्यांनी सांभाळली. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड्यामध्ये रस्ते बांधण्यास चालना देण्यासाठी त्यांनी मोठी मोहीम हाती घेतली होती. याच काळात कोकणातील पूरग्रस्तांसाठी त्यांनी मोठा निधीही जमा केला. त्यानंतर दोन एप्रिल १९८४ रोजी ते दैनिक 'लोकसत्ता'च्या संपादकपदी रुजू झाले. लेखणीच्या सहाय्याने त्यांनी राजकारण्यांवर वचक ठेवला होता.

१९८९ रोजी पहिली जागतिक मराठी परिषद भरविण्यात त्यांचा मोठा वाटा होता. केंद्र सरकारने त्यांना 'पद्मश्री' किताबाने गौरविले होते. बांगलादेश, अफगाणिस्तान, चीन, जपान, क्यूबा, इंग्लंड, अमेरिका या देशांत त्यांनी भ्रमंती करून प्रवासवर्णनात्मक अनेक पुस्तके लिहिली. त्यांच्या पुस्तकांना अनेक पुरस्कारही मिळाले.

सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून गडकरी यांनी समाजाभिमुख पत्रकारिता केली. प्रत्यक्ष समाजात मिसळून, सर्वसामान्यांचे प्रश्न समजावून घेणे हा त्यांच्या पत्रकारितेचा स्थायीभाव होता. अन्याय, भ्रष्टाचार दिसला, की ते आपल्या लेखणीद्वारे त्यावर तुटून पडत. केवळ प्रश्न न मांडता त्या प्रश्नाचे निराकरण करण्यावर त्यांचा भर असे. समाजकार्याची तळमळ आणि लोकशक्तीला विधायक दिशा देण्याच्या हातोटीमुळे त्यांचे कार्य भरीव ठरले. त्यांच्या 'चौफेर' या सदराला अभूतपूर्व यश मिळाले होते. 'गोमंतक'चे संपादक असताना त्यांनी गोवा आकाशवाणीवर मराठी कार्यक्रमांना मिळणाऱ्या सापत्न वागणुकीविरुद्ध रान उठवले होते. गोव्यातील दोन मुख्यमंत्र्यांचा आणि महाराष्ट्रातील सहा मुख्यमंत्र्यांचा कारभार त्यांनी पाहिला. अत्यंत व्यग्र कार्यक्रमामुळे रेल्वे, बस, कार आणि विमानप्रवासातही लिखाण करण्याचे कौशल्य त्यांनी आत्मसात केले होते. राजकारण, समाजकारणाबरोबरच ते साहित्यिक विश्वातही मनापासून रमले.

### * श्यामला शिरोळकर

बालसाहित्यालय व अखिल मराठी बालकुमार साहित्य संमेलन संस्थेच्या संस्थापिका आणि साहित्यिका श्यामला शिरोळकर (वय ७०) यांचे २३ एप्रिल रोजी निधन झाले.



'आनंद' मासिकाच्या संपादिका म्हणून श्रीमती शिरोळकर यांनी काम केले. त्यांच्या 'चंबळेची मुले', 'जा उडूनी पाखरा' आदी पुस्तकांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. 'सर्कस सर्कस' हा त्यांचा विशेष ग्रंथही प्रसिद्ध आहे. ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र बँकेच्या सहकार्याने त्यांनी बचत गट योजना सुरू केली.

श्रीमती शिरोळकर यांनी पुण्यात पहिल्यांदा बालचित्रपट महोत्सव आयोजित केला. पुस्तकपेटी व बालमंडळ योजना राबवून त्यांनी मुलांमध्ये वाचनाची आवडत रुजविण्याचे प्रयत्न केले. दरवर्षी मुलांसाठी साहित्य संमेलन व्हावे म्हणून त्यांनी सुधाकर प्रभू, (कै.) अमरेंद्र गाडगीळ यांच्यासमवेत अखिल मराठी बालकुमार साहित्य संमेलन संस्थेची स्थापना केली.

### * वसंत पेंटर

मूक चित्रपटांपासून संगीत कलाविष्कारापर्यंतचे सक्रिय साक्षीदार असलेले ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक वसंत पेंटर (वय ९३) यांचे आज वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांनी नऊ हिंदी, तर २० मराठी चित्रपटांचे दिग्दर्शन केले आहे. व्ही. शांताराम, चित्रभूषण यांसारख्या अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. अनेक ज्येष्ठ कलाकारांच्या रुपेरी पडद्यावरच्या वाटचालीस यांच्या चित्रपटांमधूनच प्रारंभ झाला. पेंटर यांच्यावर काही दिवस खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. पेंटर यांच्या निधनाचे वृत्त कळताच अनेक ज्येष्ठ कलाकार, दिग्दर्शक, निर्मात्यांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. पेंटर यांच्या पार्थिवावर पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. १९४६ ला प्रभातचा 'गोकुळ' हा त्यांनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट होय. १९६७ नंतर त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. 'टिळा लाविते मी रक्ताचा', 'वारणेचा वाघ', 'पाच नाजूक बोटं', 'सुगंधी कट्टा', 'ग्यानबाची मेख' या मराठी चित्रपटांचे दिग्दर्शन त्यांनी केले. 'हळद रुसली कुंकू हसलं' हा त्यांचा शेवटचा मराठी चित्रपट. ते उत्तम चित्रकार व कलादिग्दर्शक होते.

❐

# २००६ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| **फॉर युअर आईज ओन्ली** : | | |
| इयान फ्लेमिंग | अनु. अनिल काळे | १२०/- |
| **साऊथ बाय जावा हेड :** | | |
| ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २५०/- |
| **केतकरवहिनी** | उमा कुलकर्णी | १५०/- |
| **मोहिनी** | पारू मदन नाईक | १६०/- |
| **लिव्हिंग हिस्ट्री :** | | |
| हिलरी रॉडहॅम-क्लिन्टन | अनु. सुप्रिया वकील | ४००/- |
| **मयादा - इराकची कन्या :** | | |
| जीन सॅसन | अनु. भारती पांडे | २५०/- |
| **वसंतगंधा** | माधवी कोल्हटकर | १२०/- |
| **रिकामा देव्हारा** | वि. स. खांडेकर | १००/- |
| **दोन ध्रुव** | वि. स. खांडेकर | १८०/- |
| **क्रौंचवध** | वि. स. खांडेकर | १८०/- |
| **हिरवा चाफा** | वि. स. खांडेकर | १५०/- |
| **द दा विंची कोड** : डॅन ब्राऊन | अनु. अजित ठाकूर | ३२०/- |
| **कथासंग्रह** | | |
| **कुंकू पुसणारा हात** | व. कृ. जोशी | १४०/- |
| **चरित्रे** | | |
| **जे आर डी : एक चतुरस्त्र माणूस** | माधुरी शानभाग | १००/- |
| **खाली जमीन वर आकाश** | डॉ. सुनीलकुमार लवटे | १५०/- |
| **खगोलशास्त्र विषयक संदर्भ ग्रंथ** | | |
| **अंतरिक्षाचा वेध** | सुधा रिसबूड | १५०/- |
| **कलाविषयक** | | |
| **वेरूळ लेण्यातील शिल्पवैभव** | राधिका टिपरे | २००/- |
| **मेहेंदी** | | |
| **अमृताज् मेहेंदी डिझाईन्स** | अमृता खोड्ये | ५०/- |



| | | |
|---|---|---|
| **आरोग्य** | | |
| **वजन कमी करण्यासाठी** | | |
| **योगसाधना** | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ५०/- |
| **मार्गदर्शनपर** | | |
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **चक्रं आणि नाडी :** रवींद्र कुमार | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **ज्योतिषविद्या :** विजय कुमार | अनु. शरद गोगटे | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **क्रियायोग :** रवींद्र कुमार | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **केसांची निगा :** मीनाक्षी सिन्हा, | | |
| रिना राजगोपाल,सुश्मिता बॅनर्जी | अनु. मीना टाकळकर | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **ॲक्युप्रेशर :** डॉ.सावित्री रमय्या | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **शांततेनं काम करा!** : पॉल विल्सन | अनु. सुनंदा अमरापूरकर | २४०/- |
| **बाल वाङ्मय** | | |
| **बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **चालणारा हिमपुतळा आणि** | | |
| **इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **छोटुसा पांढरा ससुकला आणि** | | |
| **इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **छोटु किल्लीवाला उंदीर आणि** | | |
| **इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **लोखंड खाणारे उंदीर आणि** | | |
| **इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३०/- |
| **गंपू चिंपू आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **मैत्रीचे मोल आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **सिंड्रेला आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |

## वसंत कानेटकर यांची नाटके




जिथे गवतास भाले फुटतात

**६०रु.**

प्रेमात सगळंच माफ

**६०रु.**

अखेरचा सवाल

**७०रु.**

आकाशमिठी

**६०रु.**

गगनभेदी

**६०रु.**

**प्रत्येकी पोस्टेज**
**२०रु.**






# बालनगरी

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| सुलेमानची सुटका | ९८ |
| डोनाल्ड डक | १०४ |

**इ**जिप्त नावाच्या देशात ‘सुलेमान’ नावाचा शिंपी राहत असे. तो स्वभावाने खूप घमेंडी आणि गर्विष्ठ होता. ‘आपण दूरदेशी प्रवासाला जावे’ असे त्याने ठरवले आणि पुरेसे पैसे साठवल्यानंतर तो जगप्रवासाला बाहेर पडला.

# सुलेमानची सुटका



मजल-दरमजल केल्यावर सुलेमानला एक जंगल लागले. जंगलातून जात असताना त्याचे लक्ष एका उंच





गोलाकार परंतु मोडकळीला आलेल्या इमारतीकडे गेले. या निर्जन जंगलात ही इमारत कशी? असा त्याला प्रश्न पडला. कुतूहलाने सुलेमान त्या इमारतीजवळ गेला. तो काही पायऱ्या चढणारच इतक्यात एक आश्चर्य तेथे घडले, ती गोलाकार इमारत संपूर्णपणे फिरली. आणि सुलेमान समोरचे दृश्य पाहताच प्रचंड घाबरला.

एक प्रचंड मोठा, इमारतीच्याच उंचीचा राक्षस सुलेमानकडे रागाने पाहत होता. तो राक्षस सुलेमानला रागावत म्हणाला, ‘काय रे, कोण आहेस तू? तुला काय पाहिजे?’



सुलेमान घाबरत म्हणाला, 'राक्षस महाराज, मी एक शिंपी आहे. जगप्रवास करण्यासाठी बाहेर पडलो आहे. वाटेत ही इमारत लागली म्हणून सहज पाहत होतो. मला माफ करा...! मी लगेच इथून जातो.'

'ए... थांब! तुला जाता येणार नाही...! आता तू माझा गुलाम झाला आहेस.' राक्षसाने दरडावून म्हटले.

एरवी घमेंडखोरीने वागणारा सुलेमान आता मात्र चांगलाच अडचणीत आला होता. पण तो तसा अतिशय



हुशार आणि चतुरही होता. या राक्षसापासून सुटका करून घ्यायची असेल तर याचे ऐकलेच पाहिजे असे त्याने ठरवले. तो राक्षसाला म्हणाला, 'राक्षस महाराज, ठीक आहे. मी तुमचा गुलाम होण्यास तयार आहे. पण माझा पगार काय असेल?'

राक्षसाने थोडा विचार केला आणि तो सुलेमानला म्हणाला, 'तुला मी दर महिन्याला १०० सोन्याची नाणी देत जाईन!'

ते ऐकून सुलेमान खूष झाला. तो राक्षसाला म्हणाला, 'महाराज! मला काय काम करावे लागेल?'

'जा! आणि मला एक पेलाभर पाणी आणून दे! राक्षसाने सुलेमानला आज्ञा केली.



'पेलाभर पाणीच काय...? मी पाऊससुद्धा पाडू शकतो.' सुलेमान आपल्या घमेंडखोर स्वभावानुसार म्हणून गेला.

राक्षसाला हे बोल खरेच वाटले. सुलेमानकडे दैवी शक्ती आहे की काय असे त्याला वाटले. दुसऱ्या दिवशी त्याने सुलेमानला लाकडे तोडून आणण्यास सांगितली. सुलेमान नेहमीप्रमाणे म्हणाला, 'लाकडेच काय, मी संपूर्ण जंगलच एका फटक्यात तोडू शकतो.' सुलेमानचा हा आवेश पाहूनच राक्षसाला त्याचे बोलणे खरे वाटले. तिसऱ्या दिवशी राक्षसाने सुलेमानला दोन हरिणांची शिकार करण्यास सांगितले. सुलेमान सवयीप्रमाणे म्हणाला, 'दोनच काय मी शंभर हरिणांची शिकार करीन.'



तो मायावी राक्षसं आता मात्र खरोखरच बुचकळ्यात पडला. सुलेमानचा बोलण्याचा आवेशच राक्षसाला विश्वास ठेवण्यास भाग पाडत होता. केव्हा ना केव्हा तरी या सुलेमानला आपण अवघडातले अवघड काम द्यावे आणि याला अद्दल घडवावी असे राक्षसाला सारखे वाटत असे. एके दिवशी त्याला

एक युक्ती सुचली. तो सुलेमानला घेऊन जंगलातील बांबूच्या झाडाजवळ गेला. तिथे उंचच उंच बांबू होते. राक्षस म्हणाला, 'हे पहा, यातील कोणतेही बांबू जमिनीला टेकेल अशा पद्धतीने वाकवून दाखव.'

सुलेमानने नेहमीप्रमाणे घमेंड दाखवली. त्याने एक बांबू हातात धरला आणि तो वाकवायला सुरुवात केली. बांबू लांबच लांब असल्यामुळे सुलेमानला जोर काढावा लागला. जमिनीवर टेकवणारच, इतक्यात त्या बांबूच्या उलट उसळीमुळे सुलेमान इतका जोरात हवेत फेकला गेला की त्याची शुद्धच हरपली. सुलेमान जेव्हा शुद्धीवर आला तेव्हा तो



जंगलाच्या बाहेर दूरवर एका नदीकाठावर येऊन पडला होता. आता तेथे ना तो मायावी राक्षस होता ना त्याची गुलामगिरी.

या प्रकारातून त्याची सुटका झाली खरी, पण घमेंडही चांगलीच जिरली.


❐





## मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी मार्गदर्शक पुस्तके

वाढती स्पर्धा, होमवर्कचा दबाव, मानसिक ताणतणाव, अपुरा खेळ, टि. व्ही. चे आक्रमण, सतत खचणारा सांस्कृतिक पाया अशा सर्व अडथळ्यातून मुलांचे व्यक्तिमत्त्व कसे जोपासावे अन् पालकत्वाची जबाबदारी यशस्वीपणे कशी पार पाडावी? याचा साध्या सोप्या भाषेत मूलमंत्र देणारी अत्यंत मार्गदर्शक पुस्तके ही पुस्तके आपल्या संग्रही असलीच पाहिजेत.

**असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्त्व**
डॉ. रमा मराठे




१२० रु.




**सुजाण पालकत्व**
मीना टाकळकर

६० रु.

**आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्र**
अनंत पै
अनु. प्रशांत तळणीकर




८० रु.




**पाल्य व्यक्तिमत्त्वाचा कानमंत्र**
संजीव परळीकर

७० रु.

# डोनाल्ड डक

'डोनाल्ड डक' हा डिस्ने कार्टूनच्या पात्रांपैकी आणखी एक लोकप्रिय पात्र आहे. 'मिकी माऊस' सोबतच 'डोनाल्ड डक'देखील बालविश्वांमध्ये आपले आगळे स्थान टिकवून आहे.



९ जून १९३४ साली 'द वाईज लिटल हेन' या मालिकेद्वारे 'डोनाल्ड डक'चे कार्टूनविश्वात आगमन




झाले. स्वभावाने रागीट असणारा 'डोनाल्ड डक' लवकरच बाळगोपाळांना आवडला आणि मिकी माऊसच्या बरोबरीने डोनाल्ड डकचेही अमेरिकन वृत्तपत्रांमधून विनोदी सदर सुरू झाले.

स्वभावाने रागीट असणारा डोनाल्ड डक मनाने मात्र सरळ आणि चांगल्या विचाराचा आहे. मात्र आपल्या या स्वभावामुळे तो अनेकदा अडचणीतही



येतो. या अडचणींमुळे त्याचा उडालेला गोंधळ प्रेक्षकांना मनमुराद हसवून जातो.

आपल्या कामात इतरांची ढवळाढवळ डोनाल्ड डकला बिलकुल खपत नाही. एखादी चूक झाली तर जग काय म्हणेल याची त्याला फिकीर नाही. त्याचा स्वभाव






लढाऊ आहे. सहजासहजी हार होणे त्याला मान्य नाही. तो मित्रांच्या वादविवादात पडत नाही. शक्यतो स्वतः पुढाकार घेऊन मित्रांमध्ये समेट घडवून आणतो.

डोनाल्ड डकचे मित्र मिकी माऊस, गुफी आणि प्लुटो हे मजेत आयुष्य जगतात. डोनाल्डला मात्र प्रत्येक प्रसंगात संघर्ष करावा लागतो. या संघर्षात जे काही विनोदी प्रसंग घडतात ते पाहताना प्रेक्षकांची हसून पुरेवाट होते. बालमित्रांना मग मिकी माऊसपेक्षाही डोनाल्ड डक आवडू लागतो.

डिस्ने ग्रुपचा चित्रकार टोनी अन्सेल्मो याने 'डोनाल्ड डक'चे कार्टून तयार केले. ते 'वॉल्ट डिस्ने'ला इतके आवडले की 'मिकी माऊस'नंतर त्याने 'डोनाल्ड डक'लाच प्रमुख पात्र म्हणून निवडले.

'डोनाल्ड डक'चा पडद्यामागील आवाज हा फ्लारेन्स 'डकी' नॅश यांचा असून 'डोनाल्ड डक'चा आवाज काढताना मला बरीच कसरत करावी लागते असे ते म्हणतात.

डिस्ने कार्टूनला केवळ बालगोपाळांमध्येच नव्हे तर अवघ्या जगभरात लोकप्रियता मिळवून देण्यासाठी 'डोनाल्ड डक' आणि 'मिकी माऊस' यांनी मोलाचा हातभार लावला हे मात्र खरे...!

❒

# बालवाचकांसाठी धमाल स्पर्धा

**प्रिय बालमित्रांनो,**

आपले **'बालनगरी'** सदर येत्या दिवाळी अंकातही खूप सजणार आहे, धम्माल गोष्टी, भरपूर कोडी, गंमत-जंमत, जोक्स आणि... तुम्ही स्वत: लिहीलेल्या गंमती-जमती, होय... तुम्हालाही या अंकात लिहीता येईल...!

**'अशी झाली माझी फजिती'** याबद्दल... तुमच्या धमाल फजितीबद्दल आम्हाला लिहून पाठवा. फजिती मित्राची नाही बर का! तुमचीच फजिती लिहा...

* **कधी तुम्ही शर्ट उलटाच घलून बाहेर गेलात का?**
* **चुकून शर्टची बटणं खाली वर लावली...**
* **शाळेतून घरी येताना मित्राचेच दप्तर आणले...**
* **शाळेचा रस्ताच चुकला, दोन वेगवेगळ'या चपला घातल्या, सॉक्ससुद्धा वेगळ्याच रंगाचे घालून गेलात...**
* **शाळेत झालेली फजिती, घरात होणारी गडबड...**
* **अचानक लाईट गेले आणि अंधारात मनीम्याऊँच्या पाठीवर पाय पडला...**
* **आईने, आजीने चकली खाताना पकडलं...**

अशा कितीतरी वेळा तुमची फजिती झाली असेल होय ना? मग खरोखरी लिहून पाठवा.

पहिल्या पाच मुलांना धमाल बक्षीसे व स्पर्धेत भाग घेण्याचा प्रत्येकाला प्रशस्तीपत्रक दिले जाईल...

**चला तर मग... लागा तयारीला...**

**संपादक**
**मेहता मराठी ग्रंथ जगत**



# बालवाचकांचा प्रतिसाद

**मा. संपादक,**

मी **'मेहता मराठी ग्रंथजगत'** नियमितपणे वाचते. माझे वडील टी. बुक क्लबचे सभासद आहेत. मला बालनगरी हे सदर फार आवडते. यातील लहान मुलांसाठी ज्या काही अनमोल गोष्टी आपण ग्रंथजगतमध्ये देत आहात, त्यामुळे आम्हां बालमित्रांना खूप आनंद होत आहे. जून २००६ मधील बालनगरीतील 'हक्काचे घर' आणि 'संगत' या गोष्ट आवडल्या.

पुन्हा अशाच छान छान बोधप्रद गोष्टी पाठवा. पुढील अंकाची वाट पाहत आहोत.

**तुमची वाचक**
**कु. गीतांजली साळुंके, पुणे.**

---

## ओळखा पाहू

**हे छायाचित्र आहे, भारतातील एका संगणकसम्राटाचे. भारतीय संगणकविश्वात क्रांती निर्माण करून यांनी नव्या युगाचा पाया रचला. हे कोण आहेत आणि यांनी स्थापन केलेल्या जगविख्यात संगणकसंस्थेचे नाव काय? हे आम्हाला पत्राद्वारे कळवा.**



जून अंकातील ओळखा पाहू चे उत्तर
**बुद्धिबळपटू - विश्वनाथन आनंद**

अचूक उत्तर पाठवणारे वाचक -
**कु. गितांजली साळुंके, पुणे.** **राजेश तायडे, अमरावती.**

## बालमित्रांनो,

अनुषा गांधी या अमेरिकेत शिकणाऱ्या पुणेकर मुलीची कविता आम्ही या पूर्वीच्या अंकात प्रसिद्ध केली होती. तिचे भाषांतर 'अहमदनगर' येथील विलास राशिनकर यांनी केले आहे. ती इंग्रजी कविता व तिचे भाषांतर येथे प्रसिद्ध करीत आहोत.

**Wonder why...?**

**I wonder why...**
**birds can fly**
**& why do babies cry...?**
**I wonder why...**
**Trees can not talk**
**& why houses can not walk...?**
**I wonder why...**
**The sun set**
**& why lions can't be pet...?**
**I wonder why...**
**The grass is green**
**& why can't air be seen...?**

मूळ कविता- अनुषा गांधी, अमेरिका.



मला अचंबा वाटे याचा...

मला अचंबा वाटे याचा...
पक्षी गगनी उडती कैसे?
मला अचंबा वाटे आणिक-
बाळ सोनुले का रडते ते?

मला अचंबा वाटे याचा...
का नच शकती झाडे बोलू?
मला अचंबा वाटे आणिक-
का नच शकती घरेही चालू...?

मला अचंबा वाटे याचा...
सूर्य मावळे रोज कशाला?
मला अचंबा वाटे आणिक-
सिंह नसे का पाळीव प्राणी...?

मला अचंबा वाटे याचा...
रंग तृणाचा हिरवा कैसा?
मला अचंबा वाटे आणिक-
हवेस का जन बघू न शकती?

भाषांतर - विलास राशिनकर, अहमदनगर.

# फुलंच फुलं
# कोडं क्र.१

खालच्या या बागेत खेळण्याच्या नादात ही वेगवेगळी २१ फुलं आडवी, उभी, तिरकी हरवलीयत.

शोधून लिहा पाहू!

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| प | सो | दा | ल | ळ | व | ब |
| का | कुं | न | कु | चा | फा | मा |
| गु | ला | ब | ट | मो | ग | रा |
| ल | पा | म | द | क्का | ज | त |
| ब | रि | स्वं | र | जा | थ | रा |
| का | जा | ग | जु | ई | गु | णी |
| व | त | नि | शी | गं | ध | ली |
| ली | क | र्द | ळ | ला | मे | य |
| ली | न | झें | डू | च | ता | सा |
| त | व | ग्लॅ | शे | वं | ती | प |

**उत्तर - पुढील 'बालनगरी' मधे.**





# संस्कारक्षम कथा


| | | |
|---|---|---|
| सूर्यास्त | वि. स. खांडेकर | ३० |
| यज्ञकुंड | वि. स. खांडेकर | ३० |
| मध्यरात्र | वि. स. खांडेकर | ४० |
| घरटे | वि. स. खांडेकर | ३० |
| अस्थी | वि. स. खांडेकर | ३० |

# अमर चित्र कथा

| | | |
|---|---|---|
| राजा हरिश्चन्द्र | संपादक : अनंत पै | २० |
| अभिमन्यू | संपादक : अनंत पै | २० |
| विक्रमादित्य | संपादक : अनंत पै | २० |
| छत्रपती शिवाजी | संपादक : अनंत पै | २० |
| भीष्म | संपादक : अनंत पै | २० |
| पृथ्वीराज चौहान | संपादक : अनंत पै | २० |
| सम्राट अशोक | संपादक : अनंत पै | २० |
| राणा प्रताप | संपादक : अनंत पै | २० |
| प्रल्हाद | संपादक : अनंत पै | २५ |
| श्रीरामाची कथा | संपादक : अनंत पै | २५ |
| कर्ण | संपादक : अनंत पै | २५ |
| चाणक्य | संपादक : अनंत पै | २५ |


**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## तेनालीरामच्या चातुर्यकथा





तेनालीरामचे चातुर्य

लेखिका
मंजुषा आमडेकर





तेनालीरामच्या रोचक गोष्टी




तेनालीराम विनोदवीर


किंमत प्रत्येकी
२५रुपये




तेनालीरामच्या
मनोरंजक कथा

एकत्रित पोस्टेज २५रु. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

# 'ओशो' यांचे साहित्य



पूर्व आणि पश्चिमेकडील असा कोणताही धर्म, पंथ, मतवाद, तत्वज्ञान नाही जेथे 'ओशो' रजनीशांची सूक्ष्म दृष्टी पोचलेली नाही. काही विशेष कारणांनी त्यांनी एखादा विषय सोडून दिलाही असेल. परंतु या जगात जेवढे धर्म आणि मतमतांतरे आहेत त्या सर्वांचा समन्वय त्यांच्या विचारांमध्ये दिसून येतो. कृष्ण, बुद्ध , महावीर, शंकराचार्य आणि जीझस यांच्यापासून ते काण्ट, हेगेल आणि श्रीअरविंदांपर्यंत ते सर्वांशी चर्चा करतात आणि गीता, वेदोपनिषदांपासून कबीर, ताओ, झेन, तंत्रापर्यंत सर्व तत्वज्ञान त्यांच्या दृष्टीसमोर हजर असते.

तत्वज्ञान आणि काव्य यांचे अपूर्व मीलन ओशोंच्या अप्रतिम साहित्यात आढळते ओशोंच्या काही निवडक पुस्तकांचे अनुवाद 'मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे' करण्यात आले आहेत. अशी काही पुस्तके....

| | | |
|---|---|---|
| **एक एक पाऊल** | अनु. भारती पांडे | १००/- |
| **म्हणे कबीर दिवाणा** | अनु. भारती पांडे | १२०/- |
| **भक्तीत भिजला कबीर** | अनु. भारती पांडे | १२०/- |
| **हा शोध वेगळा** | अनु. भारती पांडे | १२०/- |
| **माझे माझ्यापाशी काही नाही** | अनु. भारती पांडे | १२०/- |
| **हसत-खेळत ध्यानधारणा** | अनु. मीना टाकळकर | ७०/- |
| **मुग्ध कहाणी प्रेमाची** | अनु. मीना टाकळकर | १२०/- |
| **ध्यानसूत्र** | अनु. माधव कर्वे | १००/- |
| **मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही** | अनु. मृणालिनी गडकरी | ९०/- |
| **नवी पहाट** | अनु. प्रज्ञा ओक | १२०/- |
| **साक्षात्काराची देणगी** | अनु. प्रज्ञा ओक | १५०/- |
| **स्वत:चा शोध** | अनु. प्रज्ञा ओक | १५०/- |
| **विद्रोही** | अनु. माधुरी काबरे | १२०/- |
| **बंडखोर** | अनु. माधुरी काबरे | ९०/- |

**पोस्टेज प्रत्येकी २० रु.** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




## मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी मार्गदर्शक पुस्तके

वाढती स्पर्धा, होमवर्कचा दबाव, मानसिक ताणतणाव, अपुरा खेळ, टि. व्ही. चे आक्रमण, सतत खचणारा सांस्कृतिक पाया अशा सर्व अडथळ्यातून मुलांचे व्यक्तिमत्त्व कसे जोपासावे अन् पालकत्वाची जबाबदारी यशस्वीपणे कशी पार पाडावी? याचा साध्या सोप्या भाषेत मूलमंत्र देणारी अत्यंत मार्गदर्शक पुस्तके ही पुस्तके आपल्या संग्रही असलीच पाहिजेत.

**असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्त्व**

डॉ. रमा मराठे




१२० रु.




**सुजाण पालकत्व**

मीना टाकळकर

६० रु.

**आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्र**

अनंत पै

अनु. प्रशांत तळणीकर




८० रु.




**पाल्य व्यक्तिमत्त्वाचा कानमंत्र**

संजीव परळीकर

७० रु.

**पोस्टेज प्रत्येकी २० रु.**